# भावलेणी



९८५४

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. १५८

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

REFBK-0008183

द. वि. तेंडुलकर एम्. ए., बी. टी.
(प्रफुल्ल-दत्त)

वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांसाठीं

ललित निबंध

# भा व ले णी

द. वि. तेंडुलकर,
एम्. ए; बी. टी.
( प्रफुल्ल-दत्त )

REFBK-0008183

किंमत सव्वा रुपया

– प्रकाशक –
द. वि. तेंडुलकर
रुक्मिणी–स्मरण १२२
तेलंग क्रॉस् रोड,
माटुंगा मुं. १९

सर्व हक्क लेखकाधीन

●

: प्रमुख विक्रेते :
बलवन्त पुस्तक भाण्डार, गिरगांव मुंबई ४

– मुद्रक –
कृ. ना. सापळे
रामकृष्ण प्रिं. प्रेस
रुक्मिणी निवास,
मोरबागरोड,
दादर मुंबई १४.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

“ गौरवें देउनी आसनास चौरंग
छात्रांनो ! वदला तुम्हि ‘ अमुचे श्रीरंग ’
कमलजा कला मम नाहुनि त्या निष्ठेंत
होईल शुचिर्भुत, राहिल गात अभंग ”

ज्यांच्या माझ्यावरील निष्ठेमुळें
मी आजवर लेखन करूं शकलों,
त्या माझ्या
ज्ञात आणि अज्ञात
विद्यार्थ्यांस अर्पण

# लेण्यांचीं रेषा—वलयें


| | |
|---|---|
| पाउलवाट | १ |
| नवी अनुभूति, नवे छंद | ३ |
| भाव तेथें देव | ५ |
| संगीत-सौंदर्य | ६ |
| जुनी पुस्तकें | ७ |
| तृण नाहीं तेथें पडिला दावाग्नि | ८ |
| नकाशाचें आत्मवृत्त | ९ |
| आकांक्षा | ११ |
| छंद | १२ |
| विचार उच्चार आणि आचार | १४ |
| अंतरीचें धावे स्वभावें बाहेरी | १५ |
| माणसें आणि मतभेद | १६ |
| पत्रें | १७ |
| जगरहाटी | १८ |
| मरणांत खरोखर जग जगतें | २० |
| यमुनेच्या सानिध्यांत | २१ |
| दे जयांचें तयां वीरभद्रा | २२ |
| परिस्थिति आणि ध्येय | २३ |
| जे न देखे रवी | २४ |
| थांबला तो संपला | २५ |
| हें विश्वचि माझें घर | २७ |
| आरसा | २८ |
| गाउ त्यांना आरती | २९ |
| क्लेशावांचून यश नाहीं | ३१ |
| श्रद्धा आणि बुद्धि | ३२ |
| आदरातिथ्य | ३३ |
| भाषावार प्रांतरचना | ३५ |
| फेरीवाले | ३६ |
| प्रपंच आणि परमार्थ | ३८ |
| आगगाडीच्या स्टेशनवर | ३९ |
| स्वतंत्र भारत | ४१ |
| शिवाजी आज असतां तर | ४३ |
| माझा आवडतां संत | ४४ |
| आजोबांचें घड्याळ | ४६ |
| माथेरानची सफर | ४८ |
| हस्ताक्षर आणि झरणी | ५० |
| युद्धस्य कथा रम्या | ५२ |
| मोठी माणसें | ५३ |
| बैलगाडीचा प्रवास | ५५ |
| सुभाषितें आणि सुधारणा | ५६ |
| खेळ | ५८ |
| अविस्मरणीय प्रसंग | ६० |
| माझे गुणदोष | ६२ |
| ग्रामोद्धार | ६४ |
| तुझ्या किनाऱ्यावर | ६५ |
| हस्तलिखित नियतकालिकें | ६७ |
| वाङ्मय आणि जीवन | ६९ |
| आजचा विद्यार्थी | ७१ |
| पहिला पाठ | ७३ |
| वाचन | ७४ |
| अश्रु | ७७ |

न नांवाजलेले नाटककार

## श्री. ना. ल. मोरे

यांचीं

# गाजलेलीं नाटकें

★

विषारी नाग ( सामाजिक )

★

वीर-प्रतिज्ञा ( ऐतिहासिक )

★

शेतकरी ( स्त्री-पात्रविरहित ग्रामीण नाटिका )

आणि

## पांडवांचा सखा

— लौकरच आपल्या भेटीस येत आहे —

# प्रवेशद्वार

कितीतरी दिवस निबंधांचें एखादें पुस्तक लिहावें, असें मनांत होतें. त्यांच्या विषयांचीं रेषा-वलयें मनासमोर उभीं राहात. कल्पना त्यांना रंग-रूप देण्याचें काम करी. आज ती लेणीं प्रत्यक्षांत उतरत आहेत.

भाषा-विषयाच्या उत्तर-पत्रिकेंत स्वतंत्र वृत्तीनें लिहिणाऱ्यास अधिक गुण मिळतात. पण अनुभव असा आहे कीं पुष्कळांना स्वतंत्र विचार करण्याची संवय नसते. कित्येकांना ते सूत्रबद्ध मांडतां येत नाहींत. आपल्या कल्पनांना योग्य तो साज त्यांना चढवितां येत नाहीं. रचना, भावना आणि कल्पना ह्या त्रयींच्या सगमावर ज्यांची प्रतिभा रंगते त्यांच्याच लिखाणांत लालित्य येतें; तेंच रसिक मनाची पकड घेतें.

या लेण्यांतील विषयांचें नावीन्य त्यांवरून नजर फिरविणारास सहज दिसून येईल. त्यांत निबंध, लघु-निबंध, कल्पना-विस्तार, प्रवास-वर्णनें, आत्मचरित्र इत्यादि विविध लेखन-प्रकार आहेत. तें लिहितांना विद्यार्थ्यांची निरीक्षण-शक्ति वाढावी, त्यांच्या भावनेला चालना मिळावी आणि त्यांना नव-कल्पनांचे दर्शन व्हावें, हा हेतु आहे.

'पाउलवाटे'पासून 'अश्रू'पर्यंतचीं हीं भावलेणीं पहाण्यांत रसिक-वाचक घटकाभर जरी स्वतःला विसरला तरी तीं चितारल्याचें चीज झालें असें मी समजेन.

१२-२-५४
रुक्मिणी-स्मरण १२२
तेलंग क्रॉस् रोड
माटुंगा, मुं. १९

द. वि. तेंडुलकर

अनुक्रम ९८३८
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 8963

# भाव लेणी

## पाउलवाट

कधीं कधीं दिवस-दिवस कुणा, मानवाची व माझी गांठ पडत नाहीं, मग बोलणें तर दूरच राहो. पावसाळ्याचे चार महिने तर मी पाण्याखालींच असते. कार्तिक महिना उजाडला कीं एका खेड्यांतून दुसऱ्या खेड्यांत जाणाऱ्या माणसांची चाहूल मला लागते. त्यांच्या पातलांचे ठसे माझ्या हृदयावर उमटतात. तेव्हां मला नागमोडी आकार येतो. ‘ माणसाची जात अजूनपर्यंत सरळ चालायला कशी शिकली नाहीं ?’ याचें मला आश्चर्य वाटतें. कारण माझा आकार हा माणसाच्या गतीचा निदर्शक आहे.

पहाट झाली कीं एखादें माणूस माझ्या वाटेनें जाऊं लागतें. नंतर त्यांची वर्दळ वाढते. सकाळच्या शांत प्रहरीं त्यांचा तो ग्रामीण भाषेंतील संवाद एखाद्या भांडणासारखा कानांवर आघात करतो. येणा-जाणाऱ्या अनेक माणसांत कार-भाऱ्याला न्याहरी घेऊन जाणारी शेतकरी स्त्री, लोकल्बोर्डाच्या शाळेंत जाणारीं मुलें, शेजारच्या गांवांत पत्रें वांटायला जाणारा टपाल-बाबू, देवाचा नवस फेडायला आलेल्या पांढरपेशांच्या बायका आणि चरायला गुरें घेऊन जाणारा गुराखी इत्यादि अनेकजण असतात. मंगळवारीं सिद्धेश्वरला बाजार भरतो. दहा गांवचा माणूस त्या बाजाराला जमा होतो. मीठमिरचीपासून ॲल्युमिनियमच्या भांड्यापर्यंतच्या संसाराला लागणाऱ्या सर्व वस्तू त्या बाजारांत मिळतात. पिकल्या पिकाचें चार पैसे हातांत खुळखुळत असतात तोंपर्यंत चार महिने पुरेल इतकें अन्नधान्य हीं खेडवळ माणसें

घेऊं शकतात. पण तेंच पैसे सावकाराच्या देण्याघेण्यांत संपले कीं मग त्यांना वर्षभर चांदीचें नाणें दिसायची पंचाईत. आठवड्याचा हा दिवस म्हणजे माझ्या जीवनांत खरोखरच मंगलवार असतो. माझ्या समोर असलेल्या या दोन डोंगरांच्या टेकड्यांवर वर्षांतून दोन यात्रा भरतात. एक दत्तजयंतीची आणि दुसरी भवानीची. तेव्हां तर काय माणसांची रीघ लागलेली असते. डिवचल्या गेलेल्या मुंग्या वारुळ फोडून सैरावैरा पळत सुटाव्या तशीं हीं माणसें परमेश्वरावरील भक्तिभावानें धुंद झालेलीं असतात; बेभान होऊन नाचत असतात, गात असतात. हे दोन दिवस मला पर्वणीसारखे वाटतात.

माझ्यापासून अर्ध्या मैलावरून एक हमरस्ता जातो. मोटारींची वाहतूक या रस्त्यावरून इतकी होत असते कीं, माणसें पोटासाठीं इतक्या वेगानें अलीकडे कां पळूं लागलीं आहेत, हें मला समजत नाहीं. जीवनांतलें स्वास्थ्य दिवसेंदिवस कमी होऊं लागलें आहे, ही गोष्ट खरी. पण मुलुखांतल्या शेतांतलें सोनें टाकून शहरच्या नोकरीची गुलामगिरी पत्करायची हें बरें नव्हे. कानांत अडकविलेल्या कारकुनी लेखणीपेक्षां खांद्यावर टाकलेला औतच माणसाला पिढ्यानुपिढ्या जगवितो. जाऊं दे! मी कशाला ह्या धडपडत्या जीवांना सुखाच्या गोष्टी ऐकवायला हव्यात? पण राहवलें नाहीं म्हणून बोललें.

या हमरस्त्यावरून नेहमीं कसल्या ना कसल्या तरी मिरवणुकी जात असतात. कधीं बँडच्या तालांत निघालेली एखादी वरात, कधीं शाळेंतील मुलामुलींची सांघिक कवायत, तर कधीं निवडणुकीच्या धामधुमींत 'मतें द्या'च्या घोषणा करणाऱ्या प्रचारकर्त्यांच्या टोळ्या ह्यांनीं या रस्त्याला महत्त्व आलें आहे. संध्याकाळच्या वेळीं मन विषण्ण झालें कीं वाटतें, खरोखर हा हमरस्ता मोठा भाग्यवान् आहे. हजारों लोक याच्या पायाशीं येतात. पण रात्र झाली.कीं दिवसाच्या धूळीनें भरलेल्या देहांत एक प्रकारची ऊब येते आणि वाटते, 'नाहीं, मीच सुखी. चराचरांनीं क्षणाक्षणाला पायतळीं तुडविल्या गेलेल्या या हमरस्त्याच्या जीवनापेक्षां, दिवसांतून एखादा क्षण कां होईना पण सुखाचा शोध करीत जाणारा पांथस्थ मला स्पर्श करून जातो यांतच मला समाधान आहे. सुख हें मानवतेच्या सौजन्यशील स्पर्शांत आहे. अहंकारांतून उद्भवलेल्या हर्षांत नाहीं.' ● ● ●

# नवी अनुभूति, नवे छंद

संत कवी आणि पंत कवी ह्यांची कविता बहुतांशीं भक्तिरसात्मक होती. ज्ञानेश्वरांपासून तुकाराम-रामदापसार्यंतच्या कवींनीं ओवी आणि अभंग ( क्वचित् अनुष्टुप् ) छंदांत आपल्या भावना व्यक्त केल्या. पंडित कवींपैकीं मोरोपंत आणि वामनपंडित यांनीं आर्या आणि श्लोक या वृत्तांचा विशेष अवलंब केला असला तरी त्यांनीं मराठींतील सारीं वृत्तें हाताळून पाहिलीं. शाहिरांनीं मात्र आपल्या भावना निरनिराळ्या स्वतंत्र चालींत व्यक्त केल्या. त्यांच्या भावना आधींच्या कवींसारख्या सर्वस्वीं परमेश्वरविषयक चिंतनांतून स्फुरलेल्या नव्हत्या. डोळ्यांपुढें वज्राला लाजविणारे झुंझार दिल्लीच्या तक्ताला धडकी मारीत असलेले पाहून कुठल्या जातिवंत कवीला केवळ 'देवाचियें द्वारीं' बसून रहावेंसें वाटेल? त्यांनीं डफावर थाप मारली आणि हां हां म्हणतां निवृत्तीच्या गुंगींतून महाराष्ट्राला जागें केलें. पण पोवाड्याबरोबरच त्यांनीं थकलेल्या जिवाला रिझविणारी, विरही जिवाला इष्कानें भिजविणारी लावणी गायिली. महाराष्ट्राच्या माळावर डफ-तुणतुण्याच्या तालावर खुल्या दिलाच्या ताना घेणारी ही शाहीर-मंडळी तत्कालीन महाराष्ट्राच्या ज्वलंत कर्तबगारीचीं स्तोत्रें गाणारे चंडोल होते. तेव्हां संत कवी, पंडित कवी आणि शाहीर कवी यांच्या काव्यांत भक्ति, शृंगार आणि वीर ( क्वचित् करुण ) रसांचा अंतर्भाव होतो.

इंग्रजी अमदानीपासून केशवसुतापर्यंतच्या कवींची कविता इंग्रजींच्या अभ्यासानें स्फुरली होती. परकीय कल्पनांना देशी पेहराव चढविण्याचें कार्य या वेळच्या विद्वान् मंडळींनीं केलें. म्हणून या कवितेला परभृत म्हणावें लागेल. संस्कृत आणि इंग्रजी कवितेच्या अंगाखांद्यावर खेळल्यामुळें तिला आजीची ठसठशीत अंगलट लाभली आणि मैत्रिणीच्यांतील लालित्य तिनें घेतलें. तरी पण मराठी मनाचा मोकळा आविष्कार तींत नाहीं. महाजनी, गणेशशास्त्री लेले, चिपळूणकर, कुंटे वगैरे कवी त्या वेळीं काव्यरचना करीत होते. परंतु मराठी कवितेला नवीन वळण लाविलें तें केशवसुतांनीं होय.

'अशी असावी कविता फिरून
तशी नसावी कविता म्हणून'

असें तुम्हीं कोण आम्हांला सांगणार? असा स्पष्ट सवाल त्यांनीं वाचकांना टाकला. आणि 'देव-दानवा नरें निर्मिलें हें मत लोकां कवळूं द्या!' असा रोख-

ठोक जबाब दिला. त्यांच्यापासून मराठी कविता खऱ्या अर्थानें मराठी म्हणून जगूं लागली. त्यांच्या अभिमानाच्या पोटीं आत्मविश्वास होता. त्यांच्याबरोबरच गोविंदाग्रज, बालकवि, रे. टिळक आणि विनायक ह्यांनींहि त्याच कर्तबगारीनें आपले भाव खेळविले, आपले छंद आळविले. गोविंदाग्रज तर सांगूनच गेले आहेत—

'काव्य कराया जित्या जिवाचें जातिवंत करणेंच हवें'

१९२० पासून रविकिरण–मंडळाचा काळ सुरू झाला. कै. माधव–ज्यूलियन् आणि यशवन्त हे मंडळाचे गाजलेले कवी होत. ह्या कवींनीं आपली काव्य-रचना विशेषतः मात्रावृत्तांतून केली आहे. निरनिराळ्या 'जाति' त्यांनीं कवितेंत आणिल्या. भावनेच्या आविष्कारासाठीं 'गजल' सोयीस्कर म्हणून त्या वृत्तांत त्यांनीं बरीचशी कविता केली. माधवरावांनीं तर 'गजलांजलि' नांवाचें एक पुस्तक लिहिलें आहे. परंतु कांहींहि झालें तरी रविकिरण–मंडळांतील कवींची कविता ही एका विशिष्ट अनुभूतीच्या क्षेत्रांत वावरणारी होती. दिवाणखान्यांतील काश्मिरी गालिच्यावर नाचणाऱ्या नृत्यांगनेप्रमाणें तिचे पदन्यास केवळ चार रसिकांना रिझविण्यासाठीं आहेत.

त्यापुढील काळांत कुसुमाग्रज आणि बोरकर या दोन कवींनीं आपली छाप महाराष्ट्र–रसिकांवर पाडली. त्यांच्यांतील नव अनुभूतीचा साक्षात्कार पाहून रसिकवर्ग मंत्रमुग्ध झाला. ओज आणि लालित्य हे अनुक्रमें कुसुमाग्रज आणि बोरकर यांचे विशेष काव्य–गुण होत. गेल्या एक–दीड तपांत मराठी कवितेला त्यांनीं नव्या अनुभूतींचे आणि नव्या छंदांचे नजराणे दिले. त्यांच्याच 'धारानृत्यांत' भिजत थिजत आणि मोहरत येणारे मंगेश पाडगांवकर उद्यांच्या काव्य–विश्वाचें उद्गाते ठरतील. कारण आजच त्यांची अनुभूती—

'घर असूनीहि आज घर नाहीं असें झालें'

हा छंद ओठीं घोळवीत आहे.

सात शतकांपूर्वीं शारदेच्या शिरांतून उद्भवलेली ही गंगोत्री आज अशी मंदाकिनीप्रमाणें विशाल दिसत आहे. ● ● ●

# भाव तेथें देव

परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल अनेकांच्या अनेक कल्पना आहेत. कांहींचा 'परमेश्वर' या शब्दाबद्दलच वाद आहे. ते लोक विश्वाचा व्यापार चालविणारी कुणीतरी एक शक्ती आहे ही गोष्ट मान्य करतात, पण त्याला 'देव' म्हणायला तयार नाहींत. कुणी निसर्ग हाच देव समजतात. पाषाणांत परमेश्वर पहाणाऱ्याला तर त्याचीं अनेक रूपें दिसतात. शनिवार-भक्तांना रामाचा सेवक हनुमान प्रिय वाटतो, गुरुवार करणारे दत्ताची उपासना करतात आणि संकष्टी करणारे गणपतीला आपलें दैवत समजतात. भारतीयांचे असे तेहतीस कोटी देव आहेत. याचा अर्थ हाच कीं प्रत्येकाचे भाव वेगळे म्हणून देव वेगळे.

मोरोपंत म्हणतात, 'पूजा कैसी लोकीं जरि दगड शिरीं धरी न शेंदूर' शेंदूरावांचून देवपण येत नाहीं. केशवसुत म्हणतात,

'देवळीं त्या देवास बळें आणा
परी राही तो सृष्टिमधें राणा'

त्याचाच अर्थ परमेश्वर जळीं स्थळीं भरून उरला आहे. साऱ्या संतांनीं तेंच मत प्रतिपादन केलें आहे. '**गीतांजली**'तील एका गीतांत रवींद्रनाथ म्हणतातः

'अरे! दारें बंद असलेल्या देवालयाच्या कोपऱ्यांत तूं कां बसला आहेस? देवता देवळांत नाहीं. ती उन्हा-पावसामध्यें शेतकरी आणि मजूर यांच्याबरोबर तापत आहे, भिजत आहे. तुला मुक्ति हवी असेल तर कर्मयोगामध्यें मग्न हो! तुझ्या अंगांतून घामाच्या धारा निथळूं देत!'

तेव्हां परमेश्वराचें अस्तित्व हें श्रमामध्यें आहे. जगांतील मोठीं माणसें आपलें 'ध्येय हेंच दैवत' मानीत आलीं आहेत. मनांतील भाव केंद्रीभूत करण्याचें एक साधन म्हणूनच त्यांनीं देवाचा उपयोग केला. प्रतापगडच्या भवानीच्या पायाशीं शिवाजी टाळ कुटीत बसला असतां तर त्याला मोंगलांचें आक्रमण थांबवितां आलें नसतें. तिच्या दर्शनानें त्याचे भाव क्षणांत एकवटत असत. ह्या भावबळावरच मनुष्य तरत असतो. क्षणाची भक्ति ही अनंताची शक्ति देत असेल तरच तो देव होय; नाहीं तर पाषाणापुढची ती कोरडी बडबड ठरेल. तेव्हां देव कुणाला मानावा हा प्रत्येकाच्या भावनेचा प्रश्न आहे. सुरवातीला पांडुरंगाला देव मानणाऱ्या तुकारामाला पुढें पुढें तो देव ब्रह्माण्डांत दिसूं लागला; आणि अखेरीं जगाला तो तुकारामांत दिसला. तेव्हां देव हा श्रमांतून श्रेय शोधीत बसणाऱ्या माणसाच्या भावनेंत आहे. ● ● ●

# संगीत—सौंदर्य

‘ गाण्यानें श्रम वाटतात हलके हेंही नसे थोडकें ’

—केशवसुत

संगीताचा परिणाम अखिल प्राणिमात्रांवर होतो. वेणुनादानें वेडावलेलें गोकुळ व्यवहार विसरून श्रीहरीच्या भजनीं लागलें, ही पुराणांतरींची कथा आपण नाटक-चित्रपटांतून पाहूं लागलों कीं आपल्याला ‘संगीतांत सौंदर्य आहे’ याचा प्रत्यय येतो. संगीत हें कानांनीं ग्रहण करायचें असतें आणि मनांत सांठवायचें असतें.

गाणें हें जीवनांतले श्रम हलकें करण्याचे एक साधन आहे. मनाच्या उल्हसित वृत्तींत स्फुरलेल्या कवितेला, श्री. अ. ब. कोल्हटकर म्हणतात त्याप्रमाणें, ‘ चाल लागत नाहीं, ताल लागत नाहीं किंवा अलंकारांची शाल लागत नाहीं.’ गाण्याच्या तालावर जडावलेल्या मनाला हलकें वाटतें. खेडेगांवांत पहांटेच्या प्रहरीं जात्या-वर दळणाऱ्या शेतकऱ्यांच्या स्त्रिया, लावणी—कापणीच्या वेळीं शेतांतून काम करणारे मजूर, अवजड गलबत दर्यांत लोटणारे नावाडी, मंगळागौरीच्या रात्री जागविणाऱ्या बारा घरच्या बारा मुली, आणि दिवसाच्या दगदगीनें देवाच्या दाराशीं घटकाभर बसलेला एखादा म्हातारा...हीं वेगवेगळ्या प्रकारचीं आणि प्रवृत्तीचीं माणसें गातात, तीं कशाकरितां ? तर घटकाभर दडपलेल्या दुःखांना मोकळें करण्याकरितां. गाणारा मनुष्य प्रत्येक स्वराबरोबर देहांतील कणाकणाला फुलवीत असतो आणि ऐकणाराच्या मरगळलेल्या मनाला चैतन्य देत असतो.

दूरवर विचार करून पाहिलें तर माणसाचें सारें जीवनच छंदोबद्ध आहे. माझ्या या विधानाचें एखाद्याला हसूं येईल. पण बाल्यावस्थेपासून वृद्धावस्थे-पर्यंतच्या जीवनाचें आपण ओझरतें दर्शन घेऊं या ! चिमण्या बाळाला कडेवर घेऊन दिव्यासमोर उभी राहिलेली स्त्री, ‘ अड्गुळं मड्गुळं सोन्याचं कड्गुळं...’ हें महाराष्ट्रीयांच्या दृष्टीनें अर्थहीन गाणें म्हणतें. दोन मुलें आपल्याच रंगांत येऊन खेळूं लागलीं कीं एकमेकांचे कान धरून म्हणतात, ‘ च्यॅव् मॅव् पत्रावळीचं पाणी पॅव् ’ आणि परकऱ्या मुली फुगडी घालतांना भावी जीवनाचें चित्र रंग-विणारें ‘इकडून आली तार, तिकडून आली तार, ××× चा नवरा मामलेदार’ असें कडवें गिरवून जातात. हें झालें अजाणत्या बालपणीचें संगीत. त्यानंतरच्या जीवनांत सुद्धां संगीताकडे आपण कळत नकळत ओढले जातो. केशवसुतांच्या ‘ सतारीच्या बोलां’तील पुढील चरणांत

'तों मज गमलें विभुती माझी
स्फुरत चालली विश्वामाजी'

संगीतानें आकर्षित झालेल्या, त्याच्याशीं एकतान पावलेल्या मनाची पातळी वर्णिलेली आहे. आयुष्याच्या उतार काळांत तर सारें जीवनच छंदमय होऊन जातें. अनंताच्या पूजेअर्चेंत रमणारें वृद्धांचें मन संतांच्या ओवी—अभंगांतून झरतें.

सारांश संगीतांत भावनांना प्राधान्य असल्यामुळें श्रमभारानें लवलेले, दुःखानें दडपलेले जे आत्मे आहेत, त्यांच्या मनाचें सौंदर्य वाढविण्याचें कार्य तें करतें. ● ● ●

## जुनीं पुस्तकें

मुंबईसारख्या गजबजलेल्या रस्त्यावरील फूटपाथवर इतस्ततः पडलेलीं नामवंत लेखकांचीं पुस्तकें पाहिलीं कीं मला आईवेगळ्या झालेल्या, आणि आबाळ होत असलेल्या बालकांची आठवण होते. दिवसरात्र विचार–वलयांत राहून निर्माण केलेल्या कलाकृतीला असें उघड्यावर पडावें लागावें याचा मला खेद होतो. जुन्या पुस्तकांच्या व्यापारावर चार पैसे मिळविणारे असे कांहीं 'होल्-लॉट्वाले' माझ्या परिचयाचे आहेत. आठवड्यांतून एखादा दिवस फुरसत काढून मीहि त्यांच्या दृष्टीनें टाकाऊ आणि विकाऊ पुस्तकें चाळीत असतो. त्यांत मला अनेक दुर्मिळ पुस्तकें दिसतात.

नवीन पुस्तकें विकत घेऊन संग्रहीं ठेवणें सर्वांनाच आणि तें पण सदासर्वदा शक्य होईलच असें नव्हे. गेल्या आठदहा वर्षांत मींहि सात आठशें पुस्तकें विकत घेतलीं. कौतुकानें त्यांना आवडत्या रंगांचीं वेष्टनें घातलीं. पण आतां... शेतमळा फुलविणारी विहीर वैशाखांत आटली कीं रहाटाच्या लोट्यांना नुसतेंच फिरावें लागतें. पुन्हां भरून यायला त्यांना आषाढाच्या मेघमालेकडे पहावें लागतें. माझें आज असेंच झालें आहे. म्हणून मी जुन्या पुस्तकांकडे आपुलकीनें पाहतों. त्यांत मला सावरकरांची 'माझी जन्मठेप', जावडेकरांचें 'जीवनदर्शन', पां. वा. गाडगीळांचें 'मार्क्स् कॅपिटल्', ना. ह. आपट्यांचें 'वैभवाच्या कोंदणांत', फडक्यांच्या 'गुजगोष्टी', कालेलकरांचीं 'भक्ति कुसुमें' आणि गडकऱ्यांचा 'राज-

संन्यास' दिसतो. महाराष्ट्रांतील प्रथम दर्जाच्या लेखकांच्या पुस्तकांची अशी अवस्था होण्याचें कारण काय? याचें कारण वाचकांची अभिरुची दिवसेंदिवस निकृष्ट होत आहे हें एक, आणि जे वाचक आहेत त्यांना पुस्तकें विकत घेऊन वाचण्याइतकी हौस नाहीं. महिन्याकांठीं वाचनाच्या हौशीसाठीं पदरमोड करून एकदोन पुस्तकें विकत घेतां येणें कांहीं अशक्य नाहीं. 'माझें एक छोटेंसे वाचनालय असावें' ही प्रवृत्ति वाचक-वर्गांत बळावेल तेव्हांच शारदेच्या मंदिरांतील या एकनिष्ठ भक्तांच्या साहित्य-गुणांची बूज होईल.

पण मी मात्र रस्त्यावरील जुनीं पुस्तकें चाळीत बसतों तीं एवढ्याच हेतूनें नव्हे; तर त्या पुस्तकांत मला दुर्मिळ पुस्तकांचा लाभ होतो म्हणून. मोठमोठ्या वाचनालयांत न मिळणारीं पुस्तकें अशा ढिगाऱ्यांतून डोकावत असतात. त्यांचीं नांवें पाहिलीं कीं आंतील प्रकरणें वाचण्याचा मला मोह होतो. आणि त्यांतील एखाद्या प्रकरणांत आवडीच्या विषयाचें विवरण असलें कीं मग काय? नगर पालिकेच्या दिव्याच्या प्रकाशांत संध्याकाळची थकलेली घटका कधीं निघून जाते तें कळत नाहीं.

माझ्या वाचनालयांत रस्त्यावर विकत घेतलेलीं अशींच शेसव्वाशें पुस्तकें आहेत. तीं दुर्मिळ आहेत म्हणून मीं विकत घेतलीं आहेत. पण तीं जुनीं आहेत (अगर त्यांत कांहीं चटकदारपणा नाहीं) म्हणून कुणी लांबविण्याचा प्रयत्न करीत नाहीं. लांबविण्याचा म्हणण्याचा हेतु हा कीं पुस्तक घेतांना कुणाचाहि हात लांब होत असतो, याचा माझ्याप्रमाणें अनेकांना अनुभव असेल. • • •

## तृण नाहीं तेथें, पडिला दावाग्नि।

शुष्क वस्तूला जाळणें हा अग्नीचा धर्म आहे. तेव्हां त्या वस्तूच्या अंगीं ओलावा जितका अधिक तितकें अग्नीचें कार्य निष्कळ ठरतें. तो ओलाव्यानेंच थंड होतो. वरील चरण हा तुकारामाच्या अभंगांतील आहे. त्यांत त्यांनीं दुष्टांची मनोवृत्ति वर्णिली आहे. जगांतील सर्व संतांना त्या वेळच्या दुष्टांनीं छळलें आहे; प्रसंगीं जिवंत जाळलें आहे. 'निंदकाचें घर असावें शेजारी' म्हणणारे तुकाराम ह्याच छळाला त्रासले होते. परंतु क्षमा हें तुमचें-आमचें शस्त्र नव्हे, बलवंतांचें आहे. दुसऱ्याच्या सूडासाठीं क्षणाक्षणाला जळणारी व्यक्ति तें शस्त्र पेलूं शकत

नाहीं. प्राणिमात्रावरील अथांग सहानुभूति मनांत हेलावत असल्याशिवाय आपल्या शब्दांना क्षमेचें शस्त्र उचलतां येणार नाहीं. शिव–धनुष्य फक्त रामच उचलूं शकला, याचें कारण काय? इतरांच्यांत काय ती शक्ति नव्हती असें नव्हे, पण मानवी गुणांनीं मन प्रबळ झाल्याशिवाय अशीं कार्यें हातून घडत नाहींत.

या जगांत जो तो आपापलें हित उशाशीं गुंडाळून बसलेला आहे. त्याच्या त्या ‘स्व’त्वाला स्पर्श करतांच तो श्वानासारखा गुरगुरत अंगावर येतो. आपण मानव आहोंत, हें तो विसरतो. मनुष्य जोंपर्यंत मोठेपणाची आस धरतो, त्यासाठीं संग्रह वृत्तीनें राहतो, तोंपर्यंत त्याला प्रतिस्पर्धी हे असणारच. परंतु तो निर्मम झाला, त्याचा आत्मा चराचरांत माझें–तुझें विसरून विरघळून गेला तर कुणीहि त्याचें कांहीं करूं शकणार नाहीं. कारण त्याच्यांतच जग सामावलेलें असतें, आणि जगांत तो सामावलेला असतो. विश्वावरील विशाल मायेनें त्याचें अंतःकरण ओथंबलेलें असतें. म्हणून तुकाराममहाराज म्हणतात, ‘ क्षमा ही विश्वाचें अंतिम हित साधणारी एक शक्ति आहे. अखिल प्राणिमात्राला निर्भय बनविणारें तें एक अमोघ शस्त्र आहे.’ ●●●

## नकाशाचें आत्मवृत्त

माझ्या पूर्वायुष्याविषयीं मला विशेषशी माहिती नाहीं. आम्हीं सारेजण गिरगांवांतील एका चाळीच्या पहिल्या मजल्यावरील लहानशा खोलींत नसानसांतून रंग भरीत खेळत होतों, एवढीच काय ती अंधुकशी आठवण मला आहे. त्यानंतर आम्हां भावंडांची ताटातूट झाली. वेगवेगळ्या ठिकाणीं आम्हांला जावें लागलें. आज मी दादर येथील एका व्यक्तीनें चालविलेल्या खासगी वर्गांतील भिंतीवर डौलानें फडफडत आहे.

मी ज्या वर्गांत आहे त्या वर्गचालकांचें नांव...पण नको! त्यांचें नांव तुम्हांला सांगण्यापेक्षां माझ्याबद्दल त्यांना वाटत असलेला आदरभावच सांगितलेला बरा. ते गृहस्थ इंग्लंडसारख्या देशांत सहासात वर्षें वास्तव्य करून होते. जगांतील शिक्षणसंस्थांची बारीकसारीक माहिती त्यांच्या जिभेच्या टोंकावर केंद्रीभूत झालेली आहे. त्यांच्या नेहमींच्या बोलण्यांत पाश्चात्यांच्या चालीरीति, त्यांची शिस्त आणि वेगवेगळे आदर्श, त्यांचा विनोद या गोष्टी नेहमीं येतात. त्यांच्याकडे मी कसा आलों हें आज जरी मला स्मरत नसलें, तरी कधीं कधीं माझ्या शरीराच्या

निरनिराळ्या भागावर बोट ठेवून विद्यार्थ्यांना व्याख्यान देतांना ते माझ्याविषयीं सांगतात तेव्हां मला कळतें, कीं मी सातआठ वर्षें तरी येथें असलों पाहिजे. माझ्या अंतरंगांत जगाची रेषा–वलयें आणि रंग–रूप आहे म्हणून त्यांनीं मला आवडीनें येथें आणलें आणि आजपर्यंत कौतुकानें वाढविलें. इंग्रजी शिकविण्यांत त्यांचा हातखंडा आहे. एकेक शब्द अचूक उच्चारीत त्यांचीं वाणी कोनाकोनांतील विद्यार्थ्यांच्या कानांत घुमते. ते इंग्रजी शिकवितात ते इंग्रजींतून, म्हणजे इतरांसारखें मराठींचें इंग्रजीकरण करून नव्हे. मोकळ्या मनानें, निष्कपट भावनेनें, भूत–भविष्य विसरून ते एकदां शिकवूं लागले म्हणजे शेजारच्या घरांतील विद्यार्थ्यांनीं आपल्या खोलींत बसून, त्याचीं टांचणें घेऊन परीक्षेत खुशाल यशस्वी व्हावें. इतकें सगळें मी त्यांच रसभरित वर्णन करून सांगत आहे, याचें कारण त्या तासभरांत आठ–दहा वेळां तरी ते माझ्याकडे आपुलकीनें पहातात. माझ्या अंतःकरणांतील भाव–विशेष विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करतात.

आतां मीं उतारवयांत प्रवेश केला आहे. इतक्या अवधींत माझ्या दृष्टीसमोर त्यांनीं शिकविलेले कितीतरी विद्यार्थी विलायतच्या वाऱ्या आणि स्वाऱ्या करून आलेले आहेत. चार–सहा महिन्यांनीं त्यांचा एखादा विद्यार्थी भरल्या मनानें आपल्या गुरुजींचें तोंड गोड करण्याकरितां जेव्हां हातांत मिठाईचा पुडा घेऊन येतो, तेव्हां तो विशेषत्वानें माझा उल्लेख करून, 'मीं हें पाहिलें, इथं चार दिवस होतों. या ठिकाणीं माझी नि त्या जॉर्जची भेट झाली.' अशीं वाक्यें माझ्या अंतःकरणावर हात ठेवून उच्चारतो, तेव्हां मला जन्माचें सार्थक झाल्यासारखें वाटतें. माझे विटत चाललेले रंग पुन्हां गर्द होतात; गलित गात्रें ताजीतवानीं होतात. त्या स्पर्शानें मला पवित्र झाल्यासारखें वाटतें.

अजूनपर्यंत ऐष आरामांत वाढलों. इतक्या वर्षांत त्यांनीं मला कधीं गुंडाळून कोनाकोपऱ्यांत कोळिष्टकांच्या गुंतावळ्यांत टाकिलें नाहीं. पण सुखालाहि सीमा असते. तें सुख यापुढें सरेल कीं काय अशी शंका माझ्या मनांत घर करून बसली आहे. माझ्या वर्ग चालकांच्या मनांत पुन्हां एकदां इंग्लंडला जाऊन रहाण्याची कल्पना घोळत आहे. त्यांना ती जवळच्या मित्रांजवळ व्यक्त करताना मीं ऐकिलें आहे. तेव्हांपासून मनांतल्या मनांत मी विरत चाललों आहें. जातांना त्यांनीं मलाहि बरोबर न्यावें असें मला वाटतें. तेथें त्यांना माझा

काडीइतकाहि उपयोग नाहीं, हें मी ओळखून आहें. पण इतक्या वर्षांच्या सहवासानें त्यांच्याशीं एकरूप झालेला मी...माझें मन त्या विरहाच्या कल्पनेनेंच आज बेचैन होत आहे. मला कुणातरी अरसिकाच्या स्वाधीन करून ते न जावोत एवढीच माझी त्या दयाघनाजवळ प्रार्थना आहे. त्यांच्या सामानांत कुठल्याहि जागीं मी अंग दुमडून बसेन, पण मला त्यांच्या मायेच्या सावलींत राहूं दे! त्यांच्या शब्दांच्या नादांत रंगूं दे! त्यांच्या स्पर्शाच्या हर्षानें मोहरूं दे! ●●●

## आकांक्षा

‘आकांक्षा फुलति जिथें गगन ठेंगणें’

—महाराष्ट्र-गीत : श्री. कृ. कोल्हटकर

केवळ आशेवर जगणारा माणूस पाहिला कीं मला त्याची कींव येते; त्याचें कौतुक नाहीं वाटत. प्रवाहावर उताणे पडून निश्चिंतपणें मैदाकडे वहाणारा मनुष्य नदीबरोबर सागराला मिळेल. पण तें खरें जीवन नव्हे. जीवनांत झुंज हवी; संघर्ष हवा. संगमाकडे जातांना संघर्ष नसेल तर जीवन पिळदार वाटणार नाहीं. जगाच्या इतिहासात आपलें नांव लिहून गेलेलीं माणसें अशींच होतीं. त्यांच्यांत मनाची तळमळ, जिवाची जळजळ होती.

‘हिमालय अमुचा–अमुचा उंच जगीं
अधोगत आम्हीं हतभागी’

अशी जाणिव इतकीं वर्षें आपल्यांत नसती तर आज आपण स्वतंत्र झालों नसतों. महाराष्ट्राच्या इतिहासांत अशीं शेंकडों माणसें आहेत कीं त्यांनीं धुळींतून आपलें ध्येय उचललें. राखेंतून मुक्तीची रांगोळी काढली. अशा माणसांच्या ‘दिव्यत्वाची प्रचीति’ आल्यावर, कवि बोरकर म्हणतात त्याप्रमाणें, त्यांच्यापुढें आदरानें ‘कर जुळतात’ आणि त्यांच्या चितेवरील चिऱ्यावर श्रद्धेनें पणती लावावीशी वाटते. आकांक्षावादी मनुष्य जिवंतपणीं जळत असतो आणि मरणानंतर त्याचें जगणें सुरू होत असतें. चिरंजीव व्यक्तीचें जीवन उफराटें असतें. ती व्यक्ति स्वतःच्या उराशीं कांटे कवटाळते आणि जगाच्या मार्गावर कुसुमांच्या पायघड्या घालते. मावळचे चुव्वे एकत्र करून दिल्लीच्या गजेंद्राच्या गंडस्थळीं नाचणारा शिवाजी, कोंडाण्यावर देह ठेवणारा त्याचा उजवा हात तानाजी; एका हातांत खडग आणि एका हातांत हुरडा घेऊन उत्तरेपर्यंत मजला मारणारा पहिला बाजीराव;

पाठीशीं रक्ताचा गोळा बांधून उरावर ब्रिटिशांच्या तोफांचे गोळे झेलणारी लक्ष्मीबाई; महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत घोरत पडलेल्यांना आपल्या गर्जनेनें जागे करणारे रण-केसरी टिळक; अंदमानच्या युगानुयुगें काजळलेल्या भिंती आपल्या अतुल त्यागानें उजळणारे सावरकर; आणि आज महात्म्याच्या पावलावर पाउल टाकून भूदान-यज्ञासाठीं सर्वस्व वेंचणारे विनोबाजी या साऱ्यांच्या चरित्रांवर जेथें शेंकडों पानांचे ग्रंथ लिहिले आहेत, तेथें एकेक ओळ लिहून कसें भागेल? अस्मान खालीं येतें तें अशांच्याच उदात्त चारित्र्यानें-असामान्य कर्तृत्वानें होय.

राजकीय अगर सामाजिक बाबतींत कार्य करणाऱ्या अशा ह्या व्यक्ती होऊन गेल्या, तशाच अध्यात्मिक बाबतींत निवृत्तिनाथापासून तुकारामापर्यंत अनेक संत होऊन गेले. मनाचें मांगल्य संतांच्या शिकवणुकीमुळें तेवत राहतें. महाराष्ट्रीय मनाची श्रद्धाप्रियता या संतांमुळेंच जागी राहिली आहे. आज चारशें वर्षें पंढरपूरची वारी करणारे भक्त पदोपदीं तुकोबाचे अभंग गात आहेत, त्याचें कारण त्यांतील तत्त्वज्ञान होय. आकांक्षा म्हणजे मानवी कर्तबगारीची झेप होय. ही झेप घेणाऱ्या माणसाचा प्रयत्न जितका चिकाटीचा तितकी ती आकाशाला भिडणारी, जगाला थक्क करणारी ठरते.

या थोरामोठ्यांच्या गोष्टी जरा बाजूला ठेवून बोलायचें झालें तर मीहि आकांक्षावादी आहें. चारचौघांप्रमाणें मी आशेवर जगतों खरा, पण एकान्तांत जेव्हां मी विचारांत असतों तेव्हां मला वाटतें, 'आपण आपल्या जिव्हाळयानें एक निमणें जग निर्माण करावें.' संतांप्रमाणें असीम भक्तीनें विश्वाला कवटा-ळण्याचें सामर्थ्य माझ्यांत नसलें तरी एक छोटेसें विश्व निर्माण करण्याचें सामर्थ्य माझ्या शब्दांत आहे हें खास. मी नेहमीं तें विश्व फुलवीत असतो आणि त्या फुलोऱ्यांत स्वतः अदृश्य होतो. दुसऱ्याला आपल्या दुःखाचा विसर पाडणें आणि त्याच्या सुखांत सुख मानणें ही माझी प्रवृत्ति आहे. महात्म्यासारखी ब्रह्मगिरीच्या साऱ्या पायऱ्या चढून जाण्याची शक्ति माझ्यांत नाहीं, तरी पण पांच-पंचवीस पायऱ्या चढून जाणें मला कठीण वाटत नाहीं. ● ● ●

## छंद

सर्वच माणसें कांहीं सोन्याचांदीचे चमचे तोंडांत घेऊन जन्माला आलेलीं नसतात; बहुतेकांना शिंपल्यांतूनच दूध पिण्याची पाळी येते. अशांचें जीवन

दगदगीचें असतें, धकाधकीचें असतें. परिस्थितीशीं झगडतांना ते रक्तबंबाळ होतात, घायाळ होतात. त्यांना रिकामपण असें मिळत नाहीं, असेल त्या वेळांतून तें काढावें लागतें. अशा रिकामपणाच्या वेळीं आपापल्या छंदांत रमलेलीं माणसेंच अधिक कर्तबगार असतात. त्यांचा व्यासंग असतो एक आणि छंद असतो दुसरा.

छंद ही जीवनवस्त्राची किनार होय. जसें किनार म्हणजे वस्त्र नव्हे तसेंच छंद म्हणजे पण जीवन नव्हे. तशाहि कांहीं अपवादात्मक व्यक्ति असतात. उदा०— तुकाराम हा प्रवृत्तीनें संत होता. सज्जनांचीं मनें संकटकालीं सुगंधित होतात; तसेंच वाढत्या संकटांबरोबर त्याचें सत्प्रवृत्त मन अभंगांतून गाऊं लागलें. पण प्रथम प्रथम छंद म्हणून, विरंगुळा म्हणून, रमलेला जीव पुढें व्यासंगमय झाला. आवडीनें हातीं घेतलेल्या गोष्टी जन्मभर उराशीं घेऊन बसणारे आणि त्याच ब्रह्मानंदांत अमर होणारे महात्मे आणखीहि कांहीं आहेत. पण त्यांच्यापेक्षां फुरसतीच्या वेळेचा उपयोग ज्यांनीं जीवन उजळण्यासाठीं केला किंवा जे करीत आहेत त्यांचेंच जीवन मला अधिक आवडतें.

दिवसभर राजकारणाचे डाव खेळून रिकामपणीं भगवत् गीतेच्या अभ्यासांत रमणारे टिळक, इतिहासासारख्या रुक्ष विषयाचें संशोधन करून थकल्यावर लांकडें फोडणारे सरदेसाई, स्वातंत्र्याच्या निदिध्यासानें व्याकुळल्यावर मुलांच्या मेळाव्यांत परमेश्वराचें रूप पहाणारे साने गुरुजी, हीं माणसें मला अधिक जवळचीं वाटतात. माणसाला अपेक्षिलेल्या गोष्टी क्वचितच मिळतात. त्याला जें हवें त्याचा शोध करीत वणवण फिरावें लागतें आणि जें नको तें कुठून तरी मागून येऊन डोळे झांकतें. कमळाच्या मखमाली आवरणांत रमूं इच्छिणाऱ्या भुंग्याला बांबूच्या लांकडी घरांत राहावें लागतें. तेव्हां जीवनांतील ही विसंगति विसरण्यासाठीं प्रत्येकाला कसला ना कसला तरी छंद हवाच असतो. नाहीं तर जीवन हें बाभुळवन भासेल. छंदानें मन पिसासारखें हलकें होतें. त्या तरलतेंत ऐहिक बंधनांचा आपणांस विसर पडतो. मनाला घटका दोन घटका वेगळ्या वातावरणांत जाऊन आल्याशिवाय बरें वाटत नाहीं. देहाला जशी गुरुत्वाकर्षणाची ओढ असते तशी मनाला स्वर्गीय वस्तूंची असते. म्हणून छंदमग्न जीव हा स्वर्ग आणि पृथ्वी यांच्यामधील मोकळ्या वातावरणांत वावरत असतो.

मलाहि तितकेंसें रिकामपण मिळत नाहीं; पण मी तें मिळवितों. कित्येक वेळा मला बसूनें प्रवास करावा लागतो. तेथें रांग फार मोठी असली कीं मला बरें

वाटतें. घरीं थोड्या अधिक वेळानें जायचेंच असतें. 'सह' कुटुंबाच्या सहवासांत मला 'माझा' असा राहतां येत नाहीं. स्वतःच्याच विचार–वलयांत रंगून जाण्याचें मला भयंकर वेड आहे. माझी ही जगण्याची पद्धत आप्तेष्टांना रुचत नाहीं; मित्रमंडळींना ती समजत नाहीं. अनोळखी लोकांना मात्र एक प्रकारचें कुतूहल वाटतें. कांहींहि असो! मला मात्र त्या भाव–समाधींत आनंद होत असतो. ही सवय नसती तर जीवनांत आजवर आलेल्या संकटांशीं झुंझतांना मी अभंग राहिलों नसतों. तेव्हां छंदानें माझ्या जीवनांत तरी क्रान्ति केली आहे. ● ● ●

## विचार, उच्चार आणि आचार

चित्ते वाचि क्रियायां च साधूनामेकरूपता।

विचारसरणी, वाणी आणि करणी यांच्यांतील ही एकवाक्यता फक्त साधुसंतांच्या बाबतींतच दिसून येते. त्यांच्या पाठीमागें तपातपांचें तेज असतें. परंतु आपण सामान्य माणसें मनांत आणतो तें उच्चारीत नाहीं आणि उच्चारतो त्याप्रमाणें वागत नाहीं. आपल्याला त्याप्रमाणें वागायचें नसतें असें मात्र नाहीं. पण तें वागणें तितकेंसें सोपें नाहीं. 'बोले तैसा चाले, त्याचीं वंदावीं पाउलें' या रामदासांच्या चरणांतील अर्थ वरीलप्रमाणेंच आहे. आधीं मनांत विचार येतात फार थोड्यांच्या. त्या विचारांप्रमाणें वागायला मनाची बैठक तयार व्हावी लागते. जीवनांत हरघडीं आपला तोल जाण्याचा प्रसंग येतो. तो सांवरण्यासाठीं मनावर संयम ठेवावा लागतो. अशा संयमी माणसाच्या शब्दालाच लोक मान देतात; त्याला आदर्श समजतात.

संतांच्या ओठांवर खुलून दिसणारें वरील सुभाषित तुमच्या आमच्या आचरणांत कितीसें येऊं शकतें? आणि आणण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला जगतां येणार नाहीं. सकाळीं उठल्यापासून रात्रीं आडवें होईपर्यंत अनेक तऱ्हेचे विचार आपल्या मनांत येतात. त्या विखुरलेल्या विचारांना सूत्रबद्ध न करतांच आपण ते आल्या–गेल्याच्यावर उधळीत सुटतो. तसें करण्यांत मनाला एक प्रकारचा आनंद होतो खरा, पण त्यामुळें उच्चाराकडून आचाराकडे जाण्याचा जो मार्ग असतो तो बराचसा दूर जातो. ध्येयवादी माणसाचें मन हर्षानें हुरळून जातां कामा नये. नाहीं तर गर्दींत गुंतलेलें मन त्याला पुढें खेचतां येणार नाहीं,

आणि अनावर होऊन चौखूर उधळलेलें मन त्याला मागें ओढतां येणार नाहीं. मन हें वारा प्यायलेल्या वासराप्रमाणें असतें. एकदां हातांतून त्याचं दावें सुटलें कीं तें आवरणें कठीण होतें. ओठावर येऊन थडकलेले शब्दसुद्धां भूतकाळांतील विचार आणि भविष्यकाळांतील आचार यांत किती अंतर आहे याचा विचार न करतां भरारी मारतात. पंखांतील शक्ति न अजमावितां घरट्याभोंवतीं भिरभिरणाऱ्या पांखरानें आकाशाची उंची मोजायचें ठरविलें तर त्याला धूळ खावी लागेल आणि त्याची

'मातींत ते पसरले अतिरम्य पंख
केलें वरी उदर पांडुर निष्कलंक'

अशी स्थिति होईल.

विचार आणि आचार यांत शब्दशः उच्चाराइतकेंच जरी अंतर असलें तरी प्रत्यक्ष तें जमीन-अस्मानाइतकें आहे. मनांत फुललेल्या विचारांचा सुगंध जनांत दरवळण्यापूर्वी ते संयमाच्या सूत्रांत एकत्र बांधावे लागतात, त्यांचा सुबकसा गुच्छ करावा लागतो. नाहीं तर स्वैर उधळल्या गेलेल्या पाकळ्यांप्रमाणें ते केव्हांच निर्माल्यवत् होतील. ● ● ●

## अंतरींचें धावे स्वभावें बाहेरी

जसा ज्याचा भाव असतो तसा त्याचा स्वभाव असतो. रोजच्या व्यवहारांत मनुष्य अनेक मुखवटे लावून फिरतो. घटका बदलली, प्रसंग बदलला कीं मुखवटा बदलला. हें जरी खरें असलें तरी प्रत्येकाचा पिंड वेगळा असतो. प्रत्येकाच्या मनाचा घाट निराळा असतो. हा पिंड अगर घाट जसा उपजत असतो तसाच तो परिस्थितीनें आणि वातावरणानें तयार असतो.

तुकारामाच्या अभंगाच्या वरील भागाचा अर्थ असा आहे कीं, चंदनाला आपल्या गंधाची दवंडी पिटावी लागत नाहीं. 'मेघ आला, आतां नाच!' म्हणून मयूराला इषारा द्यावा लागत नाहीं. तसेंच व्यक्तीचा जो देहस्वभाव आहे तो, त्यानें कितीहि आवरण्याचा प्रयत्न केला तरी, कळत नकळत बाहेर यावयाचाच.

'वाघ्याचा झाला पाग्या, तरी त्याचा येळकोट जाईना', 'कडू कारलें तुपांत तळलें किंवा साखरेंत घोळलें तरी कडू तें कडूच' आणि 'स्वभावाला औषध नाहीं' या म्हणी स्वभावधर्माच्याच द्योतक आहेत. मोत्याच्या माळेचें मोल

मानिनीला कळतें, माकडाला नाहीं कळत. तो तिचा उपयोग बसावयासाठींच करणार. माणसाचें आचरण हें मनोधर्माप्रमाणें घडत असतें. एखादी गोष्ट हातून घडण्यापूर्वी, आधीं कांहीं वेळ तरी तिचा विचार मनांत घोळत असतो. पाणी जसें ज्या आकाराच्या भांड्यांत ठेवलें असेल त्याचा आकार घेतें तसेंच विचार, विलास अगर विकार हे त्या त्या मनाचे आकार घेऊन बाहेर येत असतात ●●●

# माणसें आणि मतभेद

ज्या व्यक्तीला मन आहे ती आपल्या जीवनासंबंधीं विचार करणारच. विचार मनांत आणावे लागत नाहींत, ते आपोआपच येतात. त्या विचारांतून तिचा एक जीवनविषयक दृष्टिकोन बनतो. त्यालाच आपण मत असें म्हणतों.

'पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना' या संस्कृत सुभाषिताप्रमाणें प्रत्येक व्यक्तीचें मत वेगळें असणारच. भिन्न धर्मांचीं, जातींचीं आणि विचारांचीं माणसें एकत्र येतात तेव्हां मतभेद उत्पन्न होतो. मतभेद ही भांडणापूर्वीची पायरी होय.

कोणत्याहि व्यक्तीनें मतभेदाच्या पायरीपर्यंत जाणें म्हणजे त्या व्यक्तींत कांहीं कमी आहे असें नव्हे, उलट स्वतंत्र विचारांची ती व्यक्ति आहे, असा तिचा गौरवानें उल्लेख केला जातो. विचारशील मनुष्य वाढत्या वयाबरोबर मनानेंहि तितकाच वाढत असतो. सामान्य व्यवहारांत गुंतलेल्या माणसाला ती पातळी गाठतां येत नाहीं. त्याला क्रोध आवरतां येत नाहीं. मोहाला लगाम घालतां येत नाहीं. दुसऱ्याच्या उत्कर्षांतून उत्पन्न झालेल्या द्वेषाला मुरड घालतां येत नाहीं. याचें कारण तो संयमी नसतो. मनावर ताबा असल्याशिवाय, तें सहनशील असल्याशिवाय दुसऱ्याशीं झालेल्या मतभेदाकडे त्याला कानाडोळा करतां येणार नाहीं. ह्या संयमाचा जन्म सदसद्विवेक बुद्धीच्या पोटीं होतो.

वर वर्णन केलेले व्यक्तिगत मतभेद सोडले तर संतांच्या, मुत्सद्द्यांच्या आणि जेत्यांच्या जीवनांत असे अटीतटीचे मतभेद येतात कीं, राष्ट्राच्या किंवा विश्वाच्या बऱ्याकरितां झटणाऱ्या ह्या लोकांना हांसत मृत्यूच्या ज्वालेला मिठी मारावी लागते. विश्वाला घरकुल मानणारे संत, राष्ट्राच्या नकाशाचा रंग पालटूं पाहणारे मुत्सद्दी आणि बुरुजासारख्या छातीवर वज्राचे आघात झेलूं पहाणारे जेते आजवर किती

तरी प्रसंगीं लोकमताला बळी पडलेले आहेत. लोकमत हें वावटळीप्रमाणें असतें. वावटळींत सांपडलेला पक्ष्यांचा थवा सहारा वाळवंटांत जाऊन पडेल कीं नंदनवनांत जाऊन पडेल हें सांगतां येत नाहीं, त्याप्रमाणें लोकमताला बळी पडलेल्या कार्यकर्त्या व्यक्तीचें जीवन कुठें झुकेल हें सांगतां येणार नाहीं.

माणसांचे जसे प्रकार आहेत, तसेच मतभेदांचेहि आहेत. तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांच्या अभ्यासांतून निर्माण होणाऱ्या मतभेदामुळें आपण चिकित्सक बनतो. विद्यालयीन अभ्यासांतील मतभेद आपल्याला ज्ञानोपासनेच्या दृष्टीनें उत्कर्षाकडे नेणारे असतात. सामाजिक मतभेदामुळें पुष्कळ वेळां आयुष्य बरबाद होतें; पण राजकीय तत्त्वाला कवटाळणाऱ्या व्यक्तीला प्राणाचें दान द्यावें लागतें. ● ● ●

## पत्रें

प्रत्येकजण कांहीं लेखक नसतो, पण कित्येकजण उत्तम पत्रलेखक असतात हें मला माहित आहे. ‘ पत्र म्हणजे अंतःकरणाचें चित्र ’ अशी जर पत्राची व्याख्या केली तरी ज्याला आपले विचार योग्य शब्दांत व्यक्त करतां येतात तो चांगला पत्रलेखक म्हणतां येईल. इतर साहित्याप्रमाणें पत्रलेखन हीसुद्धां एक कला आहे. तिला घटकेची प्रतिभा पुरते.

मी पत्रलेखनास सुरवात केली ती अशीच योगायोगानें. माणसावर संकटें आलीं कीं मन तळमळूं लागतें. विचारांना आंदोलन मिळतें. ती व्यक्ति जर भावनाप्रधान असेल तर आपले विचार स्वगत बोलूं लागते. अशीं शेकडों पत्रें माझ्या हातून लिहिलीं गेलीं आहेत. परंतु पाठविलेल्या पत्रांपेक्षां न पाठविलेलीं पत्रेंच माझ्या मनोविकासास कारणीभूत झालेलीं आहेत. पाठविलेल्या पत्रांतील भावना लिहितांना आपल्या मनावर ठसतात तेवढ्याच. परंतु ज्याच्याकडे त्या निळ्या पाकिटांतून प्रवास करतात, तो मात्र तो अमोल ठेवा जपून ठेवीत असतो. आणि मग आपल्याला, दूर देशीं गेलेल्या मुलाची आठवण मातेला बेचैन करते, तसें होतें. म्हणून लिहिलेलीं पत्रें न पाठविण्याकडेच माझा कल आहे. त्या पत्रांत कधीं मला स्वप्नांच्या इंद्रधनुष्यांचे रंग दिसतात; तर कधीं पिंजऱ्यांत कोंडल्या गेलेल्या गरुडाच्या उध्वस्त पंखांचीं पिसें

दिसतात. तीं पत्रें वाचतांना आयुष्यांतील अनेक प्रसंगांची माझी उजळणी होते आणि पुढील कार्य करण्यास मला जोम येतो. ज्यांना तीं पत्रें पाठवावयाचीं असतात तीं जीवाभावाचीं माणसें आपल्याला बिकट प्रसंगीं सावरणारीं असतात, सांभाळणारी असतात. जिवन हा तारेवरचा नाच आहे. तो नाच करणाऱ्या माणसाला धीर देणारा त्या तारेखालीं ढोलकें वाजविणारा कुणीतरी असतो. त्या ढोलक्याच्या तालावर त्याच्या कर्तबगारीचा तोल अवलंबून असतो. असा तोल सांभाळण्याचें काम हीं पत्रें करतात.

पत्रांतसुद्धां विविध प्रकार आहेत. ‘ मुद्दाम पत्र लिहिण्यास कारण कीं...... ’ अशी परंपरागत चालत आलेली पत्राची सुरवात केलेली पाहिली कीं मी तें पुरें वाचीतहि नाहीं. पुढें काय असणार हें आपण जाणूं शकतों. त्यांत उत्कंठा नसते, विस्मय नसतो. व्यवहाराच्या गोष्टी पत्रांत लिहूंच नये असें मला वाटतें. वडील मंडळींकडून आलेल्या नैमित्तिक पत्रापेक्षां आईनें पदरावर लिहिलेलें अश्रूंचें पत्र... त्याच्या वाचनानें जीवन मंगल होतें. कालांतरानें पत्रांतील शाई उडून जाते, पण आसवांनीं काढलेल्या मानस-चित्रांतील रेषा-वलयें आणि रंग-रूप पुसलें जात नाहीं. पत्रांतील भावनेनें करपलेलें मन पुन्हां फुलून जायला हवें. दोन माणसांचीं दूरावलेलीं हृदयें प्रेमाच्या रेशमांनीं पुन्हां बांधलीं जायला हवींत. केवळ रक्ताचीं नातीं सांभाळण्यासाठीं लिहिलेलीं पत्रें मला रूढीच्या, नीतीच्या आणि व्यवहाराच्या दोरखंडासारखीं वाटतात. पण प्रिय माणसाच्या दर्शनासाठीं उत्सुक झालेल्या मनाचा आविष्कार जेव्हां पत्रांतून होतो, तेव्हां त्यांतील शब्दांचा पीळ रेशमी लड्यांसारखा असतो.

अशा अनेक रेशमी लड्या माझ्यापाशीं आहेत. ज्या ज्या वेळीं जग मला कवडी किंमतीनें वागवितें तेव्हां मी हीं पत्रें घेऊन गवाक्षांतील आरामखुर्चीवर बसतों. त्या घटकेपुरतीं जीवाभावाच्या व्यक्तींना लिहिलेलीं परंतु न पाठविलेलीं तीं पत्रें माझ्या मनाला विरंगुळा देतात. ● ● ●

## जगरहाटी

एखाद्या व्यक्तीची अखेरची यात्रा लोक भजन करीत काढूं लागले कीं मला माणसाच्या स्वभावाचें हंसूं येतें. खरें म्हटलें तर जी व्यक्ति जगाला सोडून गेली तिच्याबद्दल रडायला हवें. अश्रूंनीं तिला अभिवादन करायला हवें. परंतु अशा

प्रसंगीं मला रडूं येत नाहीं. उलट मी मनाशीं म्हणतों, 'सुटलास बाबा! चिरंजीव होण्यासाठीं तूं या जगाला रामराम करून शिवांत विलीन झालास.' भजन मंडळींच्या मुखीं चाललेला हरिनामाचा गजर ऐकिला कीं संतांच्या अभंगांचा तो दुरुपयोग होत आहे असें मला वाटतें. जन्मभर एखाद्याला मरेपर्यंत मारायचा, त्याचें जीवन कलंकित करण्याचा प्रयत्न करायचा, आणि मेल्यावर हिमधवल वस्त्रानें त्याचा देह झांकायचा, यांत मला विसंगति दिसते. पण जग-रहाटी ही अशी आहे. उसन्या आवेशानें एखाद्या प्रेताला खांद्यावरून घेऊन जाणारी ही मंडळी पाहिली कीं, मला वाटतें, त्या प्रेताची मान नन्ना करीत असतांना देखील कां बरें हें त्याची ओढाताण करीत आहेत?

भावकवि यशवंत यांनीं या विषयावर 'जगरहाटी' या नांवाची अत्यंत सुंदर कविता लिहिली आहे. तिचा अर्थ पुढील शब्दांत सांगतां येईल.

'जगाची तऱ्हा नेहमीं उफराटी असते. पानापानांतून फुललेल्या आपल्या बागेंतील एकहि फूल तें कोणाला देणार नाहीं, आणि तो मेल्यावर मात्र त्याच फुलांनीं तें तिरडी बुडवून काढील. उत्कर्षाच्या चढणी स्वतःच्याच पायानें चढणाऱ्या एखाद्या व्यक्तीच्या पायीं तें कांटेकुटे अंथरील, दगडधोंडे पसरील; परंतु मेल्यावर त्याला खांदा देण्यासाठीं तें अहमहमिकेनें पुढें येईल. गोड शब्द बोलायला मोल पडत नाहीं. परंतु जिवंतपणीं हें जग एखाद्यावर टीकेची झोड उठवतें आणि त्याच माणसाची स्मशानांतील अखेरची घटका स्तुति-स्तोत्रांनीं दुमदुमवून टाकतें. कधीं कुणाच्या हांकेला 'ओ' न देणारें हें जग त्याच्या कलेवराला मिठी मारून बसतें. एखाद्याच्या जीवनांत परिस्थितीची आग पेटली असतांना सहानुभूतीचा एक थेंबहि न देणारें हें जग त्याच्या देहावर आपल्या विहिरींतील घागरीवर घागरी ओततें. या जगांत भक्तिभावानें गोळा केलेले चार मित्र औटघटकेचे सोबती ठरतात, अडीअडचणीच्या वेळेस आपल्याला सोडून जातात आणि अखेरच्या क्षणीं येशूप्रमाणें माथीं खिळेठोक झाली असतांना, हाल हाल होऊन मृत्यु आला असतांना, हें जग त्याच्या अस्थीवर देवालय बांधतें. जिवंतपणीं एखाद्याच्या दर्शनानें दारें बंद करणारें, त्याला उंबरठ्यांतूनच मागें परतविणारें जग त्याची आरती करतांना डोळ्यांत आसूं आणतें. जन्मभर एखाद्याला सतावून झाल्यावर तो मृत्यूची शीव ओलांडून जातांना हें जग आपल्या अंतःकरणांतील सारा प्रेमभाव व्यक्त करतें.'

या ठिकाणीं जग हें व्यक्तिवाचक नसून प्रवृत्तिवाचक आहे. मानवी स्वभावाचा तो एक मासला आहे. जवळच्याचा तिरस्कार करायचा आणि तोच दूर गेल्यावर त्याच्या गुणांचा गौरव करायचा हा जगाचा सामान्यतः मनोधर्म आहे. ● ● ●

## मरणांत खरोखर जग जगतें!

कविवर्य तांब्यांच्या एका कवितेचें हें शीर्षक आहे. जगाच्या कल्याणाकरितां क्षणाक्षणाला मृत्युतुल्य क्लेश सोसणाऱ्या व्यक्तीच्या मरणानें जगाचा विकास होतो, असा या चरणाचा भावार्थ आहे.

स्वातंत्र्याच्या रक्षणासाठीं धारातर्थी लढत असतां अखेरच्या घटकेपर्यंत हातांतील ध्वज न सोडणारा सैनिक, सर्वस्वाचें दान देणारा एखादा कर्ण, पतीच्या सुखासाठीं निखाऱ्यावरचें जीवन जगणारी पत्नी, आजाऱ्यांची शुश्रुषा करतां करतां आपणच शुश्रुषेवांचून मरणारी सेविका, एखादा भ्रमिष्ट एकशें आठ वेळां अंगावर थुंकला तरी सुद्धां सयमानें संध आवरून तितक्याच वेळां स्नान करणारे समर्थ, छत्रपतींकडून आहेर म्हणून हिऱ्या–मोत्यांचीं ताटें भरून आलीं असतांना 'निराशेचा गांव दिधला आम्हांसी' म्हणणारे तुकाराम, चौदा–चौकड्यांचें राज्य पायाशीं लोळत असतांना राष्ट्रासाठीं फकीरी पत्करलेले जवाहिर यांच्या जगण्यांत जगाचें जीवन आहे. 'मी जगतां जगविन मूल्यें माझी प्यार' असा त्यांचा बाणा असतो.

'प्राणी जन्माला आला–पाणी वाहतां वाहतां मेला' अशी बहुसंख्या लोकांची स्थिति असते. पावसाळ्यांत मातीच्या पोटीं वळवळणारे कृमि–कीटक जन्माला येतात आणि तेव्हांच स्वातिनक्षत्रांत सागराच्या तळाशीं असलेल्या शिंपल्यांत मोतीहि तयार होतात. पहिल्याचें अस्तित्व पावसाळ्यासह सरतें आणि दुसरें विश्वाच्या कंठीं विराजमान होतात. क्षणाक्षणाला सुखी जीवन जगणाऱ्यांचें मरण ते जगत असतांनाच येत असतें. काळ त्याची मोजदाद करीत नाहीं. तो केवळ परोपकारासाठीं जगणाऱ्या विभूतींची विचारपूस करतो. त्या व्यक्तीचें आयुष्य सरलें तरच काळाचे डोळे ओले होतात. त्या अश्रूतच पतित जगाचा उद्धार करण्याचें सामर्थ्य असतें. ● ● ●

## यमुनेच्या सान्निध्यांत

पुण्यक्षेत्रें ओळखिलीं जातात तीं त्या त्या नद्यांच्या तीर्थांमुळें. या बाबतींत गंगा आणि यमुना या हिमराजाच्या दोन मुली मोठ्या भाग्यवान म्हटल्या पाहिजेत. त्यांपैकीं गेल्या वैशाखांत मला यमुना पहाण्याचा योग आला. अलाहाबादनजीक प्रयाग येथें गंगायमुनेचा संगम होतो. नौकेतून त्या संगमापर्यंत जातांना अनेक विचार माझ्या मनांत आले—

८१०३

'गंगे गोदे यमुने माझा नोहे तुम्हांचि हा बाळ
जतन करी गे यासी स्वाधीन केला न कांपितां नाळ'

या कुंतीच्या आर्त उद्गारांतील अश्रु डोळ्यापुढें उभे राहिले. चिंतामणि पेठकर, कुरुंदवाडकर आणि बाळकृष्ण मल्हार हंस या तिघांचीं 'गंगावर्णनें' मनानें पुन्हां एकदां वाचिलीं. संगमावर गेलों तेव्हां दोघींचें वेगळेंपण माझ्या मनांत ठसलें. दोन मनें भावनेनें एकत्र आलीं, तरी रंगानें वेगळीं राहूं शकतात. एकाच पित्याच्या दोन ठिकाणीं दिलेल्या दोन मुलींवर त्या त्या घराण्यांचे संस्कार होतात तसेंच गंगा–यमुनेचें जीवन आहे. पण गंगा–जलाची थोरवी मान्य करू-नहि मी सांगतों कीं यमुनाच मला जवळची वाटते.

यमुनेचें तीर! यमुनेच्या तीरावर प्रीति, भक्ति आणि शक्ति या तिन्हीहि सारख्याच रमल्या आहेत. अर्जुनाला भगवत्गीता सांगणाऱ्या श्रीकृष्णाचें जीवन यमुनेच्या निळ्या जलावर पोसलें होतें. तेथेंच त्यानें कालियामर्दन केलें. जगांतलि एक अतुल शिल्प म्हणून ज्या ताजमहालचा उल्लेख केला जातो, तो आग्ऱ्या-जवळ यमुनेच्या तीरावरच आहे. आणि जगाला अहिंसेचा मंत्र जपण्यास सांगणाऱ्या महात्म्याची समाधि राजघाटावर आहे. काय योगायोग पहा? सात–आठ दिवसांच्या प्रवासांत यमुनेचें दर्शन मला तीन ठिकाणीं घडलें. पहिलें दिल्लीला, दुसरें आग्ऱ्याला आणि तिसरें अलाहाबादला. किती दूरवरचा प्रवास आहे हा? कोंकणांत वीस-पंचवीस मैल वहात जाणारी नदी असली कीं आम्हांला ती महानदी वाटते. मग शेकडों मैलावरची भूमि फुलवीत जाणाऱ्या गंगा–यमुनेसारख्या नद्यांच्या सान्निध्यांत आपणाला काय वाटेल? दिल्ली आणि आग्रा यांच्यामध्यें मथुरा आहे. मथुरेचें वैभव आपण कथा–पुराणांतून वाचतों.

ताजमहाल पहाण्याचें कितीतरी दिवस माझ्या मनांत होतें. जगाला आपल्या सौंदर्यानें थक्क करून टाकणारा ताजमहाल प्रत्यक्षांत आपण कधीं पाहूं कीं नाहीं याची मला शंकाच होती. ती मनीषा गेल्या वर्षी सफल झाली. पण आज माझ्या मनांत विचार येतात ते यमुनेचे. पाहिलेली वस्तू परत पहावीशी वाटणें, हीच तिच्या सौंदर्याची कसोटी होय. मला जर तिच्या तीरावर राहण्याचा योग आला तर तिथें मी एक छोटीशी झोपडी बांधीन. चांदण्या रात्रीं रुपेरी वाळूवर रेलून बसलों असतांना माझी प्रतिभा कधीं श्रीहरीच्या कुंजवनांत, कधीं ताजमहालच्या प्रणयसृष्टींत, तर कधीं राजघाटाच्या अध्यात्मिक परिसरांत संचार करून येईल. सामान्य माणसाच्या जीवनांत उत्कट प्रसंग येत नसतात. त्याला थोरांच्या आयुष्यांत आपलें जीवन उजळावें लागतें. यमुनेच्या तीरावर अशी शेंकडों कुटुंबें असतील कीं त्यांना तिचें महत्त्व वाटत नसेल.

‘ नदी सुदूरस्थ जनां पवित्र
विटाळिती तीर्थ तिचेच पुत्र ’

ही कविवाणी माझ्याहि लक्षांत आहे. तरी पण यमुनेच्या दर्शनापासून माझ्या मनांत सारखें येतें कीं तेथें माझी एक पर्णकुटी असावी. तिचें नांव मी ‘ निळें स्वप्न ’ ठेवीन. पण गरिबांचे बेत हे कविसंकेताप्रमाणें असतात. ते कधीं सत्यांत उतरत नाहींत. ● ● ●

## दे जयांचें तयां वीरभद्रा

रुद्र ही विश्वांतील दुष्टांचें दमन करणारी एक शक्ति समजली जाते. रुद्र म्हणजे शंकर. कविवर्य तांब्यांच्या ‘ रुद्रास आवाहन ’ या कवितेंत रुद्रास अवतार घेण्याची विनंति केली आहे. सज्जनांचा छळ करण्यांत दुष्ट नेहमींच समाधान मानीत असतात. राम–रावण, कृष्ण–कंस, कौरव–पांडव या जोड्या व्यक्तिवाचक नसून भाववाचक आहेत. त्या त्या प्रवृत्तीचा बोध त्यांच्या नांवांतून आज शतकानुशतकें लोक घेत आले आहेत. पण जगाच्या आदिकाळापासून मानवी-जीवनांत सुरू झालेला हा झगडा अंतकालपर्यंत चालणार. ह्या प्रवृत्ती चिरंतन आहेत. त्या संस्कारांतून जन्माला येत असतात. अहंकार सौजन्याला चिरडतो. दानव देवांची चिरफाड करतात. सत्ताधीश आपल्या अरेरावी वृत्तीनें दलित–दुबळ्यांवर

आक्रमण करतात. स्थळ-काळ विसरून या वृत्ती माणसाच्या मनांत आज ठाण मांडून बसलेल्या आहेत.

के. तांब्यांच्या कवितेंतील वरील चरणाचा भावार्थ असा आहे.

' या जगांत आज स्थानांची आणि मानांची उलटापालट झालेली आहे. नालायकाला रत्नजडित सिंहासनावर बसण्याचा मान मिळत आहे, आणि सत्प्रवृत्तीनें आयुष्यांतील घटका-पळें मोजणारा कोंड्याच्या मांड्यावर जगत आहे. प्रत्येक माणसाला आपल्या योग्यतेचें स्थान मिळालें नाहीं तर जगांत अनर्थ माजेल; सगळीकडे दानवांचें साम्राज्य माजेल. तेव्हां हे रुद्रा ! जहरी कालियाचें तूं जसें मर्दन केलेंस तसें दुष्टांचें दमन करण्यासाठीं आज तुझी आवश्यकता आहे. ' संभवामि युगे युगे ' म्हणून अर्जुनाला गीता सांगतांना तूं आश्वासन दिलें आहेस, तें खरें करून दाखव. ' ● ● ●

## परिस्थिति आणि ध्येय

' स्थितीचा असें किंकर प्राणिमात्र '

मनुष्य हा परिस्थितीचा दास आहे, अशा अर्थाचे शब्द आपण नित्यशः ऐकतो. परिस्थिति माणसाच्या मनावर आघात करते, ही गोष्ट सत्य आहे. परंतु त्या आघातानें मन दुबळें न होऊं देतां, ढळमळूं न देतां, जो तिला ताब्यांत ठेवतो, तो मनुष्य मोठा होय. अशांच्याच दृष्टीपुढें जो हेतु उभा असतो त्याला आपण ध्येय म्हणतो, आणि त्या माणसाला ध्येयवादी म्हणतो.

'एकच तारा समोर आणिक पायतळीं अंगार ' अशा तऱ्हेची, कुसुमाग्रज लिहितात त्याप्रमाणें, ध्येयवादी माणसाची मनोवृत्ति असते. पायाखालीं आग आणि दृष्टीसमोर स्वप्नांची फुलबाग असा त्यांचा प्रवास असतो. परिस्थितीचें बुजगावणें लहान-मोठ्या प्रमाणांत प्रत्येकालाच असतें, पण धीरोदात्त व्यक्तीला तेंच निर्भयतेनें, लीलेनें हातांत घेऊन त्याचें खेळणें करावें लागतें. जयश्री ही नेहमीं धाडसी माणसाच्या गळ्यांत माळ घालीत असते. तिचें स्वयंवर पराक्रमी पुरुषांशीं होतें. भेकडांच्याकडे ती कटाक्षहि टाकीत नाहीं.

इतिहासाचीं पानें चाळून पाहिलीं असतां आपल्या डोळ्यांसमोर जीं नवरत्नें उभीं राहतात, त्यांचें तेज आघातांतून निर्माण झालेलें आहे. ‘ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें’ या तुकारामाच्या वचनांत दुबळ्या, निराशावादी विचारसरणीचा पुरस्कार नाहीं, तर परमेश्वरानें आपल्याला जें कांहीं दिलें असेल, त्यांतून सत् प्रवृत्ति फुलवितां आली तर फुलवावी; दुसऱ्यांचें चांगलें करतां आलें तर करावें; नाहींतर पांडुरंगाच्या चरणीं मस्तक ठेवून अभंगांत दंग व्हावें, असा त्याचा अर्थ आहे. तुकाराम कांहीं निष्क्रियतेंत लोळत नव्हता. त्याला सुद्धां अन्यायाची चीड होती, सत्याची चाड होती, पराक्रमाची पारख होती.

‘प्राणी जन्माला आला–पाणी वाहतां मेला’ अशीच बहुसंख्य माणसांची गत असते. ‘अवघाचि ससार सुखाचा करण्यासाठीं’ बहुतेकांची धडपड असते. नऊदशांश माणसें माझे–तुझेच्या वर्तुळांत वावरत असतात, मतलबासाठीं मरत असतात,स्वार्थानें आंधळी झालेलीं असतात. त्यांना भोवतालचें दिसत नाहीं.अशांच्या ओठीं नेहमींच परिस्थितीचें तुणतुणें किणकिणत असतें. परतु जे काळाच्या डफावर तडफेनें थाप मारतात, आपल्या विचारसरणीचे साद जगाला ऐकवितात, त्यांना परिस्थितीचें कांहीं वाटत नाहीं. तेव्हां परिस्थिती ही डांबरी रस्त्यावरील रेती दडपण्यासाठीं वापरलेल्या रुळासारखी असते. त्या रुळाचें चाक जो ताब्यांत ठेवूं शकतो, तोच जनतेसाठीं हमरस्ते तयार करतो. इतर बहुसंख्य लोक सुखाच्या साखरेचे कण घेऊन जाणाऱ्या मुंग्यांप्रमाणें पळत असतात. त्यांना दिशा नसते. परिस्थितीच्या झुळुकनेंहि त्या उडून जातात. मग झंझावाताची गोष्ट कशाला? ● ● ●

# जें न देखे रवी

कविप्रतिभेबद्दल लोकांचे अनेक समज आहेत. काव्य हें एक प्रकारच्या वेडाच्या लहरींतून निर्माण होतें. असे कुणी म्हणतात, तर कुणी प्रतिभेला दैवी-शक्ति समजतात. कवि हा दूर असेल तर लोकांच्या कौतुकाचा तो एक विषय होऊन बसतो; तोच जवळ असेल तर त्याच्यांतील गुणांपेक्षां दोषांचेंच मूल्यमापन कित्येकवेळां केलें जाऊन त्याच्याकडे कुत्सित नजरेनें पाहिलें जातें. कवि हा जगावेगळा असतो हें सत्य आहे. पण त्याला जर इतरांपेक्षां वेगळी कृति निर्माण करावयाची असते तर तिच्या निर्मितीसाठीं लागणारी समाधि लावावयास त्याला

वेळ नको काय? वेळींअवेळीं ओंठावर स्फुरणाऱ्या भावना शब्दबद्ध करण्यासाठीं गुणगुणावयास नको काय? असामान्य कलेची त्याच्यापासून अपेक्षा करावयाची तर सामान्य माणसाच्या दैनंदिन कार्यक्रमाची जंत्री त्याच्यापुढें ठेऊं नये!

'दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके'

केशवसुतांच्या 'आम्हीं कोण' या कवितेंत कलावंताच्या शक्तीचें दिव्यत्व वरीलप्रमाणें वर्णिलें आहे. दिशांचें आणि काळाचें बंधन अमुच्या दृष्टीला नाहीं, असा त्यांच्या म्हणण्याचा आशय आहे. पण याचा लौकिक अर्थ काय? रोजच्या भाषेंत तो असा मांडतां येईल.—'कवि हा चिंतनशील असतो. त्याचें मन संवेदनाक्षम असतें. सायंकालीन झुळुकीनें खिडकीचा झिरझिरीत पडदा जसा आंदोलित होतो, तसेंच कवीचें मन रोजच्या जीवनांत हरघडी येणाऱ्या प्रसंगानें भावनेच्या आहारीं जातें. एकदां मनांत त्या भावनेचा अंकुर उगवला कीं ती डुलूं लागते. त्याच्या मदतीला गतकालांतील अनुभव आणि भविष्यकालांतील स्वप्नें धांवून येतात. तो मनांतील विषयाखेरीज स्वतःचें अस्तित्व विसरून जातो. भोंवतालच्या जगाकडे तो केवळ चर्मचक्षूनें पहात असतो. त्याची अंतर्दृष्टि कुणालाहि न सांपडलेलें श्रेय शोधीत असते. त्याचे ओंठ मनांतील अमूर्त भावनांना शब्दरूप देण्यासाठीं धडपडत असतात. एखाद्या घटकेला तो वेदकालीन ऋषिमुनींच्या आश्रमांत जाऊन येईल, तर दुसऱ्या एखाद्या घटकेला भारताचें उद्यांचें भविष्य सांगतांना तो, 'आई, गुरुस्थान अंतीं जगाचें तुझें' असें रे. टिळकांच्या मुखांतून बोलूं लागेल.

सूर्य सहस्राक्ष असतो, तरी तो पृथ्वीचा अर्धगोलच प्रकाशित करूं शकतो. आणि कवि? आपल्या शब्दांच्या तेजानें त्रिभुवन उजळूं शकतो. कविप्रतिभेचें यांतील अतिशयोक्तिपूर्ण वर्णन कमी केलें तर एवढेंच म्हणतां येईल कीं 'एकदां कां कविमन विषयाशीं तादात्म्य पावलें कीं वाऱ्याच्या वेगानें तें ब्रह्माण्डाला प्रदक्षिणा घालून येईल आणि जें पाहिलें त्याचें ताऱ्यांच्या तेजांत वर्णन करील'

## थांबला तो संपला

'सागराची भरती आणि कावळ्याची फिरती' कुणासाठीं थांबत नाहीं. त्यांच्याबरोबर जो जातो तो पुढें जातो. बाकीचे सारे गर्दीतच रेंगाळत रहातात.

मनुष्य हा गतजीवनाचे पोवाडे गाणारा भाट आहे. आपल्या पूर्वजांची थोरवी तो रसभरित वर्णन करून सांगतो. पण ती सांगतांना तो इतका तल्लीन होतो कीं, आपण दिवसेंदिवस खालीं जात आहोंत, आपली अवनती होत आहे, हें त्याच्या लक्षांत येत नाहीं. आपल्या पूर्वजांनीं दिल्लीपर्यंत मारलेल्या मजलीचा इतिहास त्याच्या मुखोद्गत असतो. पण आपला पुरुषार्थ क्षणजीवि माशा मारीत बसला आहे, हें त्याच्या लक्षांत येत नाहीं.

रविकिरण मंडळांतील प्रमुख कवि माधव ज्यूलियन यांच्या 'भ्रांत तुम्हां कां पडे ?' या कवितेंतील वरील चरणार्थ आहे. त्यांच्या म्हणण्याचा हेतू हा, 'पूर्वजांच्या थोरवींत रंगून जातांना आजच्या बदलत्या काळाकडे लक्ष दिलें पाहिजे.' पराक्रमाची व्याख्या कालमानाप्रमाणें बदलत असते. एके काळीं तरवारीच्या धारेवर जगावर जरब बसविणारा योद्धा शिकंदर समजला जात असे; पण आज जन-मनाचें सिंहासन आपल्या गुणानें जिंकणारा 'चिंतामणी' जगापासून मानाचा मुजरा स्वीकारतो. आजच्या कुमाराला उद्देशून बोलायचें झालें तर असें म्हणावें लागेल—

'बंदुक बरची निशाण भाला
आज कुमारा नको उशाला
सुगुण-सुमांचा गंध दिशाला
दरवळतां, होशिल दिग्विजयी
करि अढळपद तुझें जन-हृदयीं'

एकीकडे अंत्यजाचें मूल कडेवर घेणाऱ्या एकनाथाचा आम्हांस विसर पडत आहे आणि दुसरीकडे अस्पृश्यतेवरील कोरड्या वक्तृत्वानें आम्हीं कंठशोष करीत आहोंत. पूर्वजांचीं केवळ भजनें केल्यानें आपली प्रगति होणार नाहीं. स्फूर्तिस्थान असलेल्या गुणांची आरती पापण्यांतील अश्रू देखिल गाऊं शकतात. तेव्हां पूर्वजांच्या कीर्ति-मंदिरांतील गुणांच्या दैवतांचें क्षणभर दर्शन घ्या आणि वीराच्या वेगानें पुढें व्हा!'

'कायदा पाळा गतीचा काळ मागे लागला
थांबला तो संपला
धांवत्याला शक्ति देई आणि रस्ता सांपडे'

असें हें सर्व कडवें आहे. ज्याला स्वतःची गति नाहीं, तो काळाबरोबर पावलें टाकूं शकणार नाहीं. काळ हा तडफदार माणसाला आघाडीवरचें स्थान देतो, रेंगाळणाऱ्या माणसाला कोपरखळ्या देऊन बाजूस सारतो आणि चेंगट माणसाला ओलांडून पुढें होतो. ● ● ●

## हें विश्वचि माझें घर

गीतेच्या बाराव्या अध्यायांतील खऱ्या 'भक्ताचीं लक्षणें' विशद करून सांगतांना ज्ञानेश्वरांनीं अनेक दृष्टांत देऊन अखेरीस—

'हें विश्वचि माझें घर
ऐसी मती जयाची स्थिर
किंबहुना चराचर
आपण जाहला'

ही ओवी लिहीली आहे. ज्ञानेश्वर म्हणतात, 'ज्याच्या ठिकाणीं विषमभावाची गंधवार्ताहि नाहीं, शत्रुमित्र हें दोन्ही ज्याला सारखेच होत, मानापमानाविषयीं ज्याची तुल्यबुद्धि असते, सुखदुःखें प्राप्त झालीं असतां जो मध्यस्थाप्रमाणें असतो, सकल जीवांपाशीं ज्याचें वर्तन सम असतें, त्रिभुवनाला जो हवाहवासा वाटतो, स्तुति-निंदेपासून जो अलिप्त आहे, जो आहे त्या स्थितींत संतुष्ट असतो,-सारांश 'सर्व विश्व हेंच माझें घर आहे' अशी ज्याची भावना आहे, त्याला मुगुटाप्रमाणें भगवंत आपल्या मस्तकीं धारण करतात.'

अर्जुनासारख्या उत्तम पुरुषाला उद्देशून वरीलप्रमाणें म्हटलें आहे. पुरुषोत्तमाला संध्येंत 'अच्युत' असें नांव आहे. मनुष्य हा क्षणाक्षणाला च्युत होत असतो आणि मरेपर्यंत त्याची धडपड वर चढण्याची, म्हणजे अच्युत होण्याची असते. कामक्रोधमोहादि षड्रिपूंची मोहमयी वांकडी नजर माणसावर फिरली कीं तो लोहचुंबकाकडे ओढला जाणाऱ्या पिंजऱ्यांतील पोपटासारखा हतबल होतो. त्याला ती गति थांबवितां येत नाहीं. कवि 'बी' म्हणतात—

'पूर्णापासुनि ढळलेलें जग जातें पूर्णाकडे'

मोहाचा पगडा बसला कीं माणसाचें मन ढळतें, ढासळतें. तो मग आपलें पातित मन चारचौघांपासून लपवितो.तुम्हीं–आम्हीं बहुसंख्य माणसें अशीच आहोंत. अभ्यासानें, अनुभवानें आणि निरीक्षणानें आपणांस शहाणें व्हावें लागतें. हें विश्वाचि माझें घर ही वृत्ति अंगीं मुरण्यापूर्वीं घराचा उंबरठा सुटला पाहिजे, माझें –तुझें ही द्वैत भावना, वेगळेपणाची जाणीव विरून गेली पाहिजे. दुसऱ्यांच्या जीवनांत खडीसाखरेसारखें वितळून गेलें पाहिजे.

'मळयास माझ्या कुंपण पडणें अगदीं न मला साहे' ही केशवसुतांची 'नव्या शिपायाची' मनोवृत्ति म्हणजेच 'हें विश्वाचि माझें घर' असें मानणें होय. परंतु ती अंगीं बाणणें फार कठीण काम आहे. ज्ञानेश्वरांसारख्या संतांनीं दाखवून दिलेल्या 'पाउलवाटेनें' प्रवास करणें हें आपणास अंतीं हितकारक आहे. ●●●

## आरसा

आरसा हा आपला एक निर्मळ मनाचा मित्र आहे. आपण जसें आहोंत तसें दाखविण्याचा त्याचा स्वभाव आहे. चंचल पाऱ्याशीं त्याचा संबंध आला असला तरी त्याचें अंतःकरण सोज्वल आहे आणि चेहरा तेजस्वी आहे. जितकी त्याची विचारपूस अधिक करावी तितका तो आपल्याशीं प्रामाणिक राहातो. चुकून झालेल्या आपल्या स्पर्शाचें ठसेदेखील त्याच्या मुखावर उमटतात, इतका तो भावनाप्रधान आहे.

तो असा आहे म्हणूनच सुसंस्कृतांनीं त्याला 'आदर्श' हें नांव ठेविलें आहे. ज्याच्यासारखें आपणांस व्हावयाचें असतें त्याचा कित्ता आपण गिरवितो; त्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवितो. परंतु जगांत आदर्श जें जें आहे, त्याला काळिमा लावण्याचें काम अनादिकालापासून लोक करीत आहेत. सुकृताला विकृत करणें हा कांहीं लोकांचा मनोधर्म असतो. तशा आरशांतदेखील जाती आहेत. कांहीं आपलें चंद्रासारखें मुख राहुकेतूसारखें करतात. सीतेच्या अपहरण प्रसंगीं मारीचानें हरिणाचें रूप धारण केल्याचें आपण वाचतो. पण कांहीं कांहीं आरशांत मृगाक्षीला मृगेन्द्राचें रूप आल्यासारखें वाटतें. त्या आरशांचासुद्धां उपयोग नाहीं असें नाहीं. आरशाचें भिंग जितकें जाडें तितकें त्यांतून दिसणाऱ्या वस्तूचें बिंब मोठें. आकाशाच्या अंगणांतील तिळाएवढी नक्षत्रें त्यांतून पाहिलीं कीं ताटाएवढीं मोठीं

दिसतात. परंतु हा झाला शास्त्रज्ञांचा दृष्टिकोन. प्रयोगासाठीं त्यांना कधीं जवळचें लांब तर कधीं लांबचें जवळ दिसायला हवें असतें. सामान्य मनुष्य आरशाचा उपयोग करतो तो सौंदर्यसाधनासाठीं. चारचौघांत जाण्यापूर्वी आपण आपल्याला कसें दिसतो हें पुन्हां पुन्हां आरशासमोर उभे राहून पाहत असतो. आपलें खरें स्वरूप लपविण्यासाठीं अनेक प्रसाधनांचा उपयोग करतो. जी क्रिया आपण करतो तीच आरसा करतो. आरसा ही आपली हालती छायाच दाखवितो म्हणा ना!

आरशाचा उपयोग पुरुषांपेक्षा स्त्रियांनाच अधिक असतो. विधात्याच्या कलेंतलें सारें लालित्य स्त्री–देहांत दिसून येतें. तेव्हां साहाजिकच ह्या लालित्याची जोपासना करण्यासाठीं आरशाकडे तिला नेहमी वळावे लागते. दिवसांतील रिकामपणाचे कितीतरी क्षण ती आरशासमोर घालविते. मनांतील स्वप्नांचे रंग ती अभिनयाच्या रूपानें त्याला उघड करून दाखविते. जन्माच्या जोडीदाराचा केशरी ध्वज कपाळीं धारण करतांना देखील त्याचाच उपयोग ती करते. तसें पहावयला गेलें तर चिमुरडी मुलें देखील आरशासमोर घटका घटका मुरडतांना दिसतात. आणि पुरुषहि कधीं कपाळावरील केसांची झुलुपें दूर सारतांना, कधीं मिशांना वळण देतांना खुशींत आलेले दिसतील. थोडक्यांत 'सौंदर्य शोध' करायला निघालेल्या माणसाला 'आनंदबोध' देण्याचें कार्य आरसा करतो.

पूर्वी आरसे नव्हते. सौंदर्यशालिनीला आपलें रूप तेव्हां एखाद्या प्रशांत जलाशयांत पहावें लागे. दुष्यंताला कमल–पत्रांतून प्रेम व्यक्त करणाऱ्या शकुंतलेला पुष्करिणींत आपलें लावण्य न्याहाळावें लागे. परंतु आज घड्याळाप्रमाणें घरोघरीं आरसे आहेत. घड्याळ्याच्या काट्यांतून सुटलेलें क्षण आरशांत पाहिल्याशिवाय खोली बाहेर जात नाहींत. कांहीं ठिकाणीं तर आरशासमोरच घड्याळ उभें असतें. नित्याच्या ह्या जीवन–कलहांत बाहेर पडणाऱ्या प्रत्येक माणसाला घड्याळ म्हणतें, 'चल! आटप आतां!' आणि आरसा म्हणतो 'थांबरे! जाशील. घटकेनें काय होते आहे? नेहमींचाच जातो आहेस.' ● ● ●

# गाउं त्यांना आरती

भारत हा मूर्तिपूजक देश आहे. भारतीय मन हें भक्तिवेडें आहे. एखाद्याच्या गुणांची किंमत कळली तर तें त्याला डोक्यावर घेऊन नाचेल. त्याच्या पालखीला खांदा लावायची संधि दवडणार नाहीं. याचें कारण भारत ही संतांची माहेरभूमि

आहे. गेल्या शेंकडों वर्षांत ह्या संतांनीं मानवी गुणांची जोपासना केलेली आहे. ह्या जोपासनेंतूनच एकेका गुणाचे उपासक अशा कितीतरी विभूती भारतांत होऊन गेल्या.

वडिलांचा शब्द खरा करण्याकरितां वनवास पत्करणारा एकवचनी राम, वडिल बंधूच्या श्यामल छायेंत आणि वहिनींच्या मायेंत वाढलेला लक्ष्मण, जन्मतःच सूर्याला गिळायला गेलेला रामाचा एकनिष्ट सेवक हनुमत, ही सत्य, सेवा आणि शक्ति यांचीं प्रतीकें होत. त्याशिवाय परमेश्वराच्या हृदयांत अढळपद मिळविणाऱ्या ध्रुवाची चिकाटी, रामाइतकीच त्यागी आणि सहनशील सीता, सत्त्वसागर हरिश्चंद्र, दृढनिश्चयी भीष्म आणि विरागी शुक अशी शेंकडो ऋषि मंडळी दाखवितां येतील कीं ज्यांनीं आपापल्यांतील गुणांचें परमोच्च शिखर गांठलें. स्वतःचें मरण डोळयांत उतरलेलें असतांना देखील ही मंडळी ढळली नाहींत, ध्येयापासून चळलीं नाहींत. तीं आपल्या ध्येयांत विरघळून गेलीं होतीं.

हे जसे अध्यात्मिक गुणांचे नेते होत, तसेंच बाहुबलाचे आणि बुद्धिबलाचे नेते कांहीं या भारतांत थ डेथोडके होऊन गेले नाहींत. शंभर वर्षांपूर्वीं ब्रिटीशांच्या संगिनींचा मारा परतवितांना धारातीर्थीं मरण पावलेली झांशीची राणी लक्ष्मीबाई, आजच्या सुधारलेल्या महाराष्ट्राचे अग्रणी आगरकर, भारताचा कोनाकोपरा आपल्या निस्पृह गर्जनेनें निनादवून टाकणारे टिळक, वक्रोक्तिपूर्ण भाषाशैलीनें जेत्यांच्या मनोवृत्तीची छाननी करणारे शिवरामपंत, कृश करांगुलींत चाळीस कोटींचें रक्त आणि अश्रु यांच्यांतून तयार झालेलें, अणुबॉंबला जिंकणारें रसायन भरलेले महात्माजी, देशासाठीं सर्वस्व वेंचणारे जवाहर, रसवंतीच्या तालावर जगाला जिंकणारे सुभाष......अशा शेकडो महापुरुषांचें जीवन भारत मातेच्या मंदीरांत नंदादीपाप्रमाणें जळत होते आणि जळत आहे.

पांच हजार वर्षांच्या कुशींत लपलेलीं सारीं नांवें घ्यायचीं म्हटलीं तर आकाशांतील नक्षत्रेंदेखिल गणतीला कमी पडतील. वरील चरण हें यशवंतांच्या एका कवितेचें शीर्षक आहे. त्याचा अर्थ असा लिहितां येईल—

‘ संकटाच्या प्रसंगीं ज्यांचें धैर्य ढळलें नाहीं, राष्ट्राच्या उद्धारासाठीं ज्यांनीं कर्णाच्या हातांनीं दान दिलें, भोंवताली मोहरूपी अंधकार पसरला असतांना ज्यांनीं कृष्णाप्रमाणें आपल्या भक्तांना सहाय्य दिलें, ज्यांच्या आप्तांचा गोतावळा देशभर पसरला आहे, जे लोकसेवेंत सदा मग्न आहेत, दुसऱ्याच्या दुःखानें ज्यांचे डोळे ओले होतात,...त्या साऱ्यांच्या सत्कृतींचें स्तोत्र गाऊं या ! ’ ● ● ●

# क्लेशावांचून यश नाहीं

मोठें व्हावें असें कुणाला वाटत नाहीं ? आपण लोकांच्या बोलण्याचा विषय व्हावें, आपली कीर्ति जनमनांत दरवळत रहावी, आपल्या आगमनार्थ तेरा तोफांची सलामी दिली जावी अशी प्रत्येकाची मनीषा असते. पण संकल्प आणि सिद्धि यांत जमीन–असमानाइतकें अंतर आहे. डोळे आकाशांतील नक्षत्रें मोजीत असले तरी पाय धुळींतच रखडत असतात. पोटाचा भार पडतो पायावर आणि मनाची झेप असते डोळ्यांत. या रस्सीखेचींत ज्याचें मन पिळत असतें, क्लेश भोगीत असतें, त्याला यश मिळतें.

क्लेशकर्दमांतून यशाचें कमल उमलते खरें. पण क्लेश कोणत्या प्रकारचें ? आणि कोणत्या प्रकारच्या क्लेशांतून यश मिळतें ? हे प्रश्न डोळ्यांपुढें उभे राहतातच. पैशाचा रात्रंदिवस प्यास पडलेल्या माणसाला शर्यतींत लाभलेली कांचनगंगा, शिवाजीला लाभलेल्या चांफळखोऱ्यांतील समर्थांच्या रसगंगेइतकी पवित्र मानतां येईल काय ? शर्विलकासारख्या चोरानें प्रयासानें भिंतीला भोंक पाडून चारुदत्ताच्या घरांतील वसंतसेनेचे दागिने पळवून नेण्यांतला आनंद आणि चारुदत्तानें आपल्या अंगच्या औदार्यानें वसंतसेनेच्या प्रेमांतून मिळविलेला आनंद यांत वेगळेंपण आहे ना ? अनुयायांना विश्वासांत घेऊन शिवाजीनें मिळविलेलें महाराष्ट्राचें स्वातंत्र्य आणि स्वतःच्या मुलावरहि विश्वास न ठेवतां औरंगजेबानें केलेला साम्राज्याचा विस्तार या दोहोंच्या प्राप्तींत सत्त्व आणि तमाइतकें अंतर आहे. तेव्हां क्लेश याचा अर्थ सत्प्रवृत्तीनें जगत असतांना व्यक्तीच्या मार्गांत आलेल्या अडचणी. त्या अडचणी जितक्या गगनचुंबी तितका त्या उल्लंघून जातांना होणारा आनंद स्वर्गीय, त्यांतून मिळणारें यश अतुल, अजिंक्य आणि अमर होय.

'कांट्यांवांचुनि गुलाब नाहीं' हे केशवतांचे उद्गार, 'मोठेपणाचा मार्ग मरणाच्या मैदानांतून जातो' हें गडकऱ्यांचें वाक्य आणि 'रात्रीच्या गर्भांत उद्यांचा असे उषःकाल' ही कुसुमाग्रजांची उक्ति ह्या तिहींचा अर्थ एकच आहे. दिव्यत्वाचा साक्षात्कार घडला कीं माणसाचें मन वेडें होतें; नाचूं लागतें; त्याचा जयजयकार करूं लागतें. या जयजयकाराला विरोध करणारी प्रतिशक्ति आपोआप

तैयार होते. दुष्टांना सुष्टांच्या मार्गांत आडवें येण्यांत आनंद होतो. त्या व्यक्तीशीं झुंज खेळण्यांत धीरोदात्तांची कसोटी असते.

यश मिळविण्याची अपेक्षा करणाऱ्या व्यक्तीला व्यवसायाचें एक भलें मोठें ओझें सांभाळावें लागतें. केवळ नाचानाच करून यश मिळविणारे लोक आहेत. पण तें यश चिरंजीव नव्हे. ध्येयवादी माणसाच्या डोळ्यांत आदर्शाचे तारे चमकत असतात, पायाखालीं कष्टांचे निखारे जळत असतात; आणि मनांत विचारांचे वारे वहात असतात. ● ● ●

## श्रद्धा आणि बुद्धि

मानवी जीवनांत श्रद्धेला अत्यंत महत्त्व आहे. दुःखानें दडपलेल्या अंतःकरणांतील कोनाकोपरा उजळण्याचें कार्य श्रद्धा करते. जगांतील मूठभर लोक बुद्धीजीवि असतील, परंतु बहुसंख्य लोकांना वारुळांतून बाहेर पडलेल्या मुंग्यांप्रमाणें पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठीं दिवसभर राबावें लागतें. ते श्रम करतांना कित्येक वेळां मानापमानांनीं अंतःकरण हेलावतें, डोळे पाणावतात, आणि कार्यावरील निष्ठा ढळूं लागते. अशा वेळीं श्रद्धेचा आपणाला आधार घ्यावा लागतो. या श्रद्धेला रक्ताच्या पाशापेक्षां भक्तीच्या ऋणानुबंधाचीच आवश्यकता वाटते.

श्रद्धा आणि बुद्धि हे माणसाच्या जीवनाचे परस्परावलंबी पैलू आहेत. एकाच नाण्याच्या त्या दोन बाजू आहेत. वापरून वापरून जुनें झाल्यावर त्याची जशी एखादी बाजू गुळगुळीत होते आणि अक्षरें अस्पष्ट होतात तसेंच एखाद्याच्या सहवासानें आपण म्हणतो, 'हा श्रद्धाळू आहे' आणि 'तो बुद्धीजीवि आहे.' परंतु श्रद्धा आणि बुद्धि ही परस्परांपासून वेगळीं करतां येणार नाहींत. श्रद्धा आणि बुद्धि यांचें प्रमाण मानवी–जीवनांत विषम आहे. कुणांत बुद्धि अधिक प्रमाणांत असेल तर कुणी भावनेच्या जास्त आहारीं गेला असेल. ज्याच्यावर जिचा पगडा बसतो त्याच्यावर तिचा आपण 'तो असा असा आहे' असा ठसा मारतो.

व्यक्तीच्या काय अगर राष्ट्राच्या काय उद्धारासाठीं दोहींची सारखीच जरूरी आहे. बुद्धीच्या शक्तीनें माणसानें यंत्रयुग निर्माण केलें, निसर्गाला आपल्या पायाशीं आणलें आणि पंचमहाभूतांना लोटांगण घालायला लावलें. इतकें करून-

अनुक्रमांक
विभाग

सुद्धां मनुष्य कांहीं सुखी होऊं शकत नाहीं. जगाचें सामर्थ्य मुठींत आणणारा शिकंदरदेखील घटकाभर विचारांत गढून राहतो, याचें कारण तरवारीच्या धारेवर जनतेचीं मनें नाचविणाऱ्या माणसाला स्वतःचें मन ताब्यांत ठेवतां येत नाहीं. मनाचे विखुरलेले विचार एकत्र करण्याचें सामर्थ्य श्रद्धेमध्यें आहे. 'देवाचिया दारीं' क्षणभर उभा राहिलेला भक्त दिवसाला लागणारी सारी शक्ति मिळवूं शकतो. श्रद्धावादी मनुष्य एका क्षणांत जी गोष्ट करील ती करायला बुद्धिवादी माणसाला आयुष्यहि पुरत नाहीं. महात्म्याशीं मतभेद होऊन स्वातंत्र्य मिळविण्या-साठीं गेलेले सुभाषचंद्र गरुडाच्या वेगानें गेले आणि त्यांच्या मार्गावरून 'जयहिंद' या शब्दांची अमर भावना ललकारली. आज भारतीयांच्या ओठीं हा शब्द अमर करण्याची शक्ति ज्या सुभाषबाबूंच्या कर्तबगारीमुळें आली, त्यांची भावना विजेच्या तेजानें पेटली आणि तिनें काजळलेल्या जगाला स्तिमित केलें.

बुद्धि आणि श्रद्धा यांची उगमस्थानें जरी वेगवेगळीं असलीं तरी पुढें त्या दोघीहि रसवंतीला येऊन मिळतात. मनाच्या सांदिकोनांतून गंगोत्रीप्रमाणें पाझर-णारी श्रद्धा आणि मेंदूच्या वलयावलयांतून यमुनेप्रमाणें वहात येणारी बुद्धि या दोघींचा सुंदर समन्वय ज्यांच्या ओंठावर होतो त्यांची वाणी शिवरामपंतांप्रमाणें साम्राज्यशाहीचें बुरुज ढासळवूं शकते; त्यांची वाणी सुभाषबाबूंप्रमाणें गळ्यांतील बारा आण्याच्या हाराला बारा लाखांचें माल आणूं शकते. एकूण श्रद्धा आणि बुद्धि ह्या परस्पर भेदक नसून परस्पर पूरक आहेत. 'विद्वान् श्रेष्ठ कीं कवि श्रेष्ठ?' 'मेंदु श्रेष्ठ कीं मन श्रेष्ठ?' हे वाद जसे न संपणारे आहेत तसेच 'बुद्धि कीं श्रद्धा?' हा वाद फोल होय. एकूण असें म्हणतां येईल कीं, बुद्धीनें अनंताला उजळणाऱ्या मानवाला मनाची शांति मिळविण्यासाठीं श्रद्धा असावी लागते. विजलीच्या प्रकाशांत असलेल्या देवापुढें भक्त समई, निरांजन अगर पणती लावतोच ना! ● ● ●

## आदरातिथ्य

भारतीय संस्कृतींत ज्या ज्या मानवी गुणांची महती गायिली आहे त्यांत आतिथ्यशीलतेचें स्थान वरचें आहे. सर्वच गुण आपापल्या परीनें जीवनास पोषक असले तरी माणुसकी जिवंत असल्याचें लक्षण आतिथ्यशीलतेंतच आहे. पूर्वी

माध्यान्हीपर्यंत पाहुण्यांची वाट पाहून मग जेवायला बसण्याची पद्धत होती. अजूनहि कांहीं ठिकाणीं ती दिसून येते. 'अतिथी देवो भव' म्हणून अतिथीच्या आगमनाचा सत्कार करावा असें वचन आहे.

कालमानाप्रमाणें आदरातिथ्याच्या कल्पनेंत फरक पडत चालला आहे आणि तो पडणें इष्टहि आहे. आठ आठ दिवस पुख्खा झोडीत बसणारे पाहुणे पाहिले कीं काळाचा आणि पदार्थांचा दुरुपयोग होत आहे असें वाटतें, आदरातिथ्याचें तें बिडंबन वाटतें. भारत 'सस्यश्यामलां सुफलां' होता तेव्हां जेठा मारून बसणाऱ्या ह्या मंडळींची ऊठबस करतांना यजमानाला कांहीं वाटत नसे. पण आज प्रत्येकाच्या पोटाचा प्रश्न पाठीशीं उभा आहे. घटकेच्या पाहुण्याचें आदरातिथ्य पूर्वीच्या पद्धतीनें करणें कठीण आहे. त्याचा अर्थ कुणी कुणाकडे जाऊं नये असा मात्र नव्हे.

खरें आदरातिथ्य कसें असावें, हें साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांनीं आपल्या 'माझी आगगाडी कशी चुकली?' या कथेंत निराळ्या रीतीनें सांगितलें आहे. आदरातिथ्याच्या अतिरेकानें वक्तशीर वागणाऱ्यांचें किती नुकसान होतें याचें चित्रण त्या कथेंत आहे. माझ्या मतें आदरातिथ्य खाद्य–पेयांच्या पदार्थांतून दाखविण्यापेक्षां आचरणांत दाखविणें अधिक बरें. 'आपण आल्यानें माझ्या मनाला आनंद झाला' हें सांगण्याचें कार्य शब्दांच्यापेक्षांहि चेहऱ्यावरील भाव सफाईदारपणें व्यक्त करूं शकतात. मन उमललें कीं चेहरा सुगंधित होतो. अशा सुगंधी, सस्मित चेहऱ्यानें आलेल्या अतिथीचें स्वागत करावें. आपल्या अंतःकरणाचें भिंग स्वच्छ आहे कीं त्यावर गैरसमजाची धूळ आहे, हें दाखविण्याचें कार्य चेहरा करीत असतो.

सस्मितानें ( Smile ) जसें आलेल्या माणसाचें स्वागत करावें, तसें भावनेनें भिजलेल्या पापण्यांनीं ( Tear ) त्याला निरोप द्यावा. पहिली गोष्ट आपण सहज करूं शकूं. आलेल्या पाहुण्यांचें स्वागत करणें तितकेंसें कठीण नाहीं. परंतु दोनचार दिवस तो घरीं राहिल्यावर त्याचे गुणदोष ( विशेषतः दोष ) कळल्यावर त्याच्याबद्दल आपल्या मनांत जो दुरावा निर्माण होतो, तो न होऊं देणें तितकेंच कठीण आहे. जुन्या प्राथमिक मराठी पुस्तकांत एक कविता होती, त्यांतील

'थोडाही गुण मिळतां घ्यावा
साठा त्याचा नित्य करावा'

ह्या चरणांतील अर्थ आचरणांत आणतां आल्याशिवाय आपल्या घरीं येणाऱ्या पाहुण्यांची बडदास्त ठेवावीशी आपल्याला वाटणार नाहीं. हें लिहीत असतांना आचार्य अत्र्यांची 'पाहुणे' ही विडंबनपर कविता मला आठवते. तसे पाहुणे असतील त्यांचें सामान पायपुसण्याजवळील कोपऱ्यांत ठेविलें कीं तेहि 'आपण आल्यानें यजमानाला काय वाटलें ?' हें ओळखतील.

पाहुणचाराच्या पूर्वींच्या दृष्टींत बदल झालेला असला तरी ज्या प्रमाणांत आपण आज अतिथीचें स्वागत करायला पाहिजे त्याप्रमाणें तें करीत नाहीं हें खास. तें करणें राष्ट्राच्या संस्कृतीस पोषक आहे. पणतीवर पणती पेटते त्याप्रमाणें श्रद्धेवर श्रद्धा प्रज्ज्वलित होते, मनें मंगल होतात आणि मैत्री दृढ होते. तेव्हां रोजच्या जीवनांत आदरातिथ्याला आपण अत्यंत महत्त्व दिलें पाहिजे. ● ● ●

## भाषावार प्रांतरचना

हिंदुस्थानसारख्या अठरा पगड जातींच्या आणि एखाद्या खंडाएवढा ज्याचा विस्तार आहे अशा देशामध्यें, 'कोणती एकच भाषा असावी ?' हा पेंच सरकारला पडणें साहाजिकच आहे. मध्यवर्ती सरकारांत ह्यासंबंधीं मतभेद होतात. कांहींजण हा प्रश्न बुद्धीनें सोडवूं पहातात. परंतु भाषा हें भावनेचें साधन असल्यामुळें ( मला वाटतें ) तो प्रश्न बुद्धीनें सोडवून चालणार नाहीं.

राष्ट्राचें दप्तर हिंदीसारख्या भाषेंत लिहिलें जावें, हें कोणीहि अमान्य करणार नाहीं. इतक्या वर्षांच्या झगड्यांतून मिळालेलें स्वातंत्र्य राष्ट्रांत एकमुखीपणा नाहीं म्हणून जावें असें कुणाला वाटेल ? हिंदीसारखी, राष्ट्रांतील बहुसंख्य लोकांच्या मुखीं असलेली भाषा इतर थोड्यांना शिकणें फारसें कठीण नाहीं. अल्पप्रयासानें कामकाजापुरतें लागणारें हिंदीचें ज्ञान आपण मिळवूं शकूं. इंग्रजी नाहीं कां आपण सात–आठ वर्षें शिकतों ?

राष्ट्राचें व्यवहारोपयोगी शिक्षण हिंदीतून दिलें जावें, तसेंच व्यवहारापलीकडे ज्या कांहीं अनेक गोष्टी आहेत कीं ज्याच्याशीं आपलीं मनें पिढ्यानुपिढ्या गुंतलीं आहेत ते प्रश्न सोडवितांना त्या त्या प्रांतांतील भाषांचा उपयोग व्हावयास हवा. उदा:—मुंबईसारख्या शहरांत अनेक भाषांशीं आपला संबंध येतो. व्यवहार अड्

नये म्हणून गुजराथी वाण्याशीं बोलतो, हिंदी भय्याशीं बोलतो, फिरंगी वसई-वाल्याशीं बोलतो, उर्दू मुसलमानाशीं बोलतो, आणि इंग्रजी अधिकाऱ्याशीं बोलतो. परंतु गांवाला गेल्यावर जिव्हाळ्याच्या माणसांशीं मनमोकळेपणानें बोलतांना प्रांतीय भाषा ओठीं येते. लहान मुलाला आईची भाषा शिकवावी लागत नाहीं. तिच्यापासून अनुकरणानें तो ती नकळत शिकत असतो.

साने गुरुजींचें आंतरभारतीचें स्वप्न अगर गुरुदेवांच्या विश्वभारतीचें स्वप्न ह्याच भाषावार प्रांतरचनेला धरून आहे. त्याचें म्हणणें असें कीं त्या त्या प्रांतांतील भाषातज्ञांची एक समिति असावी, त्यांचें एक विद्यालय असावें, त्या विद्यालयानें विविध भाषांतील उत्कृष्ट ग्रंथांचीं भाषांतरें करावींत, त्यामुळें वाङ्मयीन विचार–धन सर्वांना सारखें मिळूं शकेल. तेव्हां राष्ट्राची भाषा जरी हिंदी झाली तरी आज शतकानुशतकें जीं उपराष्ट्रें आपापल्या भाषांचें संगोपन करीत आहेत त्या भाषा मृतवत् होऊं नयेत म्हणून भाषावार प्रांतरचना हवी. ● ● ●

## फेरीवाले

पोटांत कसें तरी दोन घांस कोंबून कामावर जाणाऱ्या कारकुनाला फेरी-वाल्यांच्या जीवनकलहाची कल्पना येणार नाहीं. पण तो एखादा दिवस घरीं असला तर त्याला पोटासाठीं वणवणणाऱ्या अनेक फेरीवाल्यांचें दर्शन घडेल. त्यांच्या वेगवेगळ्या लयींतील ललकाऱ्यांनीं दुपारची झोप मोडते खरी, पण सहृदय माणसाला वाटतें. ‘अरेरे ! बिचाऱ्याला गुमास्ता कायद्याची सवलत नाहीं.’ गुमास्ता कायदा कुणाला ? जो दुसऱ्याच्या दारीं नोकर आहे त्याला. हे सारे फेरीवाले आपल्या पोटाचें चाकर आणि आपल्या मनाचे धनी.

सकाळीं साडेदहा वाजले कीं या फेरीवाल्यांची वर्दळ सुरू होते. सूर्याच्या तापानें रस्त्यावरील डांबर तापूं लागली कीं एकेकाची ललकारी कानावर पडते. घरांतील भांडी घासून होतात न होतात तोंच ‘ कल्ह...योऽ ’ करीत कल्हईवाला येतो. डोक्याच्या कोणत्याहि कोनांत बसविलेली त्याची ती गांधी टोपी, वाढत्या अंगाचा सदरा आणि गुढघ्यापर्यंत काचलेलें धोतर हा बहुधा त्याचा वेष असतो. दुसऱ्यांचीं ब्रासनें उजळतां उजळतां हा आणि ह्याचे कपडे मात्र कोळशाच्या जळत्या कणानें काजळून गेलेले असतात. त्यानंतर जुन्या बाटल्या खरेदी करणारी ‘बाटली बा...ऽ...ऽय, येऊन जाते. हिच्या टोपलींत डालड्याच्या

डब्यापासून अमृतांजनच्या डबीपर्यंत साऱ्या चिजा अस्ताव्यस्त पडलेल्या असतात. इतक्यांत 'जुना बार' मोसंबीवाला येतो. कोणत्याहि ऋतूंत याच्या मोसंब्यांचा बार जुनाच असतो, ही विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे. रंगीबेरंगी पातळ कागदांत वेष्टिलेलीं हीं मोसंबीं अडीच–तीन रुपये डझन प्रमाणें त्याला ओपायचीं असतात. पण तीं दीड–दोनलाच तो ओपून मोकळा होतो. मधेंच 'तांबड मा–ऽ–ती'वाली झटकन् निघून जाते. दीड–दोनच्या सुमारास 'भांडीं पातेली'–वाली बोवारीण येते. तिच्या आगमनाकडे स्त्रियांचे डोळे लागलेले असतात. तिला 'आहेर' म्हणून घरांतून यजमानांचे उसवत चाललेले कपडे, बेबीचे घट्ट होत असलेले फ्रॉक, आणि विटलेलीं पण न फाटलेलीं उंची लुगडीं यांचा गठ्ठा बांधून तयार असतो. तीन साडेतीनला 'रिबीन बांगड्या'वाला येतो. मग संध्याकाळीं सहा वाजेपर्यंत 'चन्ना ज्योर ग र् र्–र्म' वाला भय्या, 'जूना बूट'-वाला, 'पेपरवाला,' बाजारापेक्षां दोन पैसे जास्त भावानें भाजी विकणारा 'भाजी'वाला इत्यादि अनेकजण येऊन जातात. इतक्यांत स्त्रियांची वेशभूषेची वेळ होते, आणि गल्लीच्या कोपऱ्यावर 'चमेली'ची सुगंधी लल्कारी ऐकूं येते.

अशी ही फेरीवाल्यांची वर्दळ पाहिली कीं मला लहानपणीं पाठ केलेल्या ओळी आठवतात :

'पोटासाठीं भटकत जरी दूर देशीं फिरेन
मी राजाच्या सदनिं अथवा घोर रानीं शिरेन.'

पोट पाठीशीं बांधून उन्हा–पावसांत, थंडी–वाऱ्यांत बाराहि मास ही मंडळी जीवनाशीं झुंजत असतात. आजच्या कमाईवर त्यांचें उद्यांचें भविष्य अवलंबून असतें. तरी पण त्यांच्या ओठाला कधीं मुरड पडत नाहीं, डोळ्यांत कधीं आंसू दिसत नाहीं आणि मनांत कुणाबद्दल किल्मिष असत नाहीं. अशीं हीं माणसें बघितलीं कीं सुखाची कल्पना येते. सुख हें गाद्या-गिरद्यांत रुतलेल्या शरीरांत राहायला राजी नसतें; तें कष्टाच्या घामानें भिजलेल्या देहाची विचारपूस करायला येतें. मालकिणीच्या दुपारच्या वामकुक्षीला परांची उशी असली तरी तें तिकडे वळणार नाहीं. पण तें भर उन्हांत एखाद्या वृक्षाच्या छायेंत विसावा घेणाऱ्या वडारणीच्या उशाशीं जाऊन निवांतपणें बसेल. पुस्तकांत दिवसरात्र डोकें खुपसून बसलेल्या विद्वानाकडे त्याची नजर फिरणार नाहीं. पण एखाद्या डोंगर-कपारींतून मुकीं कोंकरें हांकीत जाणाऱ्या धनगराच्या कुडत्याच्या कुशींत तें दडून बसलेलें आढळेल.

आठवड्यांतून एक दिवस मला ही फेरीवाल्यांची मैफल ऐकावयास मिळते. पण तींत मी जीवनाचे सारे कष्ट विसरून जातो. निढळाच्या घामावर आणि परमेश्वराच्या प्रेमावर जगणाऱ्या या महात्म्यांची जीवनयात्रा पाहिली कीं मला आपणहि नोकरी सोडून या यात्रेकरूंत सामील व्हावेंसें वाटतें—आज किती तरी दिवस वाटते आहे. त्या वाटण्यांतच माझें सुख आहे. ● ● ●

# प्रपंच आणि परमार्थ

**‘सुख पाहतां जवापाडें, दुःख पर्वता एवढें’**

कळायला लागल्यापासून सुखाचा शोध करणाऱ्या मानवाला तुकारामाप्रमाणें वरील अनुभव आलेला असतो. सुख हें आहे त्या स्थितींत मानून घ्यावें लागतें; तें कुठें शोधून सांपडत नाहीं. हें प्रत्येकाला कळते, पण वळत नाहीं. कांट्या-कुट्यांतून वाट काढीत जाणाऱ्या माणसाला लौकरच आपल्याला पाउलवाट सांपडेल अशी आशा असते. त्याच आशेनें तो रक्ताची धार पाण्याप्रमाणें पुसून टाकतो. कडेकपारींतून प्रवास करणाऱ्या मुशाफिराला पुढें हिरवे माळ लागतील असें वाटत असतें. त्याच जोरावर तो थकलेल्या उरी हात ठेवून चालत असतो. पण वाढत्या वयाबरोबर, प्रवास सरला तरी हवें तें समाधान मिळत नाहीं. मन खचून जातें, त्याची शांति ढळते आणि अखेरीं तें मुक्तीसाठीं परमार्थाकडे वळतें.

पण परमार्थ म्हणजे तरी काय? ‘परमार्थ म्हणजे मनाच्या समाधानाचा एक मानवनिर्मित मार्ग,’ असें सोप्या भाषेत म्हणतां येईल. ‘हरपल्या श्रेया’चा शोध कुठें लागेल हें विचारण्यासाठीं भ्रमन्ती करून वेडावलेलें मन परमेश्वराकडे जातें. आणि परमेश्वर म्हणजे काय? मानवाच्या विखुरलेल्या विचारांना केंद्रीभूत करणारी एक मनोनिर्मित मूर्ति. चालायला लागणाऱ्या मुलाला जसा पांगुळगाडा तसा चुकलेल्या मनाला पांडुरंग. पण एकदां मनाची कुठेंहि एकतानता होऊं लागली कीं दृष्टींतील पांडुरंग ध्यानीं येऊं लागतो, मनीं डोलूं लागतो; अवघें जग ब्रह्ममय होऊन जातें आणि भावसमाधि लावून बसलेलें मन छंदांत झरूं लागतें.

तुकाराम आणि रामदास यांनीं प्रपंच आणि परमार्थ याविषयीं उत्तमोत्तम विचार लिहून ठेविले आहेत. तुकोबा म्हणतात,

‘ज्याचें मन नाहीं लागलें हातासी
तेणें प्रपंचासी सोडूं नये’

क्षमा हीच साऱ्यांचें हित चिंतू शकते. आजपर्यंतच्या साऱ्या संतांनीं आपल्या जन्माच्या वैऱ्यांना क्षमाच केली आहे. जगाचा कर्दनकाळ होऊन बसलेल्या असुरी प्रवृत्तीचे दोष क्षमेमुळेंच नाहीसे झालेले आहेत. 'हा नको नको संसार– शिरावरि भार' असें म्हणणाऱ्या मनाला प्रपंच सोडतां येत नाहीं, आणि पमार्थ जोडतां येत नाहीं. परंतु तुकारामाच्या भूमिकेवरून सामान्य मनुष्य जगाकडे पाहूंच शकत नाहीं. तुकारामाची उंची तुम्हीं आम्हीं गांठूं शकणार नाहीं. आपल्याला रामदासांचा व्यवहारवादच पटण्याजोगा आहे. त्यांनीं सांगितलें आहे, 'आधीं प्रपंच करावा नेटका.' कारण हें वासनामय मन प्रपंचांत गुंतलेलें असतें; भगवें वस्त्र परिधान करून विरक्तीचीं वचनें ओंठावर नाचविण्यांत अर्थ नाहीं. नाहीं तर, 'प्रपंच गेला हातींचा–क्लेश नाहीं परमार्थाचा' असें होतें, आणि 'साठीं बुद्धि नाठी' होऊन बसते.

तेव्हां प्रपंच आणि परमार्थ यांच्या कात्रींत सुखासाठीं धडपडणाऱ्या देहाचे मात्र तुकडे होतात. दिवस उगवला कीं मन कर्तव्याच्या किरणांच्या भाल्यांचा भाता पाठीशीं बांधतें, आंतड्यांच्या रज्जूचें ताठर धनुष्य सांवरतें आणि सुखाच्या कांचन–मृगामागें धांवूं लागतें. सायंकाळच्या किरणांबरोबर त्याचा उत्साह मावळतो. निराश होऊन तें आकाशांतील नक्षत्रांकडे पहातें. तीं त्याला, 'तम अल्प, द्युति बहु' असें सांगतात. त्याच तंद्रींत त्याच्या प्रत्ययास येतें कीं 'सुख हें जागत्याच्या उराशीं व निद्रिताच्या उशाशीं आहे.'

सारांश प्रपंच आणि परमार्थ हीं उंबरठ्या आंतील आणि बाहेरील जगांत सुख मिळविण्याचीं साधनें होत. माणसाला घरकुलांतलि वासनांच्या तृप्तींतून निर्माण होणारें वात्सल्यहि हवें असतें आणि बुद्धीला आकलन न होणाऱ्या विश्व–विधात्याच्या समोर लावलेल्या पणतींतील मांगल्यहि हवें असतें. तेव्हां रामदास म्हणतात तेंच खरें—

'प्रपंच करुनी परमार्थ केला तोचि नर भला' ● ● ●

## आगगाडीच्या स्टेशनवर

एकदोन मिनिटांसाठीं आगगाडी चुकण्याचे प्रसंग आपल्यावर अनेकदां येतात. अशा वेळीं वाळवंटांत फेऱ्या घालणाऱ्या उंटासारखी आपली गत

होते. फलाटावर आपल्यासारखींच थोड्यासाठीं गाडी चुकलेलीं पांचसात माणसें असतात. मग अधुनमधून त्यांच्याकडे पहात (अशा वेळीं समतेंतून ममता निर्माण होते.) आणि अधुनमधून डोळ्यांत भरणाऱ्या घड्याळ्याच्या काट्यांकडे पहात आपल्याला आपली केविलवाणी स्थिति लपवावी लागते. अशा प्रसंगीं स्टेशन फिरून माणसांनीं फुलून येईपर्यंत मी अनेक गोष्टींचें निरीक्षण आणि चिंतन करतों.

माझ्या मनांत विचार येतात, 'आगगाडी हें एक वाहन आहे. शेंकडों लहानमोठीं माणसें ह्या वाहनाच्या कुशींपोटीं बिलगून आणि कटिखान्दीं लटकून इकडून तिकडे प्रवास करतात. कशासाठीं ? पोटासाठीं. पोटासाठीं तगमगणाऱ्या ह्या जीवांचा भार अंगावर पेलीत ही आगगाडी उराशीं धगधगते निखारे कवटाळीत रानावनांतून, उन्हातान्हांतून, चढउतारावरून वार्धिणीप्रमाणें पळत सुटते. त्यांत तिला कोणतें सुख मिळतें ? हो ! मिळत असावें. दुसऱ्याला योग्य त्या ठिकाणीं नेऊन सोडण्यांत देखील एक प्रकारचें सुख आहे. ज्या रूळांना आपल्या अजस्र देहानें दडपीत ही आगगाडी धांवत असते, ते रुळ तो भार सहन करतां यावा म्हणून स्वतःला स्थानबद्ध करणाऱ्या, माथीं खिळे मारून घेणाऱ्या सहोदराप्रमाणें वाटतात. दुसऱ्यासाठीं आत्मक्लेश पत्करायला तयार झालेल्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर त्याग आणि सेवेचें तेज विलसतें. पाऱ्याप्रमाणें चमकणारे ते रूळ पाहिलें कीं मला त्यागाची कल्पना येते. घटकेघटकेनें गर्दीनें गजबजणारा आणि पुन्हां निर्जन होणारा फलाट पाहिला कीं माझ्या मनांत येते, सर्वंच मोठ्या माणसांच्या जीवनांत असें चढउताराचे प्रसंग येत असावेत.

आगगाडी, रूळ आणि फलाट या झाल्या माझ्या कल्पनाप्रिय मनाला चालना देणाऱ्या गोष्टी. त्याशिवाय 'गरम चहा' ही कायमची पाटी लावलेलें तें टावराण (हॉटेल) माझ्या परिचयाचें आहे. दुःखाच्या सात पिढ्यांच्या कालियाचें वीष उतरविण्याचें सामर्थ्य या चहांत असतें; इतका तो उकळलेला असतो. मी चहाबाज असल्यामुळें माझा वरील अनुभव तुम्हीं विचारांत घ्यावयास हरकत नाहीं. आंधळ्यालाहि दिसणारें तें घड्याळ, गाडीच्या येण्या–जाण्याचा इषारा देणारी घासून पुसून स्वच्छ केलेली ती घंटा, सोन्याचे दांत बसविलेला तो पानपट्टीवाला भय्या, उरलेल्या वृत्तपत्रांची जंत्री करीत बसलेला 'व्हीलर स्टॉल'वरचा तो माणूस आणि 'स्..स्' आवाज करीत नागमोडी गतीनें जाणारी 'बुटपॉलीश'-

वालीं पोरें, हें सारे माझ्या चुकलेल्या गाडीमुळें रिकामा झालेला वेळ भरून काढायला मदत करतात. घटकेची जखम झालेल्या मनाला फुंकर घालण्याचें काम त्या वस्तू आणि व्यक्ती करीत असतात.

गाडी चुकल्यामुळें मला कितीदां तरी बरें वाटतें तें वरच्याच कारणामुळें. नाहीं तर धक्काबुक्कीच्या या जीवन–कलहांत इतकी फुरसत मिळते कुठें? स्वतःचा विचार करायला सवड नाहीं अशी आजच्या माणसांची तक्रार आहे आणि ती रास्त आहे. युद्धयुगांत वेळेइतकी महाग वस्तु मला तरी दिसत नाहीं. रांगेमधें उभें राहिल्यामुळें फुकट गेलेला वेळ हिशेबांत धरला तर, काळ मानवाला कसा चुरडीत आहे, त्याचें जीवन कसें भरडीत आहे याची कल्पना येईल. मग त्यापेक्षां मला स्टेशनवर एकान्तवासांत काढलेली, विचाराला चालना देणारी एखादी घटका कितीतरी बरी वाटते. ● ● ●

## स्वतंत्र भारत

'तें स्वातंत्र्य खरें, न फक्त अपुलीं जें तोडितें बन्धनें
अन्यांच्या पद–शृंखलांस बघतें निष्कंप ऐशा मनें'

—बी

दीड शतकाच्या तपस्येनंतर आज भारत स्वतंत्र झाला आहे. त्या तपस्येंत संतांचें भावबळ आहे, मुत्सद्द्यांचें बुद्धिबळ आहे आणि समरधुरंधरांचें बाहुबळ आहे. उदात्त जीवनमूल्यांवर जगणाऱ्या भारतानें गुलामगिरीचें जूं उडवून देण्याचा प्रयत्न अनेकदां केला. पण पिढ्यानुपिढ्यांच्या मनांत पारतंत्र्याचीं पाळें-मुळें रोंवून बसलेल्या वृक्षाला तोडायला चित्शक्तीच्या कुऱ्हाडी तितक्याच धारदार असाव्या लागतात. त्या वृक्षाचीं छकलें होई तोंपर्यंत त्यांपैकीं कित्येक मोडतात, कित्येकांची धार बोंथटते, तर कित्येक त्यांच्या पाषाण–हृदयांत रुतून बसतात. या वृक्षाचें उन्मूलन करतांना कित्येकांचें प्राण कंठाशीं येतात. भारताच्या स्वातंत्र्याचें प्रमेय अगदीं असेंच होतें.

१८५७ सालीं झांशीची राणी लक्ष्मीबाई हिच्या निशाणाखालीं भारताच्या मुक्तीसाठीं हिंदु–मुसलमान खांद्याला खांदा लावून लढले. त्यानंतर लोकमान्य टिळकांनीं केसरींतून सरकाराविरुद्ध उघड उघड लेख लिहावयास सुरवात केली.

१८८१ ते १९२० ह्या चाळीस वर्षांत परकीय सत्तेचे दगडी बुरुज ढासळून पाड-ण्याचे प्रयत्न नर' केसरी ' टिळकांप्रमाणेंच स्वातंत्र्यवीर सावरकर, वासुदेव बळवंत फडके, शिवरामपंत परांजपे, गोपाळ कृष्ण गोखले इत्यादींनीं केले. पण राष्ट्राचीं स्वप्नें शतकाशतकांनीं फुलत असतात. इतक्यांचे श्रम अपुरे ठरल्यावर स्वातंत्र्य-लढ्याचें कार्य महात्माजींनीं सुरू केलें. सूर्य मावळल्यावर पृथ्वीला प्रकाश देण्याचें कार्य चंद्र आणि इतर ग्रह–नक्षत्रें यांना करावें लागतें. लोकमान्य आणि गांधीजी यांच्या विचारसरणींत फरक होता, तो स्वातंत्र्याची पाउलवाट कोठून काढावयाची यांत होता; कोठें जावयाचें यांत नव्हता. सागराच्या भरती ओहोटीवर नावाड्याला बंदरांत जाण्याचा मार्ग बदलावा लागतो.

महात्माजींच्या कारकीर्दींत राष्ट्राला साम्राज्यशाहीशीं चार लढे द्यावे लागले १९२०–३०–३२ आणि ४२. यांपैकीं अखेरच्या तडाख्यानें परकीय सत्तेचा इमला डळमळला. मतामतांचा गलबला विसरून, जातीयतेची तटबंदी फोडून, मनामनांतील शक्ति एकवटलेली पाहून, त्या प्रचंड सामर्थ्यापुढें आपला आतां कोणताहि असुरी उपाय चालणार नाहीं असें जाणून ब्रिटिशांनीं भारताचा मोह सोडला आणि ' चले जाव 'चें आव्हान विनंती म्हणून स्वीकारलें.

तोच दिवस १५ ऑगष्ट १९४७चा होय. ह्या दिवशीं आकाशाच्या निळया पार्श्वभूमीवर भारतीयांचीं मनें राष्ट्रध्वजाच्या रूपानें जगांतील इतर राष्ट्रांच्या बरोबरीनें डौलानें फडकूं लागलीं. आणि ' ध्वज अपुला नाचे ' ह्या जाणिवेनें प्रत्येकाचें ऊर फुलून आलें.

आज भारताचें नेतृत्व पं. नेहरूंकडे आहे. राष्ट्रासाठीं अमीरीचा त्याग करून फकीरी पत्करणाऱ्या महात्माजींच्या या मानस–पुत्रांचें कर्तृत्व अलौकिक आहे. त्यांच्या डोळ्यांत विश्व–कुटुंबाचें स्वप्न फुललें आहे, त्यांच्या मनांत भारतांतील दलित–दुबळ्यांचे प्रश्न घोळत आहेत आणि त्यांचे पाय भारताच्या कोनाकोपऱ्यां-तील पाउलवाटेवरील धुळीनें मळत आहेत.

स्वतंत्र भारताचें उद्यांचें स्वप्न अत्यंत विशाल आहे. ते साकार करण्यासाठीं प्रत्येक भारतीयाचे श्रम कामाला आले पाहिजेत. निष्ठा तेजाळत राहिली पाहिजे. तरच अखिल मानवजातीला आपल्या ' हरपल्या श्रेया 'चा शोध करून त्याला देतां येईल.

सारांश— ‘ भारताची मुक्ति
नव्हे ही केवळ
स्वामित्वाची भूक
मुक्तींत त्याच्या
होईल मानव बंधनमुक्त ’

● ● ●

# शिवाजी आज असता तर....?

तर काय ? ‘ युद्ध करून त्यानें दुष्टांचा नाश केला असतां आणि स्वतंत्र हिंदुस्थानचा तक्ताधिपति म्हणून मिरविलें असतें,’ हें उत्तर कुणीहि देईल. पण यावरून उत्तर देणारानें शिवकालीन इतिहासाचें वाचन केलें आहे, मनन नाहीं, असें मी म्हणेन. शिवाजी हा त्या वेळच्या गांजलेल्या जिवांचा कलिजा होता. त्यानें राज्य केलें तें जनमनांवर, देहावर नव्हे. दिल्लीपतीच्या अमानुष आचरणामुळें सिंहाच्या निर्भयतेनें जगणारे मावळचे वीर सशासारखें भेकड झाले होते. योग्य त्या नेत्याच्या अभावीं पोटाला देणारा त्यांना जवळचा वाटत होता. अशा वेळीं शिवाजी जन्माला आला. तेव्हां शिवजन्म हें काळानें महाराष्ट्राला दिलेलें वरदान होतें असेंच म्हटलें पाहिजे.

वयाच्या सोळाव्या वर्षापासून चव्वेचाळिसाव्या वर्षापर्यंत म्हणजे महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य–मंदिराचा पाया घातल्यापासून त्यावर कळस चढवीपर्यंत शिवाजीच्या पराक्रमाचा आणि प्रवृत्तीचा अभ्यास केला, तर आपणास असें दिसून येईल कीं, शिवाजी हा माणुसकीचा पुरस्कर्ता होता. शत्रू हा केवळ मुसलमान आहे म्हणून त्यानें त्याच्याशीं वैर पत्करिलें नाहीं तर, माणुसकीची पायमल्ली झालेली त्याला ज्या ज्या ठिकाणीं दिसून आली, त्या त्या ठिकाणीं त्यानें शस्त्र उपसलें. स्वातंत्र्यप्राप्तीच्या आड येणाऱ्या चंद्रराव मोऱ्यांचा त्यानें काटा काढला, तसेंच त्या स्वातंत्र्यासाठीं प्राणार्पण करणाऱ्या पठाण पलटणीला त्यानें जवळ केलें. दुसऱ्यांच्या गुणांची बूज करणें हा शिव–प्रकृतीचा विशेष लक्षांत घेतला म्हणजे ‘ तो आज असता तर ? ’ या प्रश्नाचें उत्तर मिळतें.

‘ शिवाजी आज असता तर......? ’ या प्रश्नांत त्यानें आपल्या दौऱ्यासाठीं वाहन कोणतें वापरलें असतें याला प्राधान्य नाहीं, तर त्याच्या नजरेंतील भारत कसा असला असता हें आपण पहावयास हवें. वाढत्या वयाबरोबर मनुष्य प्रवृत्ति

आणि निवृत्ति यांच्या द्वंद्वांत सांपडतो. आपल्या उड्डाणानें लंकादहन करणाऱ्या हनुमतानें प्रभु रामचंद्राच्या पायावर डोकें ठेवलें, तसें शिवाजीनें तुकाराम आणि रामदास यांच्या पायावर ठेवलें. स्वामित्वनिष्ठांच्या हातून हवें तें मिळाल्यावर तो विरक्त झाला, सेवाप्रिय झाला. जनतेच्या सुखासाठीं जो रात्रंदिवस उदासीन असतो तोंच राजा या पदवीला लायक होय. 'राजा प्रजानाम् हिताय कल्पते।' अशी संस्कृतमध्यें एक म्हण आहे.

वरील प्रश्नाचें उत्तर आजच्या आपल्या पंतप्रधानांच्या चरित्रांत सांपडेल. विश्वांतील इतर राष्ट्रांच्या तोडीचा दर्जा भारताला प्राप्त व्हावा म्हणून पंडितजींना प्रहराची देखील झोप मिळत नाहीं; तशी शिवाजीलाहि मिळाली नसती. निधर्मी राज्यव्यवस्थेचें आजच्या सरकारचें धोरण शिवाजीचेंहि होतें. तीनशें वर्षांपूर्वी पराक्रमाचें रागरंग आजच्यापेक्षां वेगळे होते. आजचा शिवाजी राष्ट्रभर फिरला असता, गुणी जनांची त्यानें निवड केली असती, त्यांना जगांतील निरनिराळ्या ठिकाणीं पाठविलें असतें; परकीय राष्ट्रांचे मनोव्यापार ओळखून त्यांच्यावर एक प्रकारची जरब बसविली असती. शिवाजी हा केवळ युद्धप्रिय नव्हता त्याला झुंज नको होती. पण सोन्याच्या पिंजऱ्यांत सुखानें डाळिंबांचे दाणे खाणाऱ्या शुकवृत्तीची त्याला चीड होती. थोडेंसें अध्यात्मिक भाषेत बोलायचें तर असें म्हणतां येईल कीं, शिवाला म्हणजे मांगल्याला मुक्त करण्यासाठीं शिवाजीचा जन्म होता. त्यासाठीं त्या वेळीं त्यानें मराठा (लढवय्या) तिनुका मेळविला. आजच्या शिवाजीनें महाराष्ट्राच्याच नव्हे तर अखिल मानवाच्या मुक्तीसाठीं, केशवसुत म्हणतात त्याप्रमाणे 'नव्या शिपायांची' सेना उभी केली असती.

'मळयास माझ्या कुंपण पडणें अगदीं न मला साहे'

असें तोहि म्हणाला असता, आणि आमरण शांतीचें साम्राज्य स्थापण्यासाठीं तो धडपडला असता. तेंच कार्य आपलें पंडितजी आज करीत नाहींत का?

• • •

## माझा आवडता संत

आवड ही आपल्या अनुभवांतून निर्माण होत असते. ज्या तऱ्हेच्या परिस्थितींत आपण वाढतो त्या परिस्थितीचा अजाणतांच आपल्या मनावर परिणाम होत असतो. त्या वातावरणांतील व्यक्तींचे स्वभावविशेष तो ग्रहण करीत.

असतो. जगाची तोंड ओळख झाल्यापासूनचें माझें आयुष्य फार खडतर परिस्थितींत गेल्यामुळें मी वाढत्या वयाबरोबर अंतर्मुख बनत गेलों. एकान्तांत मनोव्यापारांचें निरीक्षण करणें हा माझा छंद होऊन बसला. अनुभव ' वेडे वांकुडे ' कां होईना पण लिहून ठेवण्याची मला संवय जडली. पुढें मीं संतांच्या शिकवणुकीचा अभ्यास केला. या अभ्यासांत माझ्या मनावर पकड बसली ती तुकारामाच्या अभंगांची होय.

ज्ञानोबापासून विनोबापर्यंतच्या संतांचे विचार मीं वाचले आहेत. पण ज्ञानेश्वरींतलें तत्त्वज्ञान मला कळत नाहीं, समर्थांचें वैराग्य मला पाळतां येत नाहीं; आणि विनोबांचा त्याग मला करतां येत नाहीं. मी सामान्य बुद्धीचा माणूस असल्यामुळें मला त्यांच्या पातळीवर जातां येत नाहीं. शस्त्राप्रमाणें विचार हे सुद्धां पेलतां आले पाहिजेत. मारुतीच्या वंशांत जन्मलेल्या कोणत्याहि माणसानें त्याची गदा उचलण्याचा प्रयत्न केला तर उरावर द्रोणागिरी पर्वत कोसळल्यासारखें त्याला वाटेल. म्हणून मी आपला तुकाराम वाचतो. मला तो कळतो. कारण त्याचे अनुभव हे माझे म्हणजे एका सामान्य मानवाचे आहेत.

तुकाराम हा अव्यवहारी वृत्तीचा एक खेडुत होता. नफ्या–तोट्याचे कितीहि कठीण गणित तोंडीं सोडविणाऱ्या वाण्याच्या जातींत त्याचा जन्म झाला होता खरा, पण त्याला दोन नि दोनचें उत्तर देतांना विचार पडे आणि तंद्रींतून जागा झाल्यावर तो उत्तर देई, ' एक '. यांतूनच त्याचें अभंगांचें वेड निर्माण झालें. व्यापारांत जन्मभर पुरेल इतका तोटा झाल्यावर तो गांजून गेला, वेड्यासारखें करूं लागला, एकांतात रंगूं लागला, आणि अनुभवाचे बोल अभंगांतून रंगवूं लागला. एका अडाणी माणसाच्या मुखांतून निघालेलें अभंग चारशें वर्षें काळ विसरला नाहीं, यांतच तुकारामाच्या कवितेंचें मोठेपण आहे, त्याच्या कीर्तीचें मोजमाप आहे. मी तर तुकारामाला महाराष्ट्राचा टागोर म्हणेन. ' गीतांजली '–प्रमाणें तुकारामाच्या अभंगांचें इग्रजीकरण झालें असतें तर ' नोबल प्राईझ 'चा मान महाराष्ट्राला मिळाला असावा.

' निराशेचा गांव, दिधला आम्हांसी । प्रवृत्तीभागासी सांडियेलें ' ही एकदां मनाची ठेवण तयार झाल्यावर शिवाजीकडून आहेर म्हणून आलेली हिऱ्यामोत्यांचीं ताटें परत करणें त्याला सहज शक्य झालें. प्रथम डोळ्यांसमोर, पुढें डोळ्यांत आणि नंतर ध्यानींमनीं पांडुरंगाचा सहवास पायरीपायरीनें घडत गेल्या-

मुळें त्याच्या मनाची एकतानता कुठेंहि होई; त्याला बाह्य जगाचा विसर पडे. सुखाची कोमलता आणि दुःखाची कठोरता त्याला सारखी वाटूं लागे. ‘ निंदकाचेंहि घर ’ ‘ शेजारीं असावेसें ’ वाटें. तसेंच घरची बडबडी बाईलहि बाजारी वाटूं लागली. अनेक लोकांनीं पायतळीं तुडविल्या गेलेल्या धुळींतून त्याला आपलें जिवन–पुष्प फुलवावयाचें होतें. दुष्टांशीं झगडतांना, ‘ क्षमाशस्त्र जया नराचिया हातीं । दुष्ट तयांप्रति काय करी ?’ हें त्याला सांगावें लागलें. सुखासाठीं परमार्थाच्या मार्गे लागलेल्यांना ते सांगतात, ‘ ज्यांचें मन नाहीं लागलें हातासी, तेणें प्रपंचासी सोडूं नये । ’

तुकारामाच्या वाणींत सामान्य माणसाची ओळख पटते. षड्रिपूंच्या पकडींतून सुटत सुखाचा मोक्षपट चढूं इच्छिणाऱ्या माणसाचे विचार तींत असल्यामुळें ते कुणालाही ओळखीचें, म्हणून जवळचें वाटतात. त्याच्या अभंगांत संसारांत कढणाऱ्या जिवाचे क्लेश आहेत. विष प्राशन करणारा मनुष्य दुसऱ्याच्या कंठीं अमृताचे कलश रिकामे व्हावेत अशी इच्छा करतो. ती उत्कट इच्छा तुकारामाच्या अभंगांच्या मात्रेमात्रेंतून प्रकट होते म्हणूनच मला तो आवडतो. ● ● ●

# आजोबांचें घड्याळ

लवाजम्याचे हत्ती झुलती  
लक्ष्य त्यांकडे देतो कोण  
‘ आला क्षण–गेला क्षण ! ’ —केशवसुत

आमच्या खोलींत आजोबांच्या वेळचें घड्याळ आहे. मला कळायला लागल्यापासून एकदांसुद्धां तें बंद पडलेलें नाहीं. ‘ खाणें कमी आणि काम जास्त ’ अशा तऱ्हेच्या माणसांप्रमाणें, एकदां किल्ली दिली कीं, आठवडाभर ‘ टक् टक् टक् टक् ’ करीत तें निमिष–पळाच्या गर्दीतून मार्ग काढतें. ‘ सागराची भरती आणि काळाची फिरती ’ही कुणी रोधूं शकत नाहीं, अशा अर्थाचें इंग्रजींत एक वाक्य आहे. त्याचा अनुभव आमच्या या आजोबांच्या घड्याळावरून येतो. गेल्या पन्नास वर्षांचा आमच्या घराण्याचा दोन पिढ्यांचा इतिहास ह्या घड्याळानें आपल्या तबकडीवर लिहून ठेविला आहे.

असें ऐकतों कीं आमचे आजोबा एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकांत

मुंबईला आले. त्या वेळच्या एका चांगल्याशा वस्तीच्या चाळींत (तिचें नांव केशवजी नाईकाची चाळ. अजूनहि आम्ही तिथेंच रहातों.) त्यांनीं बिऱ्हाड थाटलें. बिऱ्हाड कसलें? आजी तर अखेरपर्यंत कोंकणांतच होती. तेव्हां हातांनीं स्वयंपाक करायचा आणि जनरल पोष्टांत कामावर जायचें, ह्यांतच काकांचा दिवस संपायचा. पण या एकमार्गी जीवनात त्यांना आजींपेक्षां घड्याळाचीच अधिक मदत झाली. हें घड्याळ त्यांनीं अकरा रुपयाला घेतलें म्हणतात. पण पेन्शन येईपर्यंत आजोबांच्या जीवनांतील तीस आणि पांच वर्षें या घड्याळांनीं आपल्या तालावर नाचविलीं, टोल्यावर नादविलीं. सकाळीं पांचच्या सुमारास विहीरीवर स्नान करून आजोबा पूजाअर्चा करीत. ऋतुमान बदललें तरी या कार्यक्रमांत काडीचाहि बदल होत नसे. थंडीच्या दिवसांत दांतखिळी बसेल इतकी थंडी असतांनादेखील विहीरीवर पहांटे पंचा धुतांना आजोबांचें एखाद्या स्तोत्रांचें पठण चालू असे. शेजाऱ्यांच्या तोंडून मी जेव्हां त्यांची ही स्तुति ऐकतों तेव्हां मला माझ्या दिनचर्येची लाज वाटते.

आज आम्हीं त्याच चाळींत पण वरच्या मजल्यावर राहतों. वडिलांनीं ही जागा बदलून घेतली. आतां जुन्या चाळींतहि खूप बदल झाला आहे. माझे वडिल 'जी. पी. ओं.' तच आजोबांच्या वशिल्यानें लागले. आतां ते मुख्य कारकुनाच्या जागेवर आहेत. पण नक्षीदार शिसवी लाकडाचें कपाट आणि हें अकरा रुपयांचें घड्याळ ह्याशिवाय आजोबांच्या कारकीर्दीची निशाणी अशी आमच्या बिऱ्हाडांत नाहीं. आजोबांनीं इतक्या वर्षांत आपला फोटोहि काढून घेतला नाहीं. त्यामुळें कपाटाच्या वरच्या बाजूस लाकडी पट्टीवर बसविलेलें हें घड्याळ दिसलें कीं मला आजोबांची आठवण होते. जुन्या पिढीचा आदर्श मित्र म्हणून मी त्याकडे पाहतों. आज आमच्याकडे टेबलावरील गजराचें घड्याळ आणि बाबांचें हातांतील घड्याळ अशीं आणखी दोन घड्याळें आहेत. पण महागाईच्या भावांत घेतलेल्या या चीजवस्तु कचकड्याच्या खेळण्यासारख्या हरघडी निरुपयोगी होतात. मग वाटतें कीं आजच्या दिखाऊ जगापेक्षां कालचें टिकाऊ जगच काळाशीं दोन हात करूं शकत होतें.

दर रविवारीं खोल्या साफ करण्याचें काम माझ्याकडे असतें. शिसवाच्या कपाटावरील धूळ झाडण्यासाठीं त इकडून तिकडे सरकाविण्याची पाळी येते तेव्हां तें मला एकट्याला हालत नाहीं. मी आईची मदत घेतों. तें सरकावितांना

कधीं आई म्हणते 'बघितलंस बाळू ! मामंजींनीं थाटलेला संसार असा भारी वजनाचा होता. त्यांतील वस्तू आज पहायलाहि मिळत नाहींत. पण तुझ्या वडिलांनीं त्या पडत्या किंमतीला देऊन टाकिल्या.' आईचे हे अनुभवाचे शब्द ऐकून मला शंका येते कीं, बाबा हेंहि घड्याळ त्याच्या कटकटीला कंटाळून एखाद्या जरीपुराणावाल्याला देऊन टाकतील आणि मग माझ्या आजोबांच्या आयुष्याला अखेरपर्यंत सोबत करणारी एक वस्तु 'चोर बाजारांतील चिजांत' सामील होईल, ह्या जाणीवेनें माझे डोळे ओले होतात. ● ● ●

# माथेरानची सफर

आम्हां शहरांतल्या माणसांचा निसर्गाशीं फारच थोडा संबंध येतो. राणीचा बाग, वाळकेश्वरची टेकडी आणि चौपाटीवरचा समुद्र, हींच काय तीं आमचीं विहार करण्याचीं ठिकाणें. म्हणून दूरवर जाण्याचा योग आला तर तो मी सहसा दवडीत नाहीं. गेल्या वर्षीच्या डिसेंबरांत मी असाच एका शाळेच्या विद्यार्थ्यां-बरोबर माथेरानला गेलों होतों.

एखाद्या व्यक्तीची अगर ठिकाणाची आपण ख्याति ऐकली कीं आपलें मन तिकडे ओढ घेऊं लागतें. माथेरानच्या बाबतींत माझें असेंच झालें होतें. बैठकींत एखादे वेळीं देशाटनाच्या गप्पा निघाल्या कीं रेल्वेचे जन्माचे ऋणानुबंधी असलेले माझे मित्र फुकट मिळालेल्या पासाच्या जोरावर केलेल्या सफरींचीं चुरचुरीत वर्णनें करतात. ऐकणाराला ते काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत फिरवून आणतात. अशाच बैठकींतील वर्णनें ऐकून माथेरानला जाण्याचा योग आला तर तो दवडायचा नाहीं असें मीं मनाशीं ठरविलें.

माथेरान हें महाराष्ट्राचें काश्मीर आहे. नेरळवरून नागमोडी वळणें घेत दोन डब्यांची गाडी जेव्हां ह्या काश्मीरच्या दऱ्याखोऱ्यांना कुशींत घेत घेत वर जाते, तेव्हांचा निसर्गाचा देखावा मोठा अप्रतिम दिसतो टेकड्यांवरील पठारावर राहणारीं आदिवासींचीं उघडीनागडीं पोरें पै–पैशाकरितां आगगाडीबरोबर धांवतांना पाहिलीं तेव्हां मी स्वतःच्या कपड्याकडे पाहून संकोचलों. कंजुषालाहि कर्ण बनविणारे ते दारिद्र्य पाहून मी खिशांतील नाणीं त्यांचा आकार न पाहतां त्यांच्यावर उधळीत वर आलों. अर्धें अधिक अंतर चढल्यावर 'उल्हास पॉइंट'

लागतो. तेथून कर्जतवरून कल्याणकडे वाहात जाणारी ' उल्हास ' नदी एखाद्या प्रौढेप्रमाणें धीरगंभीर दिसते. शिखरावरील पठारावर गेल्यावर तर किती तरी पॉइंटस् ( कडे ) आपापल्या दिशांशीं एकरूप झालेले दिसतात.

माथेरानमधून फेरफटका करणाराला विशेष लक्षांत येण्यासारखी गोष्ट म्हणजे रामाच्या सेतुबंधनासाठीं मारुतीला मदत करणाऱ्या माकडांचा संचार. तेथील माकडें इतकीं धीट व प्रसंगीं उग्र आहेत कीं, एखाद्याच्या हातांत खाण्याची वस्तु असेल आणि तो जरा आडवाटेनें जात असेल तर तीं सरळ सरळ हल्ला करतात. राणीच्या बागेंतील पिंजऱ्यासमोर उभे राहून त्यांना नाक खाजवून दाखविणाऱ्या मुलांनांच नव्हे तर त्यांच्या बापाला ( हा माझा प्रत्यक्ष अनुभव आहे ) देखिल हीं माकडें दबत नाहींत. येथील रस्त्यावरील धूळ तांबड्या रंगाची आहे. त्यामुळें कितीहि दरिद्री मनुष्य असला तरी त्याच्या वस्त्राला तांबूस किनार चढावयाचीच. येथील सर्वच कडे–पॉइंटस् कांहीं पहाण्याजोगे नाहींत. पण ' आर्टिस्ट ' व ' एको पॉइंट ' वरून दिसणारी वनश्री दर्शनीय आहे. कवि दत्त यांच्या ' बघुनि मन घालें–साफल्य दृष्टिचें झालें ' या चरणांची त्या वेळीं आठवण होते.

माणसाचा हा स्वभावच आहे कीं, एखाद्या व्यक्तीचे अगर वस्तूचे कांहीं विशेष गुण आवडले कीं त्याचें रसभरित वर्णन करायचें. माथेरानच्या बाबतींत असेंच झालें आहे. माथेरानच्या प्रत्येक पॉइंटस्चे टीचभर लांब जिभेनें वर्णन करीत सुटणारी एखादी व्यक्ती मला भेटली कीं मी गप्प बसतों, आणि मनांत म्हणतो, ' सह्याद्रीचे हे कडे माणसानें घासून पुसून साफ केले आहेत, यापलीकडे यांत काय आहे ? ' असें म्हणतांना माझा हेतु हा असतो कीं, सौंदर्याचें वर्णन करण्याच्या भानगडींत साधारण माणसांनीं पडूं नये. तसें करतांना तो सत्यस्वरूप सांगत असला तरी सौंदर्य हें भावनेनीं आकलन करावयाचे असल्यामुळें तें ग्रहण करणाऱ्या व्यक्तीचें हृदय मुकें व्हावयास हवें. माथेरानला वाहनें नाहींत. रंकापासून रावापर्यंत साऱ्यांना पायाचीच गति घ्यावी लागते. जे अगतिक आहेत अगर जे ' कांचनलाल ' आहेत त्यांच्याकरितां रिक्षांची सोय आहे. पण माणसांनीं पोटासाठीं माणसाला ओढून, प्रसंगीं वाहून नेण्याची कल्पना माझ्या मनाला सहन होत नाहीं.

याशिवाय पहाणाराला तेथें अनेक गोष्टी पहाण्याजोग्या आहेत. पण माझ्या जिवाला जाणवलेली गोष्ट म्हणजे वीर कोतवाल यांच्या वृद्ध पित्याची भेट.

कोतवाल हे बेचाळीसच्या संग्रामांतील, कर्जत तालुक्यांतील, एक आघाडीचे कार्यकर्ते. दलितांसाठीं कांहीं वर्षें त्यांनीं वकिलीचा पेशा पत्करिला. पण पुढें तो काळा झगा त्यांनीं फेकून दिला आणि ते लढ्यांत सामील झाले. माथेरानच्या कडेकपारींतून गनिमी काव्यानें ब्रिटिशांशीं लढतां लढतांच या धीरोदात्त पुरुषाला मरण आलें. त्यांच्या वडिलांच्या तोंडून मीं जेव्हां त्यांचा इतिहास ऐकला तेव्हां माझें मन हेलावलें. आणि वाटलें, ज्या कड्यावरून खालीं नजर फेकतांना आमचे डोळे गरगरतात, गात्रें थरथरतात, त्याच कड्यांवरून साम्राज्यशाहीच्या पोलादी शिलेदारांच्या हातून संगिनी हिसकावून घेणाऱ्या कोतवालांचें कौतुक

‘ मुक्या मनानें किति उधळावे शब्दांचें बुडबुडे
तुझ्यावरि शब्दांचे बुडबुडे
तुझे पवाडे गातिल पुढती तोफांचे चौघडे ’

या कवि गोविंदांच्या शब्दांतच करावयास हवें.

माझ्या मनांतील माथेरानच्या स्मृति ह्या अशा आहेत. प्रवासाला निघालों कीं बरोबर काय घ्यायचें ह्याचा मी फारसा विचार करीत नाहीं. दृश्य वस्तूंशीं मन एकरूप झालें कीं पायांतील वहाण मी कुठेंतरी विसरतों; बरोबर घेतलेली शिदोरी कुणी लांबविली तरी (या बाबतींत माकडांत आणि माणसांत मला साम्य वाटतें) डोळे उघडे असून मी तिकडे बघत नाहीं. फक्त मन...त्याला मात्र जरा सुद्धां अचल होऊं देत नाहीं. पावलोपावलीं मी त्याला जाणीव देत असतों. ‘ हें पहा ! हें वेंचून घे ! इथें घटकाभर बैस ! निसर्गांतील रूप–रस–गंध–नाद यांचें असें साहचर्य नेहमीं तुला पहावयास मिळणार नाहीं. ’ म्हणूनच कुठलाहि प्रवास करण्यासाठीं उत्कंठित झालेलें माझें मन तो पुरा झाल्यावर समाधानानें आकंठ भरून येतें आणि नव्या जोमानें मी कामाला लागतों. ● ● ●

# हस्ताक्षर आणि झरणी

‘ गातां गळा
शिंपितां मळा
लिहितां हातवळा ’

1963

जुन्या पिढीचें हस्ताक्षर पाहिलें कीं वरील चरणांची आठवण होते. हेमाडपंती मोडी लिपी तर राहोच (कारण ती आतां तालुक्याच्या ठिकाणच्या कचेरींतील दप्तरांत वाळवीचें भक्ष्य होऊन राहिली आहे.), पण वळणदार बालबोध अक्षरहि आतां पहावयास मिळत नाहीं. याचें कारण खालच्या वर्गांतील मुलांना वीस–पंचवीस वर्षांपूर्वी शाळेंतून जे कित्ते गिरवावे लागत असत ते आज लागत नाहींत. प्रत्येक वर्गाच्या भिंतीवर आमच्या वेळेस एखाद्या शिक्षकाच्या सुंदर हस्ताक्षरांत वेळापत्रकांचे, अभ्यासक्रमांचे आणि बाराखड्यांचे तक्ते लिहिलेले असत. शाळा ही मुलांना पूर्वी आश्रमाप्रमाणें वाटत होती. गुरुकुलांतील प्रत्येक पाठ श्रम घेऊन शिकविला जात असे. मोत्यांसारखें गोल अक्षरांतलें त्याचें फळ्यावरील लेखन मुलांच्या डोळ्यांत भरत असे. शिक्षकांनीं आदर्श हस्ताक्षर पाटीवर अगर फळ्यावर काढून दाखविलें नाहीं तर मुलांच्यापासून तरी वळणदार अक्षराची अपेक्षा कशी करतां येईल ? शिक्षकाचा वटहुकुम निघाला कीं मुलें लिहितात; पण त्यांत हौशीपेक्षां जुलुमाचाच मामला अधिक असतो. शिक्षकांप्रमाणें विद्यार्थीहि हस्ताक्षराबाबत श्रम घेत नाहींत ही गोष्ट तितकीच खरी आहे. उत्तम हस्ताक्षर कोणतें हें त्यांना समजतें पण तसें आपणांस काढतां आलें पाहिजे ही जी आंच असावी लागते, ती त्यांना नसते. माझ्या ह्या विधानाला कांहीं अपवाद असूं शकतील याची मला जाणीव आहे.

नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनीं झरणी वापरूं नये असा हुकूम शाळाखात्यानें नुकताच फर्माविला आहे. कित्येक शाळांनीं तो अंमलांतहि आणिला आहे. पण त्याच्यावर 'लोकमान्य' कारांनीं जो आक्षेप घेतला आहे त्याच्याशीं मी सहमत आहे. झरणी वापरल्यानें अक्षर बिघडतें हें मलाहि मान्य नाहीं. झरणी हें जलद आणि सहज लिहितां यावें म्हणून कल्पक डोक्यांतून निघालेलें एक साधन आहे. आणि उत्तम हस्ताक्षर हें साध्य आहे. परंतु असें लिहितांना सरकारचा खालच्या वर्गांत झरणी न वापरूं देण्यांत जो सुप्त उद्देश आहे तोहि मी जाणूं शकतों. बाल वयांत झरणी वापरण्यांत मुलांना एकप्रकारची हौस वाटते. ती हौस आईवडिलांनीं पुरवूं नये असें कोण म्हणेल ? पण तिरकसपणें खिशाला लटकवलेल्या त्या झरणीच्या तोऱ्यांत उत्तम हस्ताक्षरासाठीं श्रम घ्यायला पाहिजेत हें तो विसरतो. मांडी आणि मान मोडून पुस्ती गिरविण्याचें युग सरलें असलें, तरी हस्ताक्षराला वळण येण्यासाठीं कोणता तरी उपाय योजावयास हवाच ना ? कोणत्याहि क्षेत्रांत तपावांचून माणसाला फळ नाहीं; तर उत्तम हस्ताक्षर तरी विनासायास कसें यावें ?

'असाध्य तें साध्य । करितां सायास ॥
कारण अभ्यास तुका म्हणे ' ॥

असो ! 'झरणीचा उपयोग कोणत्या वर्गात करावयाचा?' याला सरकारी शाळाखात्यानें जो हुकूम काढला आहे, तो वयाप्रमाणें करतां येत नाहीं म्हणून वर्गाप्रमाणें काढला आहे. कारण एकाच वर्गांत लहानमोठीं मुलें असतात. माझ्या मतें झरणीचा उपयोग कोणत्या वयांत अगर वर्गांत करावा ही गोष्ट नियमाच्या चौकटींत बसवूं नये. कोणतीहि गोष्ट कायद्याच्या कलमावर नाचूं लागली कीं तिच्यांतील स्वारस्य कमी होतें. तींत 'तोच तो'पणा येऊं लागतो. तर त्याकरितां आदर्श हस्ताक्षरांचें तक्ते शाळांमधून लावण्याकरितां सरकारनें तयार करावेत. अलीकडे विद्यार्थी-वर्गांत हस्तलिखित नियतकालिकें परिश्रम घेऊन तयार करण्याची आवड उत्पन्न झालेली आहे. तिला सरकारनें उत्तेजन द्यावें. तसेंच प्रत्येक शाळा-कॉलेजांतील सर्वोत्कृष्ट हस्ताक्षर असलेल्या विद्यार्थ्यांस प्रशस्ति-पत्रें दिलीं गेलीं पाहिजेत. एकुण आजच्या विद्यार्थी-वर्गांत ही गोष्ट बिंबली पाहिजे कीं हस्ताक्षराला परीक्षेंतच नव्हे तर पोटाचा प्रश्न सोडवितांनाहि प्राधान्य आहे.

● ● ●

## युद्धस्य कथा रम्या

माणसाच्या आवडी-निवडीबद्दल अजूनपर्यंत खूप लिहिलें गेलें आहे. अनेक प्रिय गोष्टींत त्याची कलह-प्रियता अधिक आहे. अधूनमधून भांडल्याशिवाय किंवा भांडण लावल्याशिवाय त्याला चैन पडत नाहीं. भांडायला अंगांत दम लागतो, कुवत लागते. ती कुवत सर्वांच्यांतच असते असें नाहीं. पण भांडण लावून 'बऱ्याची' भूमिका घेणारे आपणांस पुष्कळजण आढळतात. मीहि त्याला कांहीं अपवाद नाहीं. लहानपणीं म्युनिसिपालिटीच्या शाळेंत असतांना दोन गटांत मारामारी लावून दिली नाहीं असा एकहि दिवस त्या चार वर्षांत मावळला नाहीं. 'कण्या टाकून कोंबड्या झुंजवणें' ही खेडुतांच्या तोंडीं असलेली म्हण माणसाच्या युद्धप्रियतेचीच निशाणी आहे. कलागति लावणारा मनुष्य भांडणाला निमित्त शोधीत असतो. तो वृत्तीनें भित्रा असला तरी त्याला भांडणाऱ्यांची साहसी वृत्ती आवडत असते. कोंबड्यांच्या झुंजीसारखी बैल व रेडे यांचीहि झुंज लावतात. ती पहाण्यासाठीं सबंध माळ गांवांतील थोरांपोरांनीं फुलून जातो.

अजूनपर्यंत संस्थानांतहि हत्तींची साठमारी लावण्याची पद्धत होती. युद्ध हें सुद्धां व्यापक प्रमाणांतील कलह–प्रियता भागवून घेण्याचें साधनच नव्हे काय ? जगाच्या आरंभापासून तें अंतापर्यंत हीं युद्धें होणारच. ममत्वानें जग फुलविणारा साधु-संत युगायुगांतून एखादाच निघतो. कोट्यावधी लोकांचें जीवन जिवाणूसारखें जगण्यांत असतें, स्वामित्वासाठीं मरण्यांत असतें. स्वामित्व आलें कीं मतभेद आलेंच. मतभेद ही युद्धाची पूर्वतयारी होय.

शेंकडों वर्षांपूर्वी घडलेल्या गोष्टींचें रोमहर्षक वर्णन आपण कान देऊन ऐकतो, याचें कारण आपली युद्धप्रियताच होय. झांशीच्या राणीचा पराक्रम, शिवाजीनें जागविलेल्या महाराष्ट्राची मर्दुमकी, संताजी–धनाजीची घोडदौड, वासुदेव बळवंतांचा साम्राज्यशाहीशीं मुकाबला, भगतसिंग सुखदेव आणि राज-गुरु यांचें स्वातंत्र्यासाठीं हसत फांसावर लटकणें या सार्‍या गोष्टींचें चित्रण नाट्य-कथेंतून पहातांना हजारों मनांची समाधि लागते. आपणांस करतां आलें नाहीं तें ह्या धीरोदात्त व्यक्तींनीं केलें म्हणून त्यांच्याबद्दल एकप्रकारचा आदर वाटतो.

साधारण माणसाला आपल्या स्वतःच्या अंगाला स्पर्श न होतां, धडपड न करतां, रक्त न सांडतां सारें हवें असते. परंतु कोणतीहि गोष्ट प्राणपणाला लाविल्याशिवाय साध्य होत नाहीं. तेव्हां अशा झुंजार वृत्तीच्या माणसांच्या जीवनांतील समर–प्रसंग आपल्याच आयुष्यांत घडत आहेत अशी कल्पना करून त्या रम्यतेंत रंगून जाणें प्रत्येकाला आवडतें. ● ● ●

## मोठीं माणसें

मोठ्या माणसांची व्याख्या करतां येणार नाहीं. कारण एकदोन गुण उत्कट-त्वानें अंगीं वसत असलेल्या माणसाला मोठें होतां येतें, हें मी माझ्यासमोर असलेल्या माणसांवरून सांगू शकतों. शिवाय मोठेपणा आणि चांगुलपणा ह्या गोष्टी अगदीं वेगळ्या आहेत. सकलगुणांनीं युक्त असलेल्या संन्याशाच्या डोक्यावर कुणी मोठेपणाचा मुकुट चढवीत नाहीं. नित्यनियमानें मंदिरांत जाऊन पावन होणार्‍या व्यक्तीचा उपयोग सरकारी नोकरीला लागणार्‍या चिठ्ठीचपाटीसाठींहि होत नाहीं. मग मोठेपणा कशावर तोलायचा हा मोठा प्रश्न आहे.

या ठिकाणीं आपण कीर्तीच्या शिखरावर चढलेल्या, जगाच्या डोळ्यांत

भरलेल्या माणसांना मोठे मानू या! त्यांचे आत्मे तुमच्या–आमच्यापेक्षां मोठे आहेत म्हणून त्यांना 'महात्मे' या शब्दानें संबोधूं या! मग लगेच–

'थोर महात्मे होउनि गेलें चरित्र त्यांचें पहा जरा
आपण त्यांच्या समान व्हावें हाचि सांपडे बोध खरा'

या चरणांची आठवण होते. अनेक असामान्य कृतींत माणसाला यश मिळालें कीं आपलें लक्ष त्याच्याकडे वेधिलें जातें. त्याला आपण मोठा म्हणतो. त्याचा आदर्श आपण डोळ्यांपुढें ठेऊन चालतो.

परंतु मोठेपणाला देखील पैलू असतात. 'समानशीले व्यसनेषु सख्यम्' या न्यायानें आपल्या आवडीच्या विषयांत ज्याला नेतृत्व मिळालें असेल त्याचें अनुयायित्व आपण स्वीकारतों. अनुकरण हें प्राण्याच्या हातून बुद्धयाच होतें असें नाहीं, कित्येक वेळां तें नकळत होत असतें. मनुष्य हा गुणांचा पूजक आहे; मग ते गुण देवांचे असोत वा मानवांचे असोत. ज्या देवांचे वा मानवांचे गुण आपल्याशीं मिळते आहेत, जुळते आहेत, त्यांच्यासारखे होण्याची आपल्या अंतरींची तळमळ आपण पूजेच्या रूपानें व्यक्त करतो. पण ज्या वयांत मनुष्य आकांक्षांच्या पंखांनीं मोठेपणाच्या आकाशांत उडण्याचा प्रयत्न करतो, त्या तरुण वयांत त्याच्या मनावर अनेक तऱ्हेच्या कर्तृत्वाची मोहिनी पडलेली असते. कधीं बुद्धाच्या ध्यानमग्न मूर्तींतून प्रेरणा घेऊन सर्वस्वावर पाणी सोडावयास तो तयार होतो, कधीं जयप्रकाशजींच्या ठाशीव व्यक्तिमत्वानें आकर्षित होऊन समाजवादाचा 'ओनामा' शिकावा असें त्यांस वाटूं लागतें, तर कधीं सावरकरांच्या ज्वलंत जीवनांतून उडालेले स्फूर्तीचे क्षण त्याचें मन पेटावितात.

हीं झालीं राजकारणांतील उदाहरणें. वाङ्मयीन क्षेत्रांतदेखील तरुण मनाची अशीच द्विधा मनस्थिति होत असते. कधीं फडके–खांडेकर आणि गाडगीळ गोखले–भावे यांच्या कथा वाचून तो कथाकार होण्याचें ठरवितो, कधीं केशवसुत-कुसुमाग्रजांच्या तडफदार कवितेनें तो वेडा होतो आणि गातो,

'पद्य–पंक्तिची तरफ आमुच्या करीं विधीनें दिली असे
टेकुनि ती जनता–शीर्षावर जग उलथुनिया देउं कसें?'

तर कधीं अत्र्यांसारख्या तुफानी वक्तृत्वानें महाराष्ट्राच्या मनाचें आपण ताईत बनावें असें तो मनाशीं ठरवितो. हें करावें कीं तें करावें अशा भांबावलेल्या परिस्थितींत त्याच्या हातून कांहींच होत नाहीं.

१७३५८ अनुक्रम ५५.१० २९।७।७ ८७/

सात रस्ते फुटलेल्या वर्तुळाशीं उभें राहिलें असतां योग्य तो रस्ता शोधून काढणें कठीण आहे. कित्येक बुद्धिवान माणसांना हवा तो रस्ता सांपडत नाहीं. उलट कित्येक सामान्य माणसें पुढें गेलेली आपण पाहतों. तेव्हां यांत नशिबाचाहि अंश आलाच. तरीपण एक गोष्ट खचित कीं कित्येक माणसांना वाट माहीत असूनदेखील कर्तबगारीचें ओझें घेऊन ती आक्रमितां येत नाहीं. मोठें होण्याची मनीषा पुष्कळांना असते, पण त्यासाठीं लागणारी चिकाटी, मिळालेल्या वेळेचा भरपूर उपयोग, कार्याचा निदिध्यास, इत्यादि गुणांच्या अभावीं मोठें होणें साधत नाहीं. जळल्याशिवाय मोठेपण मिळत नाहीं. सोन्याला आपली किंमत येण्यापूर्वी अग्नींत जळावें लागतें. 'पावन '–खिंडींतून प्रवास करणाऱ्या पतिताला परमेश्वर भेटण्यापूर्वी उत्कर्षाचे अनेक मारेकरी भेटत असतात. त्यांना जिंकून जो पुढें जातो, तोच मोठा होऊं शकतो. ● ● ●

# बैलगाडीचा प्रवास

विमान-विहाराच्या आजच्या युगांत बैलगाडीच्या प्रवासाची कल्पनाच एखाद्याला हास्यास्पद वाटेल. आजोबांचा बावन बटनांचा डगला नातवांनीं अंगावर चढविला तर त्याला तो ढगलमजीसारखा दिसेल. त्याला सुटसुटीत बुशकोटच हवा. बरोबर आहे. काळाबरोबर वेष बदलला तशीं वाहनेंहि बदललीं आहेत. बैलगाडी गेली, टांगा टाकाऊ ठरला, मोटर मागें पडली आणि उद्यांचा मानव पांखराच्या पंखानें विमानांतून भरारणार आहे. इतकें असूनहि बैलगाडीच्या प्रवासाची माझी हौस अजून कायम आहे.

आमच्या कोंकणांत बैलगाडी हें माणसें आणि मालाची ने–आण करण्याचें एक प्रमुख वाहन आहे. कांहीं मोठ्या रस्त्यावरून मोटारी धांवतात. पण खेडुतांच्या खिशाला त्या परवडत नाहींत. प्रत्येक गांवांत चारदोन तरी सुखवस्तु लोक असतात. त्यांच्याकडे पांचसात बैलजोड्या असतात. त्यापैकीं एक जोडी ते 'छकडी 'साठीं वापरतात. छकडी म्हणजे हलकी गाडी. ह्या गाडीचे बैल बैठे ठेवलेले असतात. त्यांना खाणें सकस आणि काम कमी. धन्याच्या खास देखरेखी खालीं त्यांची तैनात ठेवलेली असते. गळयांत मण्या–घुंगरांच्या माळा, शिंगांना रंग आणि शेपट्यांचें वर्तुळाकार कातरलेलें गोंडे यामुळें ही बैलांची जोडी घटका

भर पहावीशी वाटते. घन्याची मर्जी लागली कीं सायंकाळच्या उतरत्या उन्हांत तो छकडी घेऊन फिरायला निघतो.

पण मी जो प्रवास पसंत करतों तो छकडीचा नव्हे, बारदानी बैलगाडीचा. मला पांखरांच्या वेगानें भरारत जावेंसें वाटत नाहीं, हंसांच्या डौलानें आपल्याच नादांत चालणारे बैल मला आवडतात. महाड चिपळूणच्या बाजूस लांब गाड्या असतात. त्या गाड्यांचे बैल शरिरानें धिप्पाड आणि गतीनें धिम्मे असतात. लांबच्या पल्ल्याला यांचा फार उपयोग होतो. अशा बैलांच्या गाडींतून चांदण्या रात्रीं प्रवास करतांना मनाला एक वेगळाच आनंद होत असतो. दुतर्फा भरगच्च झाडी असलेल्या नागमोडी रस्त्यानें गाडी वळणें घेत घेत घाटमाथा चढत आहे, चांदण्याच्या शीतलतेंत सृष्टिसती नाहून निघत आहे, प्रत्येक वळणावर तिच्या सौंदर्याचा वेगळा पैलू आपली नजरबंदी करीत आहे; अशा वेळीं पेंगलेल्या गात्रांत तर झोप उतरलेली असते आणि सृष्टिसौंदर्य पहाण्यांत तल्लीन झालेले डोळे मिटायला कबूल नसतात. मग बैलांच्या गळ्यांतील घुंगुरांच्या नादांत पेंगत पेंगत पहाटे झोप कधीं लागते तें कळत नाहीं. उठून पहावें तों घाट सरून गाडी सपाटीला लागलेली असते. दूरदूरचे गांव अधीरतेनें भेटायला येत असलेले दिसतात. तो ओढा, तो गांवानजीकचा पिंपळाचा पार, जरा पुढें तें मारुतीचें पडकें देऊळ आणि वळणावर ती लोकल बोर्डाची मराठी शाळा ह्या गांवच्या खुणा दिसूं लागल्यावर मनाला होणारा हर्ष...एखाद्या मध्यम वर्गीय कुटुंबांतील स्त्रीनें आपल्या एकुलत्या एक पैठणीची घडी मोडतांना तिला होणाऱ्या हर्षाशीं त्याची तुलना करतां येईल.

हा अनुभव वर्षांतून एखादे वेळेसच येतो. पण इकडे शहरांतून रस्त्यानें जातांना एखादी बैलगाडी पाहिली कीं त्या स्मृतीचे पापुद्रे मनांत उमलतात. त्या क्षणीं मनांत येते, 'घ्यावी आठ-दहा दिवसांची रजा आणि जावें गांवाला बैलगाडीचा प्रवास करायला!'

• • •

## सुभाषितें आणि सुधारणा

सुभाषितें हा संतांच्या जीवन-पुष्पांचा मकरंद आहे. फूल पूर्णपणें उमलल्यावर त्यांत मध तयार होतो. त्या मधाचें पान करणारे भ्रमर आणि संग्रह करणाऱ्या मधमाशा केवळ त्यावर जगतात. थोरांची सहानुभूति विशाल असते.

क्लेश मृत्यूला कवटाळणारे असतात. सहनशक्ति सूर्याला जाळण्याइतकी असते. अशांच्या मुखांतून निघालेली वाणी पूर्वी शिलालेखाइतकी अक्षर ठरत असे. ' तो जे बोलेल तें वेदवाक्य ' या शब्दांत एखाद्याचा उल्लेख जेव्हां आपण करतो, तेव्हां वेदवाक्य या शब्दावर जोर असतो. त्याच्यामागें तपश्चर्येचीं तेजोवलयें असतात. पूर्वीचे ऋषि सहसा संतापत नसत. पण एकदां का संतापले कीं त्यांच्या मुखावाटें जें बाहेर पडई, तें खरें ठरे. त्यालाच आपण शाप म्हणतो. समाधानी वृत्तींत ते ऋषि जें बोलत तें ' वरदान ' होय. तेव्हां सुभाषितांचा जन्म चिंतनशील मनाच्या पोटीं होत असतो.

सुभाषितांचें वेड प्रत्येकाला थोडें अधिक असतेंच. कोण ती जाणून वापरतो, कुणाच्या मुखांतून तीं अजाणतां बाहेर येतात. उत्कृष्ट सुभाषितें पाठ करावीं लागत नाहींत. रोजच्या जीवनांत अनुभवास येणारे दाखले त्यांत असल्यामुळें तीं आपोआप पाठ होतात. माजघरांतच कुठेंतरी विसरलेल्या वस्तूचा शोध करणारी आजी ' काखेंत कळसा गांवाला वळसा ' हें ती वस्तु सांपडतांच बोलून जाते तं कांहीं यमक आणि अतिशयोक्तीचा अभ्यासत्व करून नव्हे. 'मेल्या म्हशीला पांच शेर दूध ' ही जगरहाटी पदोपदीं आपल्या प्रत्ययाला येते. ' विशीं विद्या, तिशीं धन ', 'विद्वान् सर्वत्र पूज्यते ', ' सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते ', ' पुष्पसंगें मातीस वास लागे ' ' अति सर्वत्र वर्जयेत् ' ' कांट्यावांचुनि गुलाब नाहीं ' ' साठी बुद्धि नाठी ' अशीं शेकडों वाक्यें व्यवहाराची भाषा बोलणाऱ्यांच्या वाणींतून बाहेर येतात. ती वापरणारा कांहीं भाषाजड पंडित असावा लागत नाहीं.

सुभाषितानें सुधारणा होते कीं नाहीं हा वादग्रस्त प्रश्न आहे. मद्यपानविषयक नाटक पहाणारे हजारों श्रोते तडकाफडकीं दारू सोडण्याची शपथ घेत नसले तरी श्रोत्यांत एखादा सुधाकर अगर एखादी सिंधु असेल तर......तर त्यांच्या मनावर संस्कार होणार नाहीं असें म्हणणे वेडेपणाचें आहे. तेव्हां सुभाषितानें सुधारणा होणें न होणें हें मनाच्या धारणेवर अवलंबून आहे. मिनिटागणिक सिगारेटचे झुरके मारणाऱ्या धूम्रपानबहाद्दराप्रमाणें सुभाषितांचीं वलयें निर्माण करणारे कांहींजण मला माहीत आहेत. त्यांचें भाषण म्हणजे एक मेजवानी असते. पण मिष्टान्नावर हात मारतांना प्रकृति सुधारण्याचा आपला हेतु नसतो. तसा तो असला तरी ती सुधारेलच असें नव्हे. त्याउलट कधीं काळीं एखादें सुभाषित वापरणारे विचारवंत मीं पाहिलेले आहेत. भावनेनें ओथंबलेलें भाषण श्रोत्यांच्या गळीं

उतरल्यावर, त्यांनीं समाधानाचा ढेकर दिल्यावर मुखशुद्धि म्हणून एखादें सुभाषित तोंडांत असेल तर तें विड्याप्रमाणें पाचक ठरतें. सुभाषित पचणें न पचणें ज्याच्या त्याच्या प्रकृतीवर अवलंबून आहे. निंदकाचें घर शेजारी असूनहि तुकारामाची कीर्ती इंद्रायणीच्या पाण्यावर तरलीच ना ?

सुभाषितें हीं ज्या मुखांतून बाहेर येतात त्या व्यक्तीच्या मनाचा आकार त्यांना येतो. चिंतनशील मनांतून उमललेलें सुभाषित हें कल्पनाप्रिय मनांतून उमलणाऱ्या सुभाषितापेक्षां वेगळेंच असणार. पहिल्यांत रस–गंध फार असणार, तर दुसऱ्याचें रंग–रूप आकर्षक असणार. ‘ ज्याचें मन नाहीं लागलें हातासी । तेणें प्रपंचासी सांडूं नये ’ हा तुकारामाच्या मनाचा परिपाक आणि ‘ नवऱ्याला डोकें नसलें कीं बायको डोक्यावर बसते ’ हा गडकऱ्यांचा कोटीबाजपणा यांत फरक आहे. सत्याचा अंश दोहोंतहि आहे. पण पहिल्यांतील गोडवा विश्वाच्या विशालतेंत जीवन विरघळून गेल्यावरचा आहे आणि दुसऱ्यांत नाटकांतील एका विशिष्ट पात्राच्या मनोवृत्तीशीं समरसून लिहिलेलें सौंदर्य आहे.

तेव्हां सुभाषितानें सुधारणा होणें न होणें हें बोलणाऱ्या व्यक्तीच्या व्यक्तित्वावर जितकें अवलंबून आहे तितकेंच तें ऐकणाऱ्याच्या ग्रहणशक्तीवरदेखील अवलंबून आहे. त्याचप्रमाणें सुभाषितांचा परिणाम हा प्रसंग, स्थळ आणि काळपरत्वें बदलत असतो. औचित्य राखून उपयोगांत आणिलेल्या सुभाषिताचा, कालांतरानें कां होईना, परिणाम होतोच. औषध योग्य प्रमाणांत आणि अंतराअंतरानें पोटांत गेल्यावर रोग बरा होणार नाहीं काय ? ● ● ●

## खेळ

आजचें युग खेळाचें आहे. एक काळ असा होता कीं, ‘ तुमचें वय हें आहे केवळ विद्या शिकून असण्याचें ’ हा चरण आचरणांत आणावा लागे. ‘ शाळेसी जातांना मुलांनीं वाटेंत तमाशा पहात राहूं नये ’ ही कविता समजावून घ्यावी लागे. पण आज पुस्तकी विद्येइतकेंच क्रीडानैपुण्याला महत्त्व आहे. क्रिकेटचा खेळ आज पंचवीस–तीस हजार प्रेक्षकांचें मन मुठींत ठेवणारा ठरला आहे. तुमान न सावरतां येणाऱ्या मुलाला देखील क्रिकेटच्या खेळांतील बारीक सारीक खांचाखोचा समजतात. शाळेच्या संमेलनांत एखादा विद्यार्थी

क्रिकेटवर मल्लीनाथी करणाऱ्या तल्यारखानाची नक्कल करतांना पाहिला कीं क्रिकेटची लोकप्रियता कळून येते.

खेळ ही दैनंदिन जीवनांतील आवश्यक बाब आहे. मनोवृत्तींत मोकळेपणा येण्यासाठीं खेळांचा फार उपयोग होतो. मग ते खेळ बैठे असोत अगर क्रीडांगणावरील असोत. पोटासाठीं कुणाला दिवसभर कारखान्यांत राबावें लागतें; कुणाला कचेरींत खर्डेघाशी करावी लागते, कुणी तत्त्वज्ञानासारख्या रुक्ष विषयांत वाचनालयाच्या कोपऱ्यांत डोकें खुपसून बसतो, तर कुणा एखाद्या गृहिणीचा दिवस मुलाबाळांच्या अगर पतिराजांच्या ऊठबशींत निघून जातो. या सर्वांना 'तेंच तें' जीवन विसरण्यासाठीं कसल्यातरी खेळांत मन गुंतविणें आवश्यक आहे. त्यामुळें त्यांच्या शक्तीचा रोज होणारा ऱ्हास भरून निघतो.

कुणी कोणते खेळ खेळावेत हें ज्याच्या त्याच्या आवडीवर अगर त्या व्यक्तीला मिळणाऱ्या रिकामपणाच्या वेळावर आणि प्रकृतिमानावर अवलंबून आहे. पुष्कळशी फुरसत असणाऱ्या माणसाला क्रिकेट्, हॉकी, फुटबॉल, अगर हुतूतूसारखे मैदानी खेळ संध्याकाळच्या वेळीं खेळतां येण्यासारखे आहेत. पण तेंच कारखान्यांत काम करणाऱ्या मजुराला जमणार नाहीं. तो पत्ते, टिचक्या-पाणी (कॅरम) अगर त्यासारख्या दुसऱ्या कोणत्या तरी खेळाची निवड करील. कित्येक वेळां आवड म्हणून सुरू केलेला खेळ जन्माचा व्यासंग होऊन बसतो.

'खेळ' या विषयावर अनेक दृष्टीनें विचार करतां येण्यासारखा आहे. मी या ठिकाणीं विचार करणार आहे तो जीवनाची एक बाजू म्हणून, व्यवसाय म्हणून नव्हे. दिवसेंदिवस रोजचें जीवन इतकें दगदगीचें होऊन बसलें आहे कीं त्याचे क्लेश विसरण्यासाठीं कसल्या तरी खेळाची आवड नसेल तर जीवन असह्य होईल. माठांत ठेवलेलें पाणी छिद्राछिद्रांतून झिरपून माठ ओला झाल्याशिवाय गार होत नाहीं. तसेंच तऱ्हेतऱ्हेचे खेळ खेळल्यामुळें नसानसांतून चैतन्य खेळूं लागतें, जीवनांत जोम येऊं लागतो, आणि अस्मान-भेदी आकांक्षांना मुठींत आणण्यासाठीं झेप घेतां येते. त्यांतल्या त्यांत क्रीडांगणावरील खेळाचा तर दुहेरी परिणाम होतो. शरीर आणि मन हीं दोन्हीहि त्यामुळें झुंझार बनतात. उत्तम खेळाडू हा जीवनाकडे ज्या वृत्तीनें पाहील त्या वृत्तीनें एखादा एकमार्गी मनुष्य पाहूं शकणार नाहीं. मनमोकळेपणा, संयम, हातीं घेतलेल्या कार्याबद्दल आत्मविश्वास, चिकाटी, सहनशीलता, परधर्मसहिष्णुता इत्यादि गुणांचा उद्भव खेळाडू वृत्तीच्या पोटीं होत असतो. ● ● ●

# अविस्मरणीय प्रसंग

आपलें जीवन हें अनेक सुख-दुःखांच्या प्रसंगांनीं व्यापलेलें असलें; परंतु त्यांतील सारेच प्रसंग कांहीं आपल्या स्मरणांत रहात नाहींत. ज्या प्रसंगांनीं आपलें अंतःकरण हेलावलें, पापण्या भारावल्या आणि जीवनांत कालांतरानें बदल घडून आला, तेच प्रसंग मनांत कायमचें घर करून बसतात. कोणत्याहि तऱ्हेच्या संकटांशीं झगडतांना त्या प्रसंगांतील सुखद किंवा दुःखद स्मृती आपल्या सहाय्यासाठीं जिवलगाप्रमाणें धांवून येतात. असे अविस्मरणीय प्रसंग प्रत्येकाच्या आयुष्यांत येतात.

लहानपणीं घरच्या गरीबीमुळें एखाद्या माधुकरी मागणाऱ्या मुलाचें दुःख त्याला त्याच्या उत्तर आयुष्यांत हुद्याची जागा मिळाल्यावर अविस्मरणीय वाटेल. वडिलांच्या वैतागामुळें घराबाहेर पडलेला मुलगा पुढें जर कोणी सिद्धार्थ झाला तर तो, तो प्रसंग विसरणार नाहीं. शाळेच्या जगांत इतर मुलांच्या संगतीनें विडीचें थोटुक चोरून पिणारा मुलगा पुढें पुढारी झाला तर त्याला बालपणींच्या त्या प्रसंगांची आठवण राहील. स्वातंत्र्य-युद्धांत तुरुंगवास भोगणाऱ्या बालवीराला पुढें जयप्रकाश होण्याचा मान मिळाला तर तो आपल्या व्याख्यानांतून त्या अविस्मरणीय प्रसंगाचा उल्लेख केल्यावांचून राहणार नाहीं. गांवापासून दूर असलेल्या इंग्रजी शाळेंत शिकावयास जातांना आईच्या आसवांनीं भरलेला उपदेश, तो मुलगा जर उद्यां ' चिंतामणि ' झाला तर त्याला तीं आंसवें गंगा-जलाप्रमाणें वाटतील. वर्गांत एखादे वेळीं मास्तरांनीं दगड म्हणून उल्लेख केलेला मुलगा जर वर्तमानपत्रांतून गाजूं लागला तर तो तें विसरणार नाहीं. असे प्रसंग कीं ज्या ज्या वेळीं सुखद प्रसंगांनीं मन मोहरून जातें आणि दुःखद प्रसंगीं तो मोहोर गळून पडतो, ते प्रसंग विसरायचें म्हटलें तरी विसरतां येत नाहींत. समुद्रांत धोक्याच्या जागा दर्शविण्यासाठीं जीं पिंपें ठेवलेलीं असतात तसें ते प्रसंग मनांत हेलावत असतात.

किती तरी वर्षें माझें जीवन वाऱ्यावर भरकटणाऱ्या वावडीप्रमाणें होतें. त्याला कोणीहि सूत्रधार नव्हता. माझा धडधाकट देह पाहून अनेकांनीं मीं पोलीस खात्यांत शिरावें अशी इच्छा प्रदर्शित केली. त्या वेळीं तरी पोलीसखातें म्हणजे थोड्या वेळांत गडगंज संपत्ति मिळविण्याचें एक साधन समजलें जाई. तेव्हां

साहजिकच माझ्या घरांतील वडिलधाऱ्या मंडळींना मीं त्या खात्यांत शिरावं असें वाटे. माझ्या मात्र मनांतून तें नव्हतें. माझी प्रकृति पोलिसाची असली तरी मन कलावंताचें होतें. किती तरी दिवस माझ्या दोन मनांचा झगडा चालू होता. पण राजवाड्याच्या सांदिकोनांत रहाणाऱ्या चिमण्यांची तडफड हमरस्त्यावर कशी ऐकूं जाणार? माझ्या भावनाशील मनावर बारीकसारीक गोष्टींचा परिणाम होई. असें मन पोलीस-खात्यांत कसें रमावें? म्हणून मी एकीकडे जरी प्रकृति कमावीत होतों, तरी दुसरीकडे माझें मन जाग्यावर नव्हतें. अशा तळमळींतून माझ्या आजच्या मनोवृत्तीचा जन्म झाला. त्या वेळीं मी पोलिस खात्याच्या परीक्षेंत अपयशी ठरलों नसतों तर माझ्या आजच्या यशोधनाला मी दुरावलों असतों. अजूनहि मुंबईंतील रस्त्यावरून एखादा पोलिस अधिकारी आपली संगिनीसारखी नजर फेकतांना पाहिला कीं माझें मन दुभंगून जातें.

दुसरा एक प्रसंग अजूनहि मला समाधान देतो. माझे वडिल अत्यंत रागीट आहेत. रागाच्या भरांत तें काय हवें तें बोलतात. वयाच्या सतरा-अठराव्या वर्षी असाच मी त्यांच्या तडाख्यांत सांपडलों. वातावरण तापलेलें पाहून मीं गांवाबाहेरील आंबराईचा रस्ता धरला. दीड दिवस उपाशी पोटीं एका दगडावर बसून होतों. वडिलांचा राग गेल्यावर मी घरीं परतलों. मला परत आलेला पाहून वडिलांना हर्ष झाला. परंतु ते मजजवळ बोलले नाहींत. रागीट माणसांना रागाचा भर ओसरतांच केल्या कृतीचा पश्चात्ताप होतो. त्यांना आपण घेतलेल्या बळीसमोर उभें रहायला संकोच वाटतो. रागाचा पारा चढल्यावर दहा अंक मोजावे असें अनुभवी माणसें म्हणतात. त्याचा अर्थ एवढाच कीं त्यांनीं रागावर ताबा ठेवण्यास शिकावें. त्या प्रसंगानें मला संयम शिकविला. वडिलांची 'शाप'वाणी त्यावेळीं संयमानें सहन केली म्हणून आज मला कवितेनें 'वरदान' दिलेलें आहे. तेव्हांपासून आज वीस वर्षे जीवनांतील अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत माझ्या मनाची धीरोदात्त वृत्ति ढळली नाहीं.

गत जीवनांतील अविस्मरणीय प्रसंग हे पुढील जीवनास असे हितकारक ठरतात.

# माझे गुणदोष

माझ्याविषयीं मींच बोलावयाचें म्हणजे मोठें कठीण काम आहे. कारण गुणांची बेरीज करीत बसलों तर मी अहंकारी ठरेन आणि दोषच सांगत बसलों तर जग म्हणेल 'रडूं बाई रडूं' आहे. परंतु लोक काय? वर पहाणाराला उद्धट म्हणतात, खालीं पहाणाराला बावळट म्हणतात, आणि समोर पहातांना दुसरी-कडे कुठें नजर गेली तर ह. भ. प. (हळूंच भलतीकडे पहाण्यांत पटाईत) म्हणतात. मग पहायचें तरी कुठें? मी अहंकारी नाहीं तसा विनयशीलहि नाहीं. माझ्यांतील गुण–दोषांची मला जाणिव आहे. एकान्तांत मी त्यांचेंच पृथक्करण आणि संकलन करीत असतों. तेंच मी तुम्हांला मोकळेपणानें सांगणार आहें.

मानवी जीवन हा एक व्यवहारी अपूर्णांक आहे. अंशापेक्षां त्याच्यांत छेदच जास्त असल्यामुळें त्यांचा भागाकार एकापेक्षां नेहमींच कमी येतो.

'पूर्णापासुनि ढळलेलें जग जातें पूर्णाकडे' असें कवि 'बी'नीं म्हटलें आहे. पतित मनाची नेहमी पावन होण्याची धडपड चालू असते. पृथ्वीवरील माती आणि स्वर्गांतील सौगंध यांच्या मिश्रणांतून तो कस्तुरी निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. पण बहुतेक जणांचा तो प्रयत्न सफल होत नाहीं.

माझा पहिला दोष म्हणजे अत्यंत भावनाशील (Sensitive) वृत्ति. वाङ्मयीन जीवन उजळणारी ही वृत्ति व्यवहारांत मला पदोपदीं जाळीत असते. स्वतःभोंवती उगाच काळजीचें धागे गुंफून त्यांत गुंतून राहण्याची माझ्या मनाला संवय जडलेली आहे. त्यांत माझ्या आयुष्याचीं वर्षेंच्या वर्षें वाया गेलीं ह्याची मला खत वाटते. काळजी करावी, उदासीन असावें; पण त्या उदासीनतेनें विश्वाचा संसार सुखी व्हावयास हवा. मनाच्या कोनांत बांधलेल्या जाळ्यांत बसणाऱ्या कोळ्याला सूर्याचे किरण दिसत नाहींत.

माझ्यांतील दुसरा दोष म्हणजे आळशीपणा. संकल्पाकडे जाणारी सिद्धि आळशीपणामुळें नेहमींच मागें राहिली आहे. सशाच्या वेगानें घटकाभर पळायचें आणि मग आळसाच्या अंगाखांद्यावर लाडावून झोपी जायचें, ह्या संवयीमुळें कासवाच्या गतीनें मागाहून येणारी माणसें माझ्या पुढें गेलेलीं आहेत. माझ्यां-तील आळसानें उद्यांवर ढकललेलीं कित्येक कामें पाहिलीं म्हणजे मन म्हणतें,

' अरे वेड्या ! हा डोंगर उल्लंघून त्यापलीकडे असलेल्या मुक्तीच्या मंदिरांत तुला जायचें आहे ना ? ' तरीहि माझा आळस कांहीं कमी नाहीं. तो म्हणतो, ' पंगुम् लंघयते गिरिम्.'

माझ्यांतील तिसरा दोष म्हणजे एखाद्यानें ठरलेल्या वेळीं येतो म्हणून सांगितलें कीं त्या आधीं कितीतरी वेळ त्याची वाट पहात बसणें. जीवनांत प्रेमापेक्षां युद्धाचेच क्षण जास्त येतात. प्रेमासाठीं बधिर झालेली व्यक्ति ठरलेल्या वेळेपेक्षां संकेतस्थळीं कितीतरी अगोदर येऊन बसते. परंतु सामान्य प्रसंगीं ती बहुधा दिलेलीं वचनें पाळीत नाहीं. अशांतहि मी काळाचा अपव्यय केला आहे. प्रिय माणसाच्या क्षणाक्षणाच्या प्रतीक्षेत कंठ कोरडा पडणें, डोळे आसावणें, खोलींतल्या खोलींत कां होईना, पण फेऱ्या घालून पाय थकणें साहजिकच आहे. त्या माणसाबद्दल उत्कंठा लागून राहणें साहजिकच आहे. पण तिलाहि मर्यादा हवी. मला तर कधींकधीं कंठांतून प्राण बाहेर येऊन बसतो कीं काय अशी भीति वाटते.

हे जसे माझे दोष मीं सांगितले तशीच माझ्यांतील गुणांचीहि मला जाणीव आहे. कुणालाहि दिलेल्या वचनाला आणि वेळेला जागणें हें मी माझें पहिलें कर्तव्य समजतों. दुसऱ्याचें काम हें माझेंच काम आहे असें मी बालपणापासून मानतों. रामदास म्हणतात ' जाणावें परांचें अंतर '. त्याप्रमाणें संबंध आलेल्या व्यक्तीच्या अंतरंगांत त्यांच्या डोळ्यांच्या खिडक्यांतून चोर पावलानें उतरून मी तिच्या भावना चाचपून पाहत असतों. दुसऱ्यांचीं मनें मखमाली शब्दानें महिर करून त्यांच्याकडून हवें तें काम करून घेण्याची कला मला चांगली अवगत आहे. तसेंच माझ्यांतील आळसाचा मी कितीतरी वेळ उपयोग करून घेतों. आळस हा सांगकाम्या आहे. सांगितल्यापलीकडचीं कामें तो चुकूनहि करीत नाहीं. मनाचा एकदां निश्चय ठरला कीं ह्या आळशाला मी इतकी दूरवरची कामगिरी सांगतों कीं त्याच्या गैरहजेरींत मी यंत्रासारखें काम करतों. तें कार्य पाहून एखादा आश्चर्यानें विचारतो, ' कां हो ! हें तुम्हीं करतां तरी कधीं आणि कसें ? '

असे माझे कांहीं गुण–दोष आहेत. सर्वच गुण–दोष मला सांगतां येणार नाहींत. ते सांगण्याची माझी तयारीहि नाहीं. जगांत झांकल्या मुठीनें वावरावें लागतें. नाहीं तर लाखानें मोजलें गेलेलें राखेनें मापलें जायचें. आधींच मीं

सांगितलें कीं माणसाचें जीवन हा व्यवहारी अपूर्णांक आहे. अंकगणितांत कच्चा असलेल्या विद्यार्थ्यानें परीक्षेंत पहिलेंच उदाहरण व्यवहारी अपूर्णांकाचें सोडवावयास घ्यावें आणि आंकडे वाढतां वाढतां घंटा व्हावी, तसें माझें होणार आहे असें मला वाटतें. माझ्या अंशस्थानीं असणारे गुण छेदस्थानीं असलेल्या दोषांपेक्षां इतके कमी आहेत कीं माझ्या गणिताचें उत्तर कधीं एक येईलसें मला दिसत नाहीं. तरी पण माझा प्रयत्न मी चालूच ठेवणार आहे. ● ● ●

## ग्रामोद्धार

'तरुणांनो, खेड्यांत चला.' या महात्माजींच्या आदेशाला आज किंमत आलेली आहे. अजूनपर्यंत पांढरपेशा म्हणजे सुशिक्षित वर्ग खेड्यांतून शहराकडे येत होता. त्यामुळें शहरांची संख्या लाखांनीं वाढत गेली. माणसांच्या बिऱ्हाडाला खुराड्याचें स्वरूप आलें. मागणीपेक्षां काम करणाऱ्यांची गर्दी होऊं लागली. आणि पैसे मिळविण्यासाठीं शहरांत आलेली माणसें अर्धपोटीं, प्रसंगीं उपाशीहि राहूं लागलीं. एकीकडे ही स्थिति असतांना ज्या खेड्यांतून शहरांतल्या कारखान्याला कच्चा माल पुरवला जात होता तीं खेडीं ओस पडूं लागलीं. तेथील तरुण वर्ग बाहेर गेल्यामुळें आजोबांची आणि नातवांची अशा दोन पिढ्या, कीं ज्या कष्टाच्या कामासाठीं निरुपयोगी आहेत त्या, उरल्या.

परंतु गेल्या पांचसहा वर्षांत, आपण स्वतंत्र झाल्यापासून, ही दृष्टि बदलली आहे. सर्वोदयाशिवाय राष्ट्राचा विकास नाहीं हें लक्षांत आलें आहे. हिंदुस्थान हा ९५ टक्के शेतीवर जगणारा देश आहे. राष्ट्राला धनधान्य कपडा-लत्ता पुरवण्याचें कार्य खेड्यांतील शेतांत राबणारे शेतकरी करीत असतात. कुठें तरी वाचल्याचें मला स्मरते, कीं भारतांतील खरा महात्मा शेतकऱ्यांत आहे. खरें आहे तें. मन विशाल असल्याशिवाय जमिनीच्या लहानशा तुकड्यांत तो प्राण ओतून काम करणार नाहीं. महान आत्मा ज्याचा आहे तो महात्मा. हा अर्थ घेतला तर शहरांपेक्षां खेड्यांतच अशा महात्म्यांचे दर्शन होतें. वाचनालयाच्या कोपऱ्यांत तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांची पारायणें करणाऱ्या विद्वानापेक्षां हजारों मेंढरांचा कळप आपल्या गांवठी भाषेनें एकत्र आणणाऱ्या धनगराच्या ओठांतील तत्त्वज्ञान श्रेष्ठ ठरतें. कलाबुतींनीं मढविलेल्या व्यासपीठावरील शंभर व्याख्यानांपेक्षां श्रमाच्या मालानें फुलवलेलें शेत राष्ट्राला अधिक पोषक आहे.

आज शाळा कॉलेजांतील विद्यार्थी–विद्यार्थिनीं, मंत्री-उपमंत्री फुरसतीच्या वेळांतील हरएक घडी ग्रामोद्धारासाठीं वेंचीत आहेत. खेडुतांना हें असें कसें झालें याचें नवल वाटतें ! परंतु भारताचें भवितव्य समतेंतून ममता निर्माण करण्यांत आहे; जंगलामध्येंहि मंगल पहाण्यांत आहे, श्रमांतून श्रेय शोधण्यांत आहे, ही आपली आतां ठाम समजूत झाली. स्वातंत्र्य मिळालें तें असें फक्त मूठभर सुशिक्षितांना समजलें; परंतु खेड्यांतील झोपड्यांतून त्याचें वारें वहात नव्हतें. तेथील दलित दुबळे होते तसेच होते. आतां त्यांना समजलें कीं आपली गुलामगिरी जात चालली आहे. आपल्याला हव्या असलेल्या सर्व सुखसोयी ही आपलीच परंतु आपल्यांतून दूर गेलेली मंडळी पहात आहेत. आणि मनुष्य जेव्हां आपसांतील मतभेद बाजूला ठेवतो तेव्हांच त्याचें मन मांगल्यानें प्रेरित होतें, उत्कर्षाप्रत जातें.

अजूनपर्यंत झालेल्या समाज–विकास–योजनेच्या कार्यावरून असें म्हणतां येईल कीं खेडीं आणि शहरें यांच्यामधील जो तुटकपणा होता, पेशाचें आणि पैशाचें जें अंतर होतें, भाषेचा आणि भावनेचा जो दुरावा होता, तो जात चालला आहे. या ग्रामोद्धाराद्वारां खेड्यांतून विद्यालयें स्थापलीं जातील. तेथें वेगवेगळ्या धंद्यांचें शिक्षण दिलें जाईल. रोजच्या भासणाऱ्या अडचणी दूर केल्या जातील. अशा रीतीनें शेंकडों वर्षांची मनावरील गुलामगिरी नाहींशी होईल. खेड्यांतील प्रत्येक जीव आपल्या शेतांत घाम गाळील. आपल्या घरांत सुखासमाधानानें वागेल. तुकोबांनीं म्हटल्याप्रमाणें

जे का रंजले गांजले त्यांसि म्हणे जो आपुले !
तोचि साधु ओळखावा, देव तेथेंचि जाणावा ॥

आज मनांतील देव जागा झाला आहे. त्याला साधुत्वाची ओळख पटली आहे. जरा पुढें जाऊन केशवसुतांप्रमाणें असेंहि म्हणतां येईल,

'देव दानवां नरें निर्मिलें हें मत लोकां कळवूं द्या'

भारतांतील उद्यांचा मानव या दर्जाला पोहोंचेल. ● ● ●

## तुझ्या किनाऱ्यावर

जवळच्या वस्तूंतील सौंदर्य कालांतरानें कमी होतें असें म्हणतात. पण सागरा ! तुझ्या किनाऱ्यावर घटकाच्या घटका मीं चिंतनांत घालविल्या आहेत, तरी पण

तुझ्याविषयींची माझी ओढ कमी झालेली नाहीं. मला तुझ्याशिवाय दुसरें शांतिस्थान नाहीं. पहांटेच्या प्रहरीं झोप येईनाशी झाली कीं मी तुझ्याकडे येतों. माझ्या निशास्वप्नांचें निर्माल्य तूं हांसत खेळत उराशीं कवटाळतोस. खऱ्या मित्राची कसोटी हीच होय. चहा–चिवडा–चिरूटाच्या समाचारासाठीं जमणारी मंडळी पायलीची पासरीभर मिळतील. पण कोणत्याहि प्रहरीं माझ्या पापण्यांत लपलेल्या अश्रूंना मोत्याच्या मोलानें मापणारा तुझ्यासारखा सखा पाहिला कीं तुझ्या ‘ रत्नाकर ’ ह्या नांवाची सार्थकता मला पटते.

सकाळच्या वेळीं तुझ्या किनाऱ्यावर मी येतों तेव्हां तो निर्जन असतो. कुठें एखादी नांगर टाकलेली होडी लाटांशीं गुजगोष्टी करीत असते. चारदोन कोळ्यांचीं पोरें जाळें वाळवीत बसलेलीं असतात. कांहीं बदकें लाटांवर डौलानें हेलकावत असतात. आदल्या रात्रीं पुरी–पकोडीवाल्याकडे आणि भेळ–गंडेरी-वाल्यांकडे खाल्लेल्या पदार्थांचें अवशेष वाळूंत पडलेले असतात. लो. टिळक आणि विठ्ठलभाई पटेल यांच्या पुतळ्यांच्या पायाशीं लोटांगण घालणाऱ्या तुझ्या लाटा पाहिल्या कीं तुलाहि विभूति पूजाच मान्य असावी असें वाटतें. पण तसें म्हणावें तर तुझ्या किनाऱ्यावर आलेल्या साऱ्यांचेच पाय तूं आपल्या जलानें धुतोस. सकाळच्या वेळीं मला आनंद होतो तो कुरल्यांनीं आपल्या पायांनीं काढलेल्या चित्रविचित्र रांगोळ्या पाहून. वाटतें कीं, ‘ तुझी राणी निळावंति हिनें तुला पाठविलेल्या प्रेम–पत्रांतील तो मजकूर असावा, पण हजारों नौकांना आपल्या लहरींवर खेळविणारा तूं...तुला काय तिच्या भावनांची पर्वा ? रोज ती बिचारी आपलें भाव व्यक्त करते नि रोज तूं तें पुसून टाकतोस.

कधीं मीं दुपारच्या घटकाहि तुझ्या सान्निध्यांत घालविल्या आहेत. माथ्या-वरच्या उन्हाची तिरीप असह्य झाली कीं मी छत्री डोक्यावर धरतो. वाळूंतील कणन् कण सूर्याच्या तापानें उफाळून निघालेला असतो. लाटांवर चांदीचा रस ओतल्यासारखा वाटतो. आजुबाजूंच्या हवेल्यांतहि सामसूम असतें. दूरच्या क्षितिजांतून कांहीं गलबतें जवळजवळ येत असतांना दिसतात. अशा वेळचें तुझें रूप मला तपस्व्यासारखें वाटतें.

सूर्य मावळतीकडे कलला कीं थकलेल्या जगाचीं पाउलें तुझ्याकडे वळतात. कारखान्यांत काम करणारे मजूर, कचेरींतील कारकून, शाळा–कॉलेजांतील

विद्यार्थी, आणि गृह-कार्यांतून घटकाभर मुक्त झालेल्या स्त्रिया यांची वर्दळ सुरू होते. अशांतच पोटभरू आपला कार्यभाग साधून घेतात. त्यांत अस्वलाला नाचविणारा दरवेशी, माकडाला माणसासारखा खेळविणारा गारुडी, पाणीवाला, कुल्पी-मलाईवाला, पतंग विकणारा अशा लोकांची गर्दी असते. पण बहुरूपी आणि नवरंगी लोकांत वावरणें मला आवडत नाहीं. त्यामुळें संध्याकाळीं मी तुझ्या किनाऱ्यावर क्वचितच येतो.

मला एकान्त आवडतो. त्यांतून चढता अंधार असला कीं माझ्या विचारांना गति मिळते. म्हणून मी फिरावयास निघतो तो आठ-साडेआठच्या पुढें. डोळ्या-पुढें नक्षत्रांचा मेळावा आणि कानांवर तुझ्या लाटांचा धीरगंभीर ध्वनि, यांच्या तंद्रींत क्षणाक्षणाला मी बाह्य जगाला विसरतो. मी माझाच उरतों. त्या समाधिस्त अवस्थेंतील कितीतरी सुंदर सुंदर विचारांनीं माझ्या जीवनाचें मोल आणि मनाचें समाधान शतगुणित केलेलें आहे.

हें तुझें वेड पाहून कुणी मला जगावेगळा म्हणेल. म्हणे ना का ! पण

‘ तुझ्या तरंगांपरी तरंगत मानस खालीं-वर
स्वप्नांच्या मालिका गुंफिल्या रेलुनि वाळूवर ’

आणि तीं स्वप्नें परिस्थितीच्या तापानें करपून गेलीं तेव्हां त्यांचें निर्माल्य तूंच हृदयाशीं कवटाळलेस. त्यामुळें

‘ जाणितोस परि तूंच सागरा हें माझें अंतर
आणि अवेळीं येइ कशा मी तुझ्या किनाऱ्यावर ? ’

असें असतांना इतरांच्या संगतीची मला जरुरीच काय ? ● ● ●

## हस्तलिखित नियतकालिकें

आजच्या विद्यार्थीवर्गांत वाचनाची जेवढी हौस आहे, तेवढी गेल्या पिढीं-तील विद्यार्थ्यीवर्गांत नव्हती, हें खास. त्याला इतर अनेक कारणें असू शकतील, पण मुख्य कारण हें कीं गेल्या वीसपंचवीस वर्षांत. विविध लेखन करणारे अनेक लेखक आजच्या विद्यार्थ्यांच्या डोळ्यांपुढें आहेत, सभा-संमेलनांतून त्यांचीं व्याख्यानें आणि काव्यगायनें त्यांना ऐकावयास मिळतात. त्यामुळें प्रतिभेच्या

विविध पैलूंचें त्याना दर्शन घडतें. जुन्या पिढींतील सावरकर, जावडेकर आणि माटे, त्यापुढें अत्रे, फडके, खांडेकर, माडखोलकर आणि गुरुजी, आजच्या पिढींतील गाडगीळ, गोखले, भावे आणि माडगुळकर बंधु, तसेंच केशवसुतांपासून पाडगांवकरांपर्यंतचे सारे कवी वाङ्मयरूपानें त्यांना पहावयास मिळतात. त्याचप्रमाणें गाडगीळ, महाजनी, पाध्ये आणि नवरे यांच्यासारख्या पत्रकारांचें पौष्टिक लिखाण त्यांना प्रत्यहीं वाचावयास मिळत आहे. मला तर वाटतें, कीं त्या दृष्टीनें आजचा विद्यार्थी भाग्यवान होय.

गेल्या एका तपांत मीं जवळजवळ शें-सव्वाशें हस्त-लिखितें पाहिलीं आहेत. त्यांतील कांहीं माझ्या विद्यार्थ्यांची होतीं, तर कांहीं बाहेरच्या हौशी वाङ्मय सेवकांचीं होतीं. त्यांना मार्गदर्शन करतांना, त्यांत लेख लिहितांना अगर अभिप्रायासाठीं त्यांचें वाचन करतांना एक गोष्ट माझ्या ठळकपणें नजरेंत भरली ती ही कीं आजच्या विद्यार्थ्यांत कल्पकता भरपूर आहे. ह्या नियतकालिकांची सजावट पाहिली कीं, त्यांच्या सौंदर्यदृष्टीचीहि कल्पना येते. त्यांतील लेखकवर्गाकडे एका विशिष्ट प्रवृत्तीनेंच पहावें लागतें. जीवनांतील श्रेयाचें त्यांना या वयांत दर्शन घडावयाचें असतें; आवडीचा छंद निर्माण व्हावयाचा असतो. अनुकरणानें ती पुढाऱ्यांच्या पावलावर पाउलें टाकीत असतात. हें लक्षांत घेतलें म्हणजे त्यांचे कौतुकच करावेंसें वाटतें. ‘ तरंग ’ ‘इन्दुकला’ ‘उन्मेष’ ‘विशाखा’ ‘ तारांगण ’, ‘ दुर्वांकुर ’ ‘निळावंति’ इत्यादि नांवांवरून या नियतकालिकांच्या बालसंपादकांचें भाव-दर्शन घडतें.

हीं हस्त-लिखितें पाहिलीं कीं मला घरट्याभंवतीं भिरभिरणाऱ्या पक्ष्यांच्या पिलांची आठवण येते. निळया नभाची मुलुखगिरी करून आलेले पक्षी घरट्यांतील ऊब घेत असतात आणि त्यांचीं पिलें वेळअवेळ न पाहतां कुठल्यातरी फांदीभंवती फडफडत असतात, उन्हातान्हांत तडफडत असतात. त्यांच्या डोळयांत निळें जग रंगत असतें, आणि अंवतीभंवती पांचूचें हिरवें जग असतें. एका जगांतून दुसऱ्या जगांत जाण्याची ही सुप्त इच्छाच त्यांच्या पखाना उडण्याची शक्ति देते. त्यांतील गरुडाला कळतें कीं उद्यां आपल्याला स्वर्गाच्या दारीं जाऊन मृत्यूच्या मांडीवर पडलेल्यांना अमृत आणावयाचें आहे. चंडोलाला जाणिव असते कीं सूर्याच्या चढत्या किरणांत विलीन होऊन जगाला आपल्याला स्वर-वलयांनीं बद्ध करावयाचें आहे. अशीच या नियतकालिकांतील

लेखकांची वृत्ति असते. कधीं काळीं केलेल्या प्रवासाचें ते आठवून आठवून वर्णन करतील, छंदो-रचनेची माहिती नसतांना, भावनेचा ओलावा नसतांना ते 'पांखरा ! येशिल का परतून ?' सारख्या कवितेच्या चालीवर रचना करतील; विठ्ठलराव घाट्यांच्या 'एका कारकुनाच्या' वळणाचें एखादें शब्द-चित्र रेखाटतील, अगर जुन्या-नव्या कथाकारांच्या कथेंतलि उतारे घेऊन एखादी अकल्पित कथा लिहितील. कांहींहि असलें तरी माझ्या दृष्टीला त्यांचें कल्पनासौंदर्य दिसतें. अनुकरण काय ? प्रथम प्रथम अनेकांचें कळत न कळत अनुकरण होत असतें. प्रभावी व्यक्तींचा पगडा हा संस्कारक्षम बाल-मनांवर चटकन् बसतो. पण आज पांगुळगाडयाला धरून चालणारें मूल उद्यां विमानांत बसून जगाची सफर करायला निघालें कीं तो गाडा तें घरींच ठेवतें. तसेंच अनुकरणाचें आहे. विशाल विश्वांतील अनुभव मनांत वितळूं लागले कीं अनुकरणाचें पृथ्वीवरील पाय आपोआप सुटतात. काल हस्त-लिखित नियतकालिकांतून लिहिणारी परंतु आज छापील वाङ्मयीन जगांत वावरत असलेली अनेक लेखक-मंडळी माझ्या दृष्टीसमोर आहेत म्हणूनच मी असें म्हणतों.

● ● ●

## वाङ्मय आणि जीवन

Who touches the book, touches the man,

*Walt Whitman.*

एखाद्या लेखकाची कलाकृति ही त्याच्या मनाची प्रतिकृति होय. त्याच्या अंतःकरणाचें तींत दर्शन घडतें. वाङ्मय म्हणजे भावनांचा शब्दरूप आविष्कार होय. भावना ही मुकी असते. भाषेचा स्पर्श झाल्याशिवाय तिला बोलतां येत नाहीं. जीवनांतील प्रसंगांचें वर्णन शब्दरूपानें भाषेंत उतरतें तेव्हां त्याला वाङ्मयाचें स्वरूप येतें.

या ठिकाणीं आपणांस वाङ्मय म्हणजे केवळ ललित वाङ्मयाचाच विचार करावयाचा आहे. तेव्हां आपल्या विषयाच्या कक्षेंतून इतिहास, भूगोल आणि शास्त्रें हीं वगळलीं जातात. साहित्य ही अनेक कलांपैकीं एक कला आहे. कलेचा

आत्मा अनुभूति हा आहे. अनुभवावांचून कला म्हणजे प्राणावांचून कुडी होय. तेव्हां ललित कलाकृतींत अनुभूतींचा संचार असल्याशिवाय तींत जिवंतपणा येणार नाहीं. कोणतीहि कलाकृति असो, तींत लेखकाचें व्यक्तिमत्व कुठेंतरी उमटलेलें असतें.

वाङ्मय आणि जीवन हें परस्परावलंबी आहे. रोजच्या जीवनांतील कांहीं सुख-दुःखें अविस्मरणीय असतात. तीं आपल्याला बेचैन करतात. मग मनावर झालेले आघात बोलके होतात. अशा तीव्र भावनांचे जे उन्मेष बाहेर येतात त्यांतच वाचक रंगून जातो. कालिदासाचें 'शाकुंतल' वाचून जर्मन कवि गटे नाचला, याचें कारण काय ? याचें कारण त्यांतून रोजच्या जीवनांतील डोकावणारी प्रचीति. 'शाकुंतल'मधील प्रसंग वाचीत असतां ते आपल्याच जीवनांत घडत आहेत कीं काय असें वाटतें, आणि एक प्रकारचा अननुभूत आनंद होतो. उत्कृष्ट वाङ्मयाच्या वाचनानें मनाला होणाऱ्या आनंदाची तुलना दुसऱ्या कोणत्याहि कारणानें झालेल्या आनंदाशीं करतां येणार नाहीं. त्यांत 'पुनः प्रत्यय' असतो. व्यवहारांत फिरून न मिळणारें अनुभव–सौख्य वाङ्मयांत आपण अनुभवूं शकतो. एखादी कलाकृति–मग ती सुखांत असो अगर दुःखांत असो–ती पहातांना अगर वाचतांना त्या त्या पात्राशीं आपण समरस होऊन कथानकाबरोबर वहात जातो; पुढें काय होणार याची आपणाला उत्कंठा लागून रहाते.

जीवनांत आपल्या वांट्याला मोहरीएवढें सुख आणि मेरूएवढें दुःख येत असतें. स्वतः गिरण काढण्याची इच्छा करणाराला जन्मभर गेटकीपर रहावें लागतें. सेनापतीचें पद मिळविण्याची आकांक्षा धरणाऱ्याला दुर्दैवानें आपलें आयुष्य साध्या सैनिकाची हडेलहप्पी करण्यांत खर्च करावें लागतें. व्यासपीठावरून लाखों लोकांचीं मनें काबीज करूं पहाणाऱ्या वक्त्याला श्रोत्यांचे आभार मानण्यावरच खूष व्हावें लागतें. दवाची वागणूक अशी ही विपरीत असल्यानें माणसाला कधीं कधीं जीवन असह्य होतें. कल्पनेंतल्या गोष्टी सत्यसृष्टींत घडाव्यात म्हणून तो आशाळभूतपणें आकाशाकडे डोळे लावून बसतो. कोपऱ्यांतील कोळ्याच्या जाळ्याची गुंतागुंत त्याच मन अधिकच गुंतवितें. अशा प्रसंगीं वाङ्मय हें त्याला लाखाच्या मोलाचें वाटतें. आपल्याला जे होता आलें नाहीं तें यांतील नायक नायिकांना होतां आलें आहे, तें कसें शक्य झालें ? तीं माणसें कोणत्या संकटांतून

गेलीं ! हें वाचतांना वाचक स्वतःला त्या ठिकाणीं ठेवून पहातो. म्हणून त्या अवस्थेंतील घटका त्याला स्वर्गीय वाटतात.

वाङ्मयांत मानवी गुणांची जोपासना करणारे इतरहि कांहीं गुण असतात. उदा० रामायणांत पिता–पुत्राच्या, पति–पत्नीच्या, बंधु–बंधूच्या, उदात्त नात्यांचे इतके सुंदर प्रसंग वर्णिले आहेत कीं त्याच्या वाचनानें कोणत्याहि व्यक्तीच्या जीवनांत 'राम' यावा. या सर्व दृष्टीनें विचार केला तर असें म्हणतां येईल कीं वाङ्मयांत जीवनांतील विशेष गोष्टींचा अंतर्भाव होतो आणि वाङ्मयाच्या वाचनानें जीवन समृद्ध होतें, अनुभूति विशाल होते, मन प्रगल्भ होतें. ● ● ●

## आजचा विद्यार्थी

विद्यार्थ्यांच्या प्रवृत्तीबद्दल आज चोहींकडे चांगलें वाईट बोललें जात आहे, लिहिलें जात आहे. एकीकडे समाजविकास–योजनेच्या राष्ट्रीय हितासाठीं आजचा विद्यार्थी किसान कामगारांप्रमाणें पाट–बंधारे बांधीत आहे, रस्ते तयार करीत आहे. ह्या त्यांच्या हौशीचें कौतुक मंत्र्यांपासून मजुरांपर्यंत सर्वजण करीत आहेत; तर दुसरीकडे 'अमुक अमुक ठिकाणच्या विद्यार्थ्यांनीं सभा उधळून लावल्या, दंगामस्ती केली.' अशा तऱ्हेच्या लांछनास्पद बातम्या प्रसिद्ध होत आहेत. पण या दोन्ही प्रवृत्तींचा विचार केला तर अशी अधिक–उणी वागणूक सर्व मानव जातीचीच आहे. मग विद्यार्थ्यांनांच दोष कां द्या ? प्रत्येक ठिकाणीं चांगल्या-बरोबर वाईटहि दिसून येतें. शंभरांत चार–पांच व्यक्ती जरी हीन मनोवृत्तीच्या असल्या तरी कोणत्याहि कार्याचा विचका करावयास त्या कारणभूत होतात.

आजच्या विद्यार्थ्यांचें विशेष लक्षांत घेण्यापूर्वी कालच्या विद्यार्थ्यांचें वैशिष्ट्य कशांत होतें तें पाहूं या ! कालचा विद्यार्थी सुदृढ, एकमार्गी, श्रद्धाळु, ज्ञानपिपासु आणि आज्ञाधारक होता. हे सर्व गुण त्यांच्यांत त्या पिढीचे उतरले. चिपळूणकर, आगरकर, टिळक, लोकहितवादी, शिवरामपंत परांजपे आणि गोखले ह्या त्या वेळच्या आपापल्या कार्यक्षेत्रांत चमकणाऱ्या ग्रह–ताऱ्यांच्या तेजांत तो वाढला होता. शिक्षक हा उद्यांच्या पिढीचा शिल्पकार आहे, हा अनुभव त्या लोका-ग्रणींच्या बाबतींत खरा ठरत होता. तेव्हां कालचा विद्यार्थी हा त्याच्या समोर असलेल्या त्यागी, तेजस्वी आदर्शांतून जन्माला आला होता.

पण आज अर्ध–शतकाच्या कालावधीनंतर त्यांत कितीतरी बदल झाला आहे. भारताच्या राजकीय दृष्टीकोनाचा त्यावर परिणाम झाला आहे. जगाच्या पाठीवर 'शांतिचें साम्राज्य' स्थापूं पाहणाऱ्या भारताला योग्य अशा शिपायाचा त्याचा वेश आणि आवेश आहे.

'ब्राह्मण नाहीं, हिंदुहि नाहीं न मी एक पंथाचा',

अशी त्याची वृत्ति आहे. म्हणजेच त्याच्या कार्याची कक्षा विस्तारली आहे. त्याच्या दृष्टींत आज जगाच्या नकाशावरील रागरंग प्रतिबिंबित झालेले आहेत. त्याच्या मनांत 'मानव तितुका मेळवावा' हा महामंत्र घोळत आहे. प्रकृतीनें तो तितकासा सुदृढ नसला तरी संकटांशीं झुंजावयास लागणारा काटकपणा त्याच्या अंगीं आहे. 'बाबावाक्यं प्रमाणम्' म्हणून कुणीहि दिलेली राख तो विभूति म्हणून कपाळाला लावणार नाहीं. त्याची श्रद्धा सदसद्विवेक बुद्धींतून जन्माला आलेली आहे. भोंवतालच्या परिस्थितीशीं तो समरस झालेला आहे. त्यामुळें प्रत्येकानें चोखाळलेली नवी वाट कुठें जाते हें त्याला माहीत आहे. 'पुस्तकें हे माझे मला न विसरणारे सोबती आहेत. त्यांच्याशीं मी दिवस दिवस जिव्हाभावाच्या गोष्टी करीत असतों.' अशा तऱ्हेची केवळ ज्ञानपिपासु वृत्ति जाऊन, ज्ञानाच्या वेगवेगळया शाखांशीं आणि शास्त्रांशीं त्याचा संबंध आला आहे. 'शाळेसी जातांना मुलांनीं वाटेंत, तमाशा पहात राहूं नये,' अगर 'बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडुं नको,' अशा तऱ्हेच्या नकारात्मक उपदेशांतून तो आज्ञाधारकपणा शिकत नाहीं. तर रस्त्यावर जमलल्या एखाद्या गर्दीच्या ठिकाणीं तो उभा राहील, तमाशा पाहील आणि त्यांतील हवा तो चरण गुणगुणत चालूं लागेल. धोपटमार्गानें डोळे बांधून जाण्यापेक्षां कांटेरी वाटेंतून जाणें त्याला आवडेल.

सारांश, आजचा विद्यार्थी अधिक चौरस, चौकस आणि कल्पक आहे. त्याचा दृष्टिकोन विशाल आहे मतामतांच्या गलबल्याइतकाच मनामनांच्या मांगल्यानें तो भारला जातो. परिस्थितीबद्दल तो जागरूक आहे. परंतु त्याच्यांत श्रद्धेचा अंश असावा तितका नाहीं. तेव्हां कर्तव्याच्या हांकेला ओ देण्यासाठीं उंबरठ्याबाहेर पडतांना त्यानें आपल्या मातापितरांना आणि गुरुमाउलीला नमस्कार करून बाहेर पडायला हवें. पूर्वजांची थोरवी विसरून चालणार नाहीं. ती श्रद्धा जर

त्याला डोळ्यांत सांठवितां आली तर जगाच्या इतिहासांत भारताला मानाचें स्थान मिळवून द्यावयास तो खचित कारणीभूत होईल. ● ● ●

# पहिला पाठ

शाळेंत जाण्याचा तो पहिला प्रसंग अजून माझ्या डोळ्यांसमोर आहे. बाबांनीं हौशीनें आणिलेली, जरीची वेलबुट्टी असलेली ती जांभळी मखमाली टोपी अजूनहि माझ्या पहाण्यांत येते. आईच्या ट्रंकेंत कितीतरी वर्षें ती आज पडून आहे. तिनें, आज नाहीं तरी, त्या वेळीं माझ्या आनंदांत भर घातली होती. तशीच माझ्या कानांतील भिकबाळी......मोठेपणाच्या अभिमानानें आईनें गांवच्या सोनाराकडून ती माझ्या कानांत चढविली होती. तेव्हां जरीची टोपी आणि मोत्यांची भिकबाळी अशा थाटांत 'अस्मादिकांची स्वारी' पहिल्या दिवशीं शाळेंत गेली. त्या वेळीं शाळेंत न जाणाऱ्या मुलाला हेडमास्तर वर्गांतील मुलांना त्याच्या घरीं पाठवून उचलबांगडी करवून आणीत असत. कडकलक्ष्मीच्या अवतारांत वाजत गाजत तो मुलगा शाळेंत येई. बाकीच्या विद्यार्थ्यांत हंसें झाल्यामुळें तो ओशाळे, रडे, ओरडे. माझ्यावर सुदैवानें तसा प्रसंग ओढवला नाहीं. पण त्यालाहि कारण होतें. आमच्या घरचीं आठ–नऊ मुलें ( त्यावेळीं आमच कुटुंब एकत्र होतें, हे सांगावयास हवें ) त्याच वेळीं शाळेत जात असत. तेव्हां त्यांच्या अनुकरणांतून माझी शाळेबद्दलची आवड उत्पन्न झाली होती.

शाळेंत गेलों तो पहिल्याच दिवशीं मास्तरांनीं पाटी भरून 'श्रीगणेशा' काढून दिला, आणि जरा दमांतच सांगितल, 'बैस त्या कोपऱ्यांत घडा गिरवीत!' मला त्याआधीं 'श्रीगणेशा'च काय तीस दाहें तीनशेंपर्यंत वडिलांनीं शिकाविलें होतें. पण वडिलांनीं दिलेल्या धड्यापेक्षां मास्तरांनीं दिलेला तो पाठ मला विशेष वाटला. आमच्या मास्तरांकडे बालवर्ग आणि चौथी असे दोन वर्ग होते. चौथीला एखादें गणित करावयास सांगून तेवढ्या वेळांत मास्तर आम्हांला शिकवीत. आमच्या बालबोध वाचनांत एक कविता होती—

'तांबू तांबू ये घरीं झाली आतां सांज
हंबरतें हें वासरूं याला आधीं पाज'

पायलीभर तांदूळ मावतील इतक्या मोठाल्या कोटाच्या खिशांत हात घालून मास्तर जेव्हां कवितेच्या रंगांत येत तेव्हां त्यांच्याबरोबर मीहि तन्मय होई. चौथी ईयत्तेंतील मुलांना शिकवितांना भिंतीवर चिकटाविलेल्या संतांच्या [ ती कोणत्या संतांचीं वचनें आहेत हें मला अलिकडेच कळून आलें. ] वचनांचा उल्लेख करून शिकवीत. प्रत्येक मुलामुलीला उभें करून, प्रसंगीं कान धरून ते म्हणत, ' म्हण ! –या साऱ्या भुवनीं हितकर विद्येसारखा सखा नाहीं.' हित आणि कर या हित-कर शब्दाच्या चिरफाडीनें होणारा यतिभंग मला कॉलेजमध्यें गेल्यावर कळला आणि आतां तर अनुभवच आला कीं जीवनाला विद्या हितकर नसून करविद्या हीच जीवनाची गुरुकिल्ली आहे.

लोकल् बोर्डाच्या शाळेच्या ढांसळत चाललेल्या इमारतींत गिरविलेल्या पहिल्या पाठांतील वळणांतच माझें आजचें यश लपलेलें होतें. संध्याकाळच्या शेवटच्या तासाच्या सांघिक परवचेनें मला अचूक आंकडे मोजायला शिकविलें. दुसरीच्या बालबोध पुस्तकांतलि बकासुराच्या गोष्टीनें मला मिताहारी बनाविलें. भिंतीवर लाविलेल्या संतांच्या सुभाषितानें मीं अंतर्मुख झालों. त्यावेळच्या शिक्षणक्रमांत आजच्या शिक्षण–शास्त्रज्ञांच्या दृष्टीनें कितीहि उणीवा असल्या तरी मला त्यांत आज माझ्याजवळ असलेल्या अनेक गोष्टींचीं बीजें दिसून येतात. उदा० व्ह. फा. वर्गाला नेमलेलें 'सीतास्वयंवर' आज एस.एस.सी.ला बसणाऱ्या कितीशा विद्यार्थ्यांना कळेल? आणि कळेल त्यांपैकीं कितीसे विद्यार्थी तें हौसेनें पाठ करतील? याचें कारण आवड. बालवयांत हौशीनें शिकलेल्या गोष्टींतील एखादी गोष्ट आमरण आनंद देते. हिमगिरीच्या दऱ्यादऱ्यांतून वाहणारी गंगोत्रीच पुढें मंदाकिनी व्हावयाची असते. आजच्या विद्यार्थ्यांत ती आवड नाहीं. माझ्या जीवनाच्या नकाशाचे रंग आज जेव्हां मी न्याहळितों तेव्हां ते फिक्कट होत चाललेले आहेत हें माझ्या ध्यानांत येते. पण त्यामुळें त्याच्या नागमोडी रेषांचें मला दर्शन होतें. त्या दर्शनानें मनाच्या पाटीवर मी माझे पहिले पाढे पुन्हां एकदां गिरवितों. ● ● ●

## वाचन

आज विद्यार्थीवर्गापासून वृद्धांपर्यंत वाचनाची अभिरुचि वाढलेली आहे; आणि मागणी तसा पुरवठा या न्यायानें त्या वाचकांना हवें तें लिखाण पुरविलें जात आहे. लोकांत वाचनाची हौस वाढत आहे, ही गोष्ट स्तुत्य आहे; पण त्या

रुचीचें स्वरूप डोळ्यांसमोर येतां मनाला खेद होतो. ज्ञानेश्वरीचीं अगर तुकारामाच्या गाथेचीं पारायणें करा, असें मी म्हणत नाहीं. डॉ. केतकर अगर वा. म. जोशी वाचा असाहि मी आग्रह धरणार नाहीं. तसेंच आजच्या लेखकांत फडके खांडेकरच श्रेष्ठ असाहि मीं निर्णय घेऊन ठेविलेला नाहीं. तरी पण मी एवढें म्हणू शकेन कीं, कोणत्याहि काळांतील लेखकांचें वाङ्मय वाचा, पण त्यांतून तुमची मनोरचना तयार झाली पाहिजे. त्या लेखकापासून रचनासौष्ठव, भावना-सौंदर्य अगर कल्पना-विलास यांपैकीं कांहींतरी घेतां आलें पाहिजे. नीतिबोधच कशाला ? वाङ्मय-विशेष नाहीं कां वेंचतां येणार ?

'कलेकरितां कला' कीं 'जीवनाकरितां कला' हा एकदांच सुरू झालेला वाद कधींच मिटणार नाहीं. पण तो प्रश्न लेखकांचा आहे, सामान्य वाचकांचा नाहीं. सर्वसाधारण वाचक वाचतो तें जीवनाचा विसर पडावा म्हणून. (Literature is an escape from life) तेंच वाचन कशाप्रकारें करावें हा मुख्य प्रश्न आहे. 'जीवनाचा विसर पडावा' हा सर्वसाधारण वाचकाचा वाचनांतील हेतु गृहीत धरून चाललों तरी ह्या जीवनांत ज्यांचा विसर पडावा अशा कोणत्या गोष्टी आहेत ? त्यांच्यापासून कोणते क्लेश होतात म्हणून त्या टाळाव्याशा वाटतात, हें ध्यानांत घ्यावयास हवें. तरच वाचनाला दिशा मिळेल. एखाद्या कथा-कादंबरींतील नायकनायिकांच्या जीवनांतील उत्कर्ष अगर अपकर्षाशीं समरस होऊन, त्यांचीं सुखदुःखें जाणून घेण्यांत वाचकाला एक अननुभूत आनंद होत असतो. तो स्वतःला त्या पात्राच्या भूमिकेंत उभें करून पाहात असतो. तेव्हां मला असें म्हणावयाचें आहे कीं वाचकांनीं आपला पिंड ओळखून त्याप्रमाणें वाचन केल्यास जीवनाचा विसर तर पडेलच, पण त्याच्या विचार-विलासांतहि भर पडेल.

आतां आपण वाचकांचे वेगवेगळे प्रकार पाहूं या ! वाचकांत एक वर्ग असा असतो कीं जो केवळ भक्तिमार्गाविषयक पुस्तकेंच वाचतो. ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, मोरोपंत आणि वामनपंडीत यांचीं पुस्तकें तो वाचतो. तीं त्याला समजतात असें नव्हे, तर त्यांच्या वाचनानें मुक्ति मिळते असें म्हणतात म्हणून तो वाचतो. पण ही मुक्ति म्हणजे तरी काय ? मुक्ति म्हणजे भूतभविष्याचा विसर. संसारांतील क्लेशाला कंटाळलेला जीव 'देवाचिये दारीं' क्षणभर उभा राहिला

कीं आपलें अस्तित्व विसरतो. अशा तऱ्हेच्या लोकांनीं माझ्या मतें तुकाराम वाचावा.

तुकारामाचे पुष्कळसे दाखले रोजच्या अनुभवाचें आहेत. त्याला भोगाव्या लागणाऱ्या यातना तुमच्या–आमच्या सारख्याच ( किंबहुना त्याहूनहि भयंकर ) होत्या. तेव्हां तुकाराम सामान्य वाचकाला जवळचा वाटेल. दुसरा वर्ग पौष्टिक वाचन करणारांचा. बोधपर पुस्तकांत त्याचें मन रमतें. त्याची मनोभूमिका एका विशिष्ट प्रकारची असते. तींत ठाशिवपणा असतो. असा वाचक शांतपणें जें वाचायचें तें वाचील आणि नको तेव्हां पुस्तक मिटून ठेवील. वाचलेल्या मजकुरांतील वादग्रस्त प्रश्नावर तो दुसऱ्याशीं वाद घालीत बसणार नाहीं. तशा प्रकारच्या वाचकानीं टांचणें काढून वाचण्याची संवय ठेवावी. तिसरा वर्ग केवळ कथा–कादंबऱ्या वाचणाऱ्यांचा. अजूनपर्यंत या वाचकांत अंधश्रद्धा होती. फडके–खांडेकरांची कथा–कादंबरी ना ? मग ती सरस असायचीच ! पण आतां त्यांच्या मागून येणाऱ्या पिढीचें वाङ्मय तितकेंच, प्रसंगीं त्याहूनहि सरस ठरल्यामुळें तो वाटेल ती कलाकृति हातांत घेत नाहीं. त्याच्या वाचनाला आतां 'रुचि' आलेली आहे. असें वाचन लेखकाच्या अनुभूतीशीं खेळत खेळत केलें तर अल्पावधींत एखादा प्रभावी वाचक लेखक होऊं शकेल. चौथ्या वर्गाची वाचनाची भूक मात्र दांडगी आहे. भुकेला काय खाऊं नि काय नको असें त्याचें होतें. आठ आठ तास कारखान्यांत काम करून घरीं जातांना पेंगणारा मजूर, दिवसाला शंभर दीडशें पृष्ठांची एक रहस्यकथा सहज वाचून काढतो. दुपारची सुट्टीहि फुकट न घालवितां 'मृत्यूच्या पाश'मधील धनंजयाच्या रहस्यांत तो गुंगून गेलेला असतो. माझ्या परिचयाचे एक गृहस्थ गिरणींत कामाला आहेत. ते महिन्याकाठीं दहा तरी रहस्यकथा ( विकत घेऊन ) वाचतात. तरी पण त्या कथांतील कपट–कारस्थानांचा त्या गृहस्थांच्या मनावर काडीइतकाहि परिणाम झालेला नाहीं. पूर्वीइतकाच तो साधा, सरळ आणि सालस आहे. या वर्गांतील वाचकाला वाचनाची दिशा दाखविणें कठीण आहे. कारण या वाचकाच्या जातींत अनेक पोटभेद आहेत. त्यांत व्ह. फा. झालेला एखादा शिक्षक असतो, मराठीचा पदवीधरहि असतो आणि दुकानांत काम करणारा नोकरहि असतो. वाचायचें म्हणून ते वाचतात.

तेव्हां 'वाचन कसें करावें ?' या प्रश्नाचें उत्तर द्यावयाचें म्हणजे 'आपण

ज्या परिस्थतींत वाढत आहोंत ती परिस्थिति ' आणि ' पुढें आपल्याला कशा पद्धतीनें जगतां आल्यास आपण सुखी होऊं ? ' या दोन गोष्टींची जाणिव ठेवून वाचन करावें असेंच मी थोडक्यांत सांगूं शकेन. ● ● ●

## अश्रु

माणसाच्या जीवनांत सुखापेक्षां दुःखाचेच प्रसंग अधिक येतात. त्या प्रसंगीं तो एकटा असतो. सुखाच्या घटकेला गोलमेजाभंवतीं खाद्यपेयांच्या समाचारासाठीं जमलेले मित्र ते सरतांच सशाच्या पावलांनीं पसार होतात. अशा वेळीं अश्रूचें सहाय्य अमोल ठरतें. बहुजनसमाजाचा संबंध-शृंगार आणि वीर रसापेक्षां करुण रसाशींच अधिक येतो. प्रेम आणि पराक्रम ह्या आल्या गेल्याच्या वांट्याला येणाऱ्या गोष्टी नव्हेत.

जीवनांतील अनुभूतींचें कढ म्हणजे अश्रु. अश्रूंच्या सिंचनानें पतित पावन होऊं लागतो. पश्चात्तापाच्या अग्नींत तावून सुलाखून निघालेलें जीवन काळाच्या निकषावर शंभर नंबरी ठरतें. संतांचें सारें सामर्थ्य अश्रूंत एकवटलेलें असतें. सांपडेल तें हत्यार हातांत घेऊन येशू ख्रिस्ताला मारायला जेव्हां लोक धांवले तेव्हां अखिल मानवजातीकडे सहानुभूतानें पहाणारे त्याचे डोळे म्हणाले—

' नसेल जो पापी तयानें मारावा धोंडा '

सोन्याचा धूर निघत असलेल्या कपिलवस्तु नगरींतून हिंडतांना अपंगांच्या दर्शनानें सिद्धार्थाच्या डोळ्यांत उभे राहिलेले अश्रु मानवजातीच्या पोषणासाठीं आज उपयोगी पडत आहेत. पांडुरंगासमोर समाधिस्त झालेल्या तुकारामाच्या आसावलेल्या अंतःकरणांतून स्फुरलेल्या अभंगांनीं पाषाणसुद्धां पाझरतील. आणि सायं प्रार्थनेच्या वेळीं पांच पांच लाख लोकांचीं मनें अहिंसेच्या सूत्रांत गुंफणाऱ्या महात्म्याचे अश्रु उद्यांच्या विश्वांत शांति निर्माण करणारे ठरतील.

रोजच्या जीवनांत देखील अश्रूंच्या स्मरणीचें मणी माणसाला ओढीत बसायची पाळी येते. दिवसभर राबूनसुद्धां पोराबाळांच्या पोटाला अन्न पुरवितां येत नाहीं म्हणून सावकारापुढें लाचार होणाऱ्या शेतकऱ्याचे अश्रु, दारुड्या नवऱ्याच्या नादानपणामुळे स्वयंपाकघरांतील धुरानें काजळलेल्या एखाद्या सिंधूचे अश्रू वडि-

लार्जित जिंदगीवर तुळशीपत्र ठेवून प्रीतीच्या संगमावर आपल्या आशेचें घरकुल बांधणाऱ्या प्रियकरांचे अश्रु, शाळेंतील अभ्यास न झाल्यामुळें गुरुजींच्या कठोर शब्दामुळें उभे राहिलेलें माधुकऱ्या मुलाच्या डोळ्यांतील अश्रु, जन्मभर कवडीनें कवडीनें पैसा सांठवून अखेरच्या क्षणीं कर्णाच्या हातानें दान देणाऱ्या लक्ष्मी-पुत्राचे अश्रु...या साऱ्यांत एकप्रकारचें सामर्थ्य आहे.

अश्रु हे सर्वसाधारण व्यक्तीच्या जीवनांत भावगीतासारखे आहेत आणि संतांच्या जीवनांत ते महाकाव्यासारखे आहेत. तुम्हां–आम्हांला सारखा शोक करीत बसून भागणार नाहीं. कारण आपली उदासीनता ही मर्यादित असते. पण संतांच्या जीवनांतील क्षण नि क्षण आणि देहाचा कण नि कण परोपकारा-साठीं वेंचिला जात असतो. विश्वाच्या कोनाकोपऱ्यांतील दुःख त्यांच्या अश्रूंत प्रतिबिंबित झालेलें असतें. त्या महाकाव्याचे सर्ग मानव वर्षानुवर्षे गात आला आहे. हास्य आणि अश्रु हे सागराच्या लहरी आणि शिंपल्यासारखे आहेत. हास्य-लहरींनीं ओंठाला पडलेली मुरड क्षणाची असते, पण अंतःकरणाच्या तळाशीं अंधकारांत जीवनाचें श्रेय शोधीत बसलेल्या शिंपल्यांतील मोत्यांचें तेज अक्षय असते.

● ● ●

अनुक्रम १८३८८
विभाग
क्रमांक
नों. दि. २१/१२/५८
REFBK-0008183
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ८९८३